



# जनमाध्यम

e-paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २ जूलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०




## शेतक-यांचा अपमान सत्ताधा-यांनी केला

### मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी; विरोधकांची मागणी

**मुंबई** - आमदार बबनराव लोणीकर यांनी देखील शेतक-यांच्या विरोधात आक्षेपार्ह विधान केले यावर विरोधकांनी जोरदार आक्षेप घेतला. शेतक-यांचा वारंवार अपमान सत्ताधारी करत असल्याने मुख्यमंर्त्यांनी माफी मागावी अशी मागणी महाविकास आघाडीच्या आमदारांनी केली. शेतक-यांच्या विषयावर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले विधानसभा अध्यक्षांच्या स्थानाजवळ गेले.या गोंधळामुळे विधानसभेचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर विरोधकांनी माफी मागा म्हणून घोषणाबाजी केली. त्यावेळी विधानसभा अध्यक्ष यांनी नाना पटोले यांच्यावर एक दिवसाच्या निलंबनाची कारवाई करण्यात आली. महाविकास आघाडीच्या नेत्यांना सभागृहात बोलूच दिले जात नाही, उलट शेतक-यांच्या प्रश्नावर बोलल्यावर कारवाई करण्यात येते यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. विरोधकांनी पूर्ण दिवसाच्या कामकाजावर बहिष्कार टाकत सभात्याग केला. राज्यात आज शक्तिपीठ महामार्ग विरोधात शेतक-यांचे आंदोलन चालू आहे. बारा जिल्ह्यातील शेतकरी या महामार्गाला विरोध करत आहे, दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री शेतक-याविरोधात विधान करतात, सत्ताधारी आमदार बबनराव लोणीकर शेतकरी आमच्या पैशावर जगतात अशी अकाराची भाषा करतात.लोणीकर यांच्यावर कारवाई होत नाही यावरूनच त्यांचे समर्थनच सरकार करत आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. शेतक-यांच्या विषयावर विरोधकांना सभागृहात बोलू दिले जात नाही,निलंबन करतात. शेतक-यांच्या विषयावर आंदोलन करू, तुरुंगात टाकले तरी चालेल पण शेतक-यांसाठी आम्ही लढत राहू अशी आक्रमक भूमिका काँग्रेस विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी घेतली.

शासनाचा मोठा निर्णय

## वारीदरम्यान मृत्यू झाल्यास 4 लाखांची आर्थिक मदत

**मुंबई/प्रतिनिधी :** वारी सुरू झाल्याच्या दिनांक पासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारक-यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे . विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात . २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून,चिखलातून माउलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारक-यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारक-यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे .यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने आज जाहीर केला आहे . या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणा-या अनपेक्षित घटनांमध्ये वारक-यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारक-याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे. अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत. वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारक-यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४,००० व ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख,एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६००० रुपये तर एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत मिळेल.



## ‘मोदी लोणीकरांचा बाप असू शकतात शेतक-यांचा नाही’

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाचा माजी मंत्री बबनराव लोणीकरांनी शेतक-यांबद्दल केलेले विधान अत्यंत आक्षेपार्ह आहे. नरेंद्र मोदी भाजपा व बबनराव लोणीकरांचा बाप असेल आमचा किंवा शेतक-यांचा बाप असू शकत नाही असा घणाघाती हल्ला करत शेतक-यांसाठी खासदारकीचा राजीनामा तोंडावर फेकला आहे. एका दिवसांचे निलंबनच काय आमदारकी व अख्खं आयुष्य शेतक-यांसाठी देईन असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी ठणकावून सांगितले.

शेतकरी प्रश्नावर आवाज उठवल्यानंतर नाना पटोले यांना विधिमंडळातून एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले, त्यानंतर विधिमंडळ परिसरात प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना पटोले पुढे म्हणाले की, भाजपा हा शेतकरी विरोधी पक्ष आहे. भाजपा युती सरकारमधील कृषी मंत्री माणिकराव कोकाटे नेहमीच शेतक-यांचा अपमान करतात, आधी त्यांनी शेतक-यांची तुलना भिका-याशी केली. नंतर कर्जमाफीचे पैसे मुलामुलींच्या लग्नाला वापरा अशी वायफळ बडबड केली तर आता बबनराव लोणीकरांनी शेतक-यांचा अपमान केला. शेतक-याला पेरणीला पैसे मोदी देतात, शेतक-यांच्या घरच्यांना कपडे, मोबाईल हेही मोदी देतात असे विधान केले. २०१४ च्या आधी लोणीकर कपडे घालत नव्हते काय?, नंगे फिरत होते का?, असा संताप नाना पटोले यांनी व्यक्त केला. शेतक-यांना कर्जमाफी देउ, शेतमालाला हमी भाव देउ, शेतीला २४ तास मोफत वीज देउ अशी आश्वासने देउन सत्तेत आले आणि आता शेतक-यांचा अपमान करतात. हा सत्तेचा माज आहे पण आम्ही शेतक-यांचा अपमान सहन करणार नाही. शेतक-यांची लढाई लढत राहणार, आवाज दाबण्याचा कितीही प्रयत्न केला तरी न डगमगता शेतक-यासाठी लढत राहू. शेतक-याचा अपमान करणा-या बबनराव लोणीकर व मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर माफी मागावी, असेही नाना पटोले म्हणाले.



## धावत्या ट्रेनमध्ये टीसीला कपडे फाडून मारहाण!

■ *एलटीटी-हटिया एक्सप्रेसमधील घटना* ■

**नागपूर/प्रतिनिधी :** कर्तव्यावर असलेल्या टीसीला एका प्रवाशाने शौचालयात ओढून बेदम मारहाण केली. त्यांचे कपडे फाडले, रक्कम लुटली आणि ओळखपत्रासह महत्वाची कागदपत्रे ट्रेनच्या खाली फेकून दिली. मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावर एलटीटी हटिया एक्सप्रेसमध्ये ही खळबळजनक घटना घडली. मंगळवारी या घटनेचे वृत्त उघड झाल्यापासून रेल्वे प्रशासनात प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे. फिर्यादी टीसी हे ३५ वर्षांचे असून ते अमरावती जिल्ह्यातील रहिवासी आहेत. २९ जूनला सकाळी १० वाजता ते नेहमी प्रमाणे कर्तव्य बजावत होते. बडनेरा स्थानकावर एलटीटी हटिया-एक्सप्रेसमध्ये त्यांना एक प्रवासी विनातिकिट आढळला. प्रवाशाने त्याच्याकडे तिकिट नसल्याचे कबुल करून आपण गाडीत तिकिट बणवू असे म्हणत टीसींना जनरल कोचमध्ये नेले. कोचमधील शौचालयाजवळ जाताच त्याने दार उघडून टीसीला आत ओढले. दार बंद करून टीसीला बेदम मारहाण सुरू केली. एवढ्यात गाडी वर्धेकडे निघाल्याने चालू गाडीच्या आवाजात टीसीची आरडाओरड दबली. दरम्यान, आरोपीने टीसीला बेदम मारहाण करतानाच त्यांच्या जवळचा पेन घेउन त्यांना शरिरावर ठिकठिकाणी टोचले. एवढेच नव्हे तर आरोपीने त्यांना रक्त निघेपर्यंत कडाडून चावे घेतले.



## रविंद्र चव्हाण भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी

### केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची निवड

**मुंबई/प्रतिनिधी :** खूप दिवस चर्चा सुरु असलेल्या महाराष्ट्राच्या भाजपा प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रविंद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. सध्या ते महाराष्ट्र भाजपचे कार्याध्यक्षपद म्हणून काम करत होते. आज मुंबई येथे आता प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची निवड करण्यात आली. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चव्हाण हे सूत्रे स्वीकारली आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आषिश शेलार, विनोद तावडे यासह भाजपाचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.विधानसभा निवडणूकीनंतर मंत्रिमंडळात संधी न मिळाल्याने काहीसा नाराज असलेल्या चव्हाण यांना पक्षश्रेष्ठींनी दिलेले प्रदेशाध्यक्षपदाचे आश्वासन पूर्ण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने कोकण आणि इतर भागांत पक्षविस्तारावर भर देण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कोकणात पक्षवाढीसाठी चव्हाण यांच्या योगदानाचे कौतुक केले होते. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे राज्याचे महसूल मंत्री झाल्याने प्रदेश भाजपच्या अध्यक्षपदासाठी रविंद्र चव्हाण यांचे नाव जवळपास निश्चित झाले होते. ते डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. जानेवारी २०२५ मध्ये त्यांच्याकडे राज्याच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. रविंद्र चव्हाण हे भाजपच्या युवा मोर्चातून राजकारणात आले असून, कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, चार वेळा आमदार, भाजप प्रदेश सरचिटणीस, मंत्रीपद अशा विविध जबाबदा-या त्यांनी सांभाळल्या आहेत. डोंबिवली मतदारसंघातून ते सलग चौथ्यांदा निवडून आले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून कारकिर्दीस सुरुवात करून भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदापर्यंतचा त्यांचा प्रवास उल्लेखनीय आहे.




## 5 तारखेला वाजत गाजत गुलाल उधळत या -ठाकरे

**मुंबई**-मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एका संयुक्त पत्रकाद्वारे मराठी जनतेला ५ जुलैच्या विजयी मेळाव्याला वाजत गाजत येण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे हे दोन्ही भाउ या मेळाव्याच्या निमित्ताने एका व्यासपीठावर येणार हे स्पष्ट झाले आहे. विशेषत? ठाकरे बंधू केव्हा एकत्र येणार? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्नही या निमित्ताने निकाली निघाला आहे. मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हिंदीची सक्ती करणारा जीआर मागे घेण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर स्फुरण चढलेल्या मनसे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ५ जुलै रोजी विजयी मेळावा बोलावण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, त्यांचा संयुक्त मेळावा ५ जुलै रोजी सकाळी १० वा. वरळी डोम येथे होणार आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने उद्धव व राज ठाकरे ब-याच वर्षांनंतर एका व्यासपीठावर येणार आहेत. विशेष म्हणजे या दोन्ही नेत्यांनी मंगळवारी एका संयुक्त निवेदनाद्वारे मराठी जनतेला या मेळाव्यासाठी वाजत गाजत गुलाल उधळत येण्याचे आवाहन केले आहे.

## शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकरी आक्रमक

### 12 जिल्ह्यांत चक्का जाम आंदोलन



**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर-गोवा असा नव्याने होणा-या शक्तिपीठ महामार्गाला शेतक-यांकडून विरोध केला जात आहे. राज्य सरकारकडून महामार्ग करण्यास हिरवा कंदील मिळाला असून यासाठी मोजणी करण्याचे आदेश देखील दिले आहेत. मात्र यानंतर या महामार्गाला जोरदार विरोध केला जात असून राज्यातील १२ जिल्ह्यांतील शेतकरी याविरोधात रस्त्यावर उतरत आहेत. त्यानुसार मंगळवार, १ जुलै रोजी सोलापूर, कोल्हापूर, नांदेड, सांगली जिल्ह्यांमध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले असून परभणीत मात्र महामार्गासाठीची मोजणी थांबविण्यात आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत. दरम्यान, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव (उस्मानाबाद), सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. हा महामार्ग सुमारे ७,५०० ते २७,००० हेक्टर सुपीक आणि बागायती जमिनी अधिग्रहित करणार आहे, ज्यामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान होईल. शेतकरी आपली वडिलोपार्जित जमीन गमावण्याच्या भीतीने आक्रमक झाले आहेत. शेतक-यांना कमी मोबदला मिळण्याची शक्यता आहे. शक्तिपीठ महामार्ग हा महाराष्ट्र सरकारचा एक महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्ग प्रकल्प आहे. नागपूर ते गोवा असा ८०२ कि.मी. लांबीचा सहापदरी मार्ग आहे.

**परभणीत महामार्गाची मोजणी रोखली-** परभणीच्या पूर्णा तालुक्यातील सुरवाडी आणि सोनपेठ तालुक्यातील काही गावांमध्ये आज शासनाकडून मोजणी करण्यात येणार होती. मात्र ही मोजणी शेतक-यांच्या विरोधामुळे न करता अधिका-यांना परतावे लागले आहे. यानंतर अधिका-यांचा ताफा येथे आला. ज्यात कृषी विभाग, वन विभाग, भूमि अभिलेख, तहसील, पोलिस आदी विभागाचे अधिकारी मोजणीसाठी आले होते. मात्र शेतक-यांच्या विरोधामुळे त्यांचे काही चालले नाही. शेवटी मोजणी न करताच अधिका-यांना परतावे लागले आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# शेतकऱ्यांनी कृषी योजनेत सक्रिय सहभागी व्हावे –तालुका कृषी अधिकारी उमेश जाधव

**धारणी/ प्रतिनिधी: -**



स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी धारणी येथे कृषी दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी कार्यालय, धारणी व पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिडाम (सहाय्यक गट विकास अधिकारी, पं.स. धारणी) होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उमेश जाधव (तालुका कृषी अधिकारी, धारणी) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणात त्यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कृषी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. 'सरकार विविध योजना शेतकऱ्यांसाठी राबवत आहे. त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला ठोंबरे (कृषी अधिकारी, पं.स. धारणी), अरुण बेठेकर (उप कृषी अधिकारी, धारणी), विनय ढोणे (कृषी विस्तार अधिकारी, पं.स. धारणी), कोरडे (सहाय्यक प्रशासन अधिकारी, पं.स. धारणी), अप्पा पाटील (जैविक शेती शेतकरी प्रोड्युसर कंपनी, धारणी) व सुखराम धुर्वे (ताप्तीपुत्र शेतकरी प्रोड्युसर कंपनी) यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात स्व. वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांच्या शेतीविषयक विचारसरणी, शेतकऱ्यांप्रती असलेले प्रेम व त्यांचे आर्थिक नियोजन यावर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. 'शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे स्वप्न होते,' असे उद्गार यावेळी काढण्यात आले.

सन २०२३-२४ मधील शेतकरी उत्पादन स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविलेल्या शेतकऱ्यांचा विशेष सत्कारही या प्रसंगी करण्यात आला. परसराम भिलावेकर (गाव–उतावली) व श्रावण धुर्वे (गाव–रबांग) या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामप्रसाद काणेकर (ग्रामविकास अधिकारी, धारणी) यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृषी अधिकारी ठोंबरे यांनी केले.

कार्यक्रमात कृषी विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी, तसेच पंचायतीचे पदाधिकारी व स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात नविन सौर प्रकल्प कार्यान्वित

## माहुली जहांगीर सौर प्रकल्पातून २२०० शेतकर-यांसाठी वीजेची सोय

**अमरावती/ प्रतिनिधी: -**



जिल्ह्यातील माहुली जहागीर येथे मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेतील ५ मेगावॅट क्षमता असलेला नविन सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.त्यामुळे परिसरातील २ हजार २०० शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय झाली आहे. या योजनेत सुरू झालेले जिल्ह्यातील हे तीसरे सौर प्रकल्प असून याअगोदर उसळगव्हाण (देवगाव उपकेंद्र) आणि जळगाव मंगरूळ (मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र) हे ६ मेगावॅट क्षमतेचे दोन सौर प्रकल्प सुरू झाले आहे.

शेतकऱ्यांना शाश्वत आणि दिवसा वीज देण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०, राबविण्यात येत असून राज्यात या योजनेला महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकश चंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली ,तसेच विदर्भात प्रादेशिक संचालक परेश भागवत यांच्या मार्गदर्शनात गती देण्यात आली आहे. विकेंद्रीत स्वरूपाचे सौर प्रकल्प उभारायचे आणि त्या प्रकल्पाच्या माध्यनातून निर्मिती होणारी वीज महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्राला जोडून त्या माध्यमातून त्या उपकेंद्रातून वीज पुरवठा होणाऱ्या शेतकऱ्यांना दिवसा वीज देणे असे या योजनेचे स्वरूप आहे. जिल्ह्यात या योजनेअंतर्गत महावितरणच्या ४१ उपकेंद्रासाठी ४४ ठिकाणी सौर प्रकल्प उभारण्यात येत असून ,या माध्यमातून १८४ मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येणार आहे. माहुली जहागीर सौर प्रकल्पाची क्षमता ५ मेगावॅट असून २५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. मे.व्ही.व्ही.के.आर फोटोव्होलटाईस एनर्जी या विकासकामार्फत उभारण्यात आलेल्या या सौर प्रकल्पातून निर्मिती होणारी वीज ३३ केव्ही माहुली जहागीर उपकेंद्राच्या माध्यमातून परिसरातील २ हजार २०० शेतकऱ्यांना दिवसा देण्यात येणार आहे. जिल्ह्यात या प्रकल्पासहीत तीन सौर प्रकल्पाच्या माध्यमातून ५ हजार २०० शेतकऱ्यांना आता दिवसा वीजेची सोय झाली आहे. माहुली जहागीर सौर प्रकल्प सुरू करण्यात आले.यावेळी मुख्य अभियंता अशोक साळुंके,अधीक्षक अभियंता दिपक देवहाते,कार्यकारी अभियंता प्रफूल लांडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# सोमवार बाजार येथील मासविक्री व अतिक्रमण १५ दुकानांवर महानगरपालिकेची कार्यवाही

**अमरावती प्रतिनिधी,** आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत दौरा करीत असतांना अतिक्रमण, साफ सफाई व शहरात उघड्यावरील कत्तल व मास विक्री बाबत तक्रारीची नोंद घेऊन शहरातील कत्तल व मास विक्री तात्काळ बंद करावी. याबाबत बाजार परवाना विभाग, अतिक्रमण विभाग, पशुसंवर्धन विभाग संबधीत अधिका-यांना तात्काळ सुचना दिल्या. तसेच महानगरपालिका हद्दीमध्ये अधिकृत बाजार याचे व्यतिरिक्त इतर ठिकाणी होणारी मास विक्री याबाबत कठोर कार्यवाही करावी. जेणे करुन सार्वजनिक आरोग्य व त्यावर होणारे परिणाम यावर प्रतिबंध लावता येईल. आयुक्त यांचे आदेशानुसार पशुसंवर्धन विभाग, बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभाग यांचे मार्फत दुपारी १२.०० वाजता संयुक्त कार्यवाही करण्यास सुरुवात करण्यात आली. सदर कार्यवाही करीता संवेदनशील भाग असल्याने शेकडो नागरिकांच्या विरोधाला न झुमानता बडनेरा पोलिस स्टेशन यांची मदत घेवून सोमवार बाजार येथील १५ दुकाने तोडण्यात आली व ५ दुकाने सिल करण्यात आले. या दुकानांमध्ये महानगरपालिका बाजार परवाना विभाग यांचे मार्फत कुठलेही परवाने नसल्याचे आढळून आले. तसेच सदर दुकाने अतिक्रमीत जागेवर आढळून आली. त्यामुळे तात्काळ दुकानांच्या मालकांना महानगरपालिका अधिनियम कलम २३१, २३२, ३३६ अन्वये कार्यवाही केली तसेच काही ५ दुकाने सिल करण्यात आले. सदर कार्यवाही करीता पशुवैद्यकीय डॉ.सचिन बोंन्द्रे, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, राहुल वैद्य, बाजार परवाना विभागाचे उदय चव्हाण, अजय बन्सेले उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### अवैध शस्त्रसाठा व जिवंत

इतर साहित्य आढळले. एकूण मुद्देमालाची किंमत ७ लाख ७८ हजार ५०० रुपये इतकी आहे.

तपासादरम्यान हे शस्त्र व दारुगोळा उत्तराखंड येथील सराईत गुन्हेगार कामरान अहमद याच्याकडून अवैधरित्या खरेदी केल्याचे उघड झाले आहे. कामरान अहमदवर दिल्ली व इतर ठिकाणीही अवैध शस्त्रप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. त्याच्या शोधासाठी विशेष पथक उत्तराखंडला रवाना करण्यात आले आहे.

तर शस्त्र प्रकरणी दुसरी कारवाई करण्यात आली यामध्ये अश्फार उर्फ भाया कडून पंप ॲक्शन गन व काडतुसे जप्त करण्यात आली.मो. अश्फार मो. असलम मलनस उर्फ भाया (वय ३५, रा. तेलीपुरा, यवतमाळ) याच्याकडे पंप ॲक्शन गन असल्याची माहिती पथकाला मिळाली. नागपूर-तुळजापूर महामार्गावरील सव्हिस रोडवर सापळा लावून, अश्फार याच्या टाटा झेस्ट (एम.एच. १४ जी.डी. ०५३७) वाहनास थांबवून झडती घेतली असता, डिक्कीत ठेवलेल्या पोत्यामध्ये पंप ॲक्शन गन व ५ जिवंत काडतुसे सापडली. त्याच्याकडून एकूण ४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हे दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले असून या प्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात रणवीर वर्मा विरोधात कलम ३, ४, २५, ५, २७ शस्त्र अधिनियम व सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अवधुतवाडी पोलीस ठाण्यात अश्फार उर्फ भाया विरोधात कलम ३, २५ शस्त्र अधिनियम व सहकलम १३५ मपोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतिश चवरे, सपोनि संतोष मनवर, पोलीस अंमलदार निलेश राठोड, रितुराज मेडवे, प्रशांत हेडाऊ, सचिन घुगे, आकाश सहारे यांच्या पथकाने केली आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

या दोन्ही कारवायांमुळे यवतमाळ शहरात अवैध शस्त्रसाठा उपलब्ध होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे बाहेरून आलेले गुन्हेगार तसेच स्थानिक गुन्हेगारांनी शस्त्रांचा वापर सुरू केल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

### जिल्हा बँकेत बच्चू कडू

प्रक्रिया करण्यात येईल. स्वतःच्या अधिकाराचा वापर करून त्यांनी समिती बनवली. या माध्यमातून त्यांनी कोट्यावधीचे खोटे काम करून बँकेचे नुकसान केले. ठरावाला विरोध असताना काही ठराव मंजूर असे लिहिलेले दिसले. यासंदर्भात विभागीय सहनिबंधकाकडे तक्रार केल्या. त्यांनी दबावात तक्रारी प्रलंबित ठेवल्यामुळे सहकार आयुक्तकडे तक्रारी केल्या. परंतु पदाचा दुरुपयोग करीत अधिकाऱ्यांवर दबाव आणत सर्व तक्रारी प्रलंबित ठेवल्या. आता आम्ही सहकार मंत्री, मुख्यमंत्री, सहकार सचिव यांच्याकडे तक्रारी केल्या, आता चौकशी सुरू आहे. बँकेच्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकून चौकशीला कागदपत्र देत नाही यावर सुद्धा आम्ही लवकर न्यायालयात जाणार आहोत, असेही यावेळी सांगण्यात आले.

आज पर्यंत आम्ही रीतसर मार्गाने तक्रारी केले आहे. परंतु अध्यक्षाची वागणूक ही अत्यंत अयोग्य झाली असून त्यांना असे वाटत आहे की आपण धमक्या देऊन दबाव आणून हे सर्व बंद करू शकतो. ३० मे रोजी झालेला ठराव खोटे लिहिले बाबत आम्ही विचारणा केली असता अत्यंत अरेरावीची भाषा त्यांनी वापरली. संचालकावर दबाव टाकण्याचे प्रयत्न केले. एवढेच नाही तर २७ जून रोजी झालेल्या सभेला कार्यकर्त्यांना बाहेर बोलवून बँकेच्या प्रतिबंधित भागात मोठ्या प्रमाणात फटाके फोडले. कुठे ठराव लिहिण्याबद्दल खोटे लिखाण करणे, बँकेमध्ये आर्थिक अनागोंदीचा कारभार करणे याबाबत सहकार कायदा अंतर्गत फौजदारी स्वरूपाची प्रक्रिया नाईलाजास्तव करणार असल्याची माहिती बबलू देशमुख यांनी दिली. या व्यतिरिक्त इतर काही आरोप त्यांनी पत्रकार परिषद मध्ये केले आहे. यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, एस एन भारसाकळे, एस.बी साबळे, हरिभाऊ मोहोड, डी एस काळे, एस बी गावंडे, पी बी अलोणे, आर?.वी.गायगोले, एम एस वानखडे आदी उपस्थित होते.

### घरफोडी व मोटरसायकल चोरी

बीएफ ९२९६, स्प्लेंडर प्रो एमएच १९ बीवाय ४६१५ , हिरो स्प्लेंडर एम एच ३१ ईएच ३४५८ किंमत १ लाख ४० व चोरीतील नगदी २६१० असा एकूण १ लाख ४२ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तीन दुचाकी आणि दोन घरफोडिची कबुली आरोपीनी दिली.

हे कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखेडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक निरीक्षक सचिन पवार, अमलदार युवराज मानमोठे, वराडे, स्वप्निल तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, निलेश आंबटकर यांनी केली.

### सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याची

काही दिवसापूर्वी राजेश पाटील यांनी आपला साठवा वाढदिवस मित्र मंडळी आणि कुटुंबीयांसोबत साजरा केला होता. मनमिळाऊ आणि हसतमुख स्वभावचे ते होते. अशातच त्यांनी टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या का केली हा प्रश्न निर्माण झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार सेवानिवृत्त झाल्यावर ते धामणगांव रेल्वे तालुक्यातील आपल्या गावामध्ये शेतीचे काम पहात होते आणि प्रभात रेसिडेन्सीमध्ये पत्नी आणि मुलांसह राहत होते. दरम्यान त्यांच्या या आत्महत्येमुळे कुटुंबीयांना धक्का बसला आहे. आत्महत्या करण्याचे नेमके कारण अजून पर्यंत समोर आलेले नाही. पोलीस पुढील तपास करत आहे.

### भटक्या विमुक्त समितीचे

करा, १ ऑगस्ट रोजी विमुक्त दिन घोषित करावा. ?ट्रॉसिटी सारखे संरक्षण विमुक्तांना पण देण्यात यावे, यासह इतर मागण्या करण्यात आल्या. मागण्यांच्या तत्काळ पूर्ततेसाठी समितीच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. मागण्या लवकरच पूर्ण नाही झाल्या तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. धरणे देणाऱ्यांमध्ये संतोष नाथ, श्रीनाथ गोरे, धनराज चौके, बाबू सिंग पवार, पप्पू मदारी, विजयनाथ बाबर, सुरेश तांबे, तानाजी तांबे, प्रकाश सूर्यवंशी, जगदीश खंडागळे, गजानन शेखर, इकबाल मदारी, फिरोज मदारी, अब्दुल मदारी, साबीर मदारी, असलम मदारी, हनीफ ममदारी, आकाश शेंगर आदींचा सहभाग होता.

### कर्जमाफीसाठी शिवसेना आक्रमक

प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

वीजवितरण कंपनीने सुरू केलेल्या स्मार्ट मीटर योजनेमुळे नागरिकांवर आर्थिक बोजा पडत असून, ही योजना तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. तसेच, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना गेल्या वर्षभरापासून निधी मिळालेला नाही. तो नियमित करण्यात यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

तालुक्यात सध्या शेतकऱ्यांसाठी ॐ खताची तीव्र टंचाई जाणवत असून, ती त्वरित दूर करण्यात यावी. त्याचबरोबर मागील सहा महिन्यांपासून वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठाही शेतकरी आणि सामान्य जनतेसाठी डोकेदुखी ठरत आहे. यावर तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र सरकारने पूर्वी घोषित केलेली कर्जमाफी अद्यापही अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही. ती तात्काळ वितरित करण्यात यावी, अशी मागणी करत शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर मोर्चा आणला.

या मोर्चात तालुका प्रमुख राजू राठोड, उपजिल्हा प्रमुख राजू मालवीय, सुनील चौथमल, श्रीराम मालवीय, दिनेश धनेवार, दयाराम सोनी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना रस्त्यावर उतरत असून, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### सहकार क्षेत्रात 'प्रहार'चा प्रभाव,

राजकीयदृष्ट्या अनेक दिग्गजांचा पराभव करत त्यांनी अध्यक्षपद मिळवले, यामुळे अमरावती जिल्ह्यातील सहकाराच्या पुढील राजकारणातही बच्चू कडू यांचे नाव निर्णायक राहणार, हे निश्चित मानले जात आहे.जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्य करत असताना बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, पुनर्गठन, थकीत कर्जावरील व्याजमाफी, वीजबिल माफी यासारख्या अनेक प्रश्नांवर ठोस भूमिका घेतली.ग्रामीण भागात आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सेवा सहकारी संस्थाच्या मार्फत जिल्हा बँकेतून मदतीचा हात देण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला.

### प्रशासनाच्या सतर्कतेमुळे

कार्यक्रम अधिकारी यवतमाळ तसेच देवेंद्र राजूरकर जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांना माहिती दिली. त्यांनी ताबडतोब अविनाश पिसुरडे सरंक्षण अधिकारी संस्थात्मक यांना टिमसोबत रामतीर्थ येथे दि.१ जुलै २५ ला पाठविले,सपुर्ण टिम गावामध्ये दाखल झाली. सर्वांना याबाबतीत मार्गदर्शन करुन नोटीस बजावण्यात आली.

यावेळी सागर विठाळकर बाल विकास प्रकल्प अधिकारी,अविनाश पिसुरडे, तसेच ग्रामपंचायत अधिकारी शुभम राठोड,सरपंच श्रीकांत महाजन, अश्विनी नासरे चाईल्ड लाईन सुपरवायझर,ओम धारणे पोलीस विभाग,रमेश मडावी यांची उपस्थिती होती.

मुलगी व मुलीचे आई वडील यांची प्रशासनाने तसेच गावातील नागरिकांनी समजूत घातली, बालविवाहाचे दुष्परिणाम समजाऊन सांगितले.त्यामुळे आई-वडील यांनी स्वखुशीने विवाह न करण्याबाबत निर्णय घेतला.त्याचप्रमाणे तालुक्यातील सर्व नागरिकांनी देखील बालविवाहासारख्या चुकीच्या प्रथेपासून दूर रहावे असे आवाहन यावेळी प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

स्थानिक प्रशासनाच्या सतर्कतेमुळे बाल विवाह रोखण्यात आला.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ९ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - १०७२/२०२५
श्री.देविदास श्रावण वासनिक विरुध्द निरंक
पुढील तारीख २१.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Devidas Shravan Wasanik** , Age 69 yrs., Occu.- Agricultural, R/o. Anjangaon Bari, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की,**गिरजाबाई श्रावण वासनिक** हे **दि.१६.१०.२०२५** रोजी अंजनगाव बारी, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार देविदास श्रावण वासनिक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **देविदास श्रावण वासनिक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६७/२०२५ — ने.ता.२५/०७/२०२५

अर्जदार :- विजय शंकरराव देशमुख व इतर
-- विरुध्द --
गैरअर्जदार :- निरंक

**APPLICATION FOR SUBSTTITUTED SERVICE UNDER ORDER 5 RULE 20-A OF CIVIL PROCEDURE CODE 1908**

ज्याअर्थी वरील **अर्जदार क्र.१ विजय शंकरराव देशमुख व अर्जदार क्र.२ शारदा विजय देशमुख दोघे रा.पुर्णानगर, ता.भातकुली, जि.अमरावती** यांनी दर्पण, जन्मतारीख २५.१०.२०१५ अज्ञान मुलगी हिला दत्तक घेण्याकरिता जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जात अर्जदार क्र.३ दर्पण हिची जन्मदाती आई ममता साहेबराव मु-हेकर उर्फ ममता राजेश बोडखे रा.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती हिने संमती दिली आहे. त्यामुळे सदर अर्जावर आदेश झाल्यावर श्री विजय शंकरराव देशमुख व शारदा विजय देशमुख यांना दर्पण हिचे आई-वडिल म्हणून घोषित करण्यात येईल.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/ अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिस देण्यात येते की, त्यांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ३०.०६.२०२५**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

२० वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - ९७६/२०२५
प्रमोद मोरे व इतर वि.निरंक
पुढील तारीख ०३.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Pramod Bhimrao More** , Age 62 yrs., Occu.- Labour R/o. Malipura, Mahuli Jahangir, Tq. & Dist. Amravati
2) **Manda Babarao Kohale** , Age 65 yrs., Occu.- Household R/o. Bajrang Tekdi, HVPM, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Bhimrao Wamanrao More** हे **दि.०९.०२.२०१६** रोजी तसेच **Mathurabai Bhimrao More** या दिनांक २९.०१.२०२० रोजी माहुली जहांगिर, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Pramod Bhimrao More & Other** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार Pramod Bhimrao More & Other** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १४.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-३ यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२५/२०२५ — ने.ता.०३/०७/२०२५

पिटीशनर :- निलेश काकडे अधिक १
-- विरुध्द --
रिस्पाडंट :- मंदाकिनी व इतर

**APPLICATION FOR SUBSTTITUTED SERVICE UNDER ORDER 5 RULE 20-A OF CIVIL PROCEDURE CODE 1908**

ज्याअर्थी वरील वादी निलेश काकडे यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती, यांच्या न्यायालयात प्रतिवादी मंदाकिनी साहेबराव धांडे व इतर यांच्या विरुध्द अपिल सादर केले आहे.

त्याअर्थी प्रतिवादी नं.३ मोहम्मद शफी शेख हबीब, रा.गणेश पेठ,प्रविणनगर, अमरावती, ता.जि.अमरावती, वारंवार नोटिस देऊनही न्यायालयात हजर राहत नसल्याने त्यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी अपिलाची सुनावणीसाठी दिनांक ०३/०७/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अपिलाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक ३०.०६.२०२५**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

२० वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज - ९३०/२०२५
श्री सुनिल मगर व एक वि.निरंक
पुढील तारीख २७.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Sunil Vitthalrao Magar** , Age 53 yrs., Occu.- Labour R/o. Rohankheda Vochori, Tq. Dist. Amravati
2) **Aruna Sanjay Kakde**, Age 71 yrs., Occu.- Household R/o. Umari Kaap, Tq. & Dist. Yavatmal

-- विरुध्द --

गैरअर्जदार - Nil

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Vitthalrao Bapurao Magar** हे **दि.०४.०३.२०२५** रोजी अमरावती येथे व **Gumfabai Vitthalrao Magar** हया दिनांक २७.०९.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार श्री सुनिल विठ्ठलराव मगर व एक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार श्री सुनिल विठ्ठलराव मगर व एक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

वि.ए.बी.काटे ४ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज -१०७१/२०२५
श्रीमती गजानन सुधाकर इंगळे विरुध्द निरंक
पुढील तारीख २८.०७.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Gajanan Sudhakar Ingale** , Age 42 yrs., Occu.- Labour R/o. Rohankheda, Pusada, Amravati, Tq. & Dist.Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत बाबाराव पाकुजी खडसे** हे **दि.२७.१०.२०१७** हे रोजी रोहणखेडा अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार गजानन सुधाकर इंगळे** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री गजानन सुधाकर इंगळे** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ बुधवार, २ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# आधी व्हिसिटर्स मग बाकी प्रशासकीय कामकाज

## एसपी अर्चित चांडक यांची अशीही संवेदनशीलता

■ समीर ठाकूर ■

अकोला : गेल्या महिन्याभरापासून जिल्हा पोलिस दलाची सूत्रे स्वीकारल्यापासून जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी जनतेच्या मनात पोलिसांची प्रतिमा ही समाजाभिमुख व्हावी याकरिता अनेक उपक्रम हाती घेतले. त्याचाच एक भाग म्हणून पोलिस अधीक्षक चांडक यांच्याकडे येणारे तक्रारदार, व्हिसिटर्स यांना सर्व प्रशासकीय कामकाज सोडून प्रथम वेळ देणे हा पायंडा ते पाळत असल्याने त्यांची भेट घेत त्यांच्याकडे समस्या मांडणारे तक्रारदार हे एक समाधान व्यक्त करीत आहे.



गेल्या महिन्याभरापासून एसपी अर्चित चांडक यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच दुसऱ्याच दिवशी क्राईम मीटिंग घेत जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर लागलीच त्यावर उपाययोजना म्हणून जिल्ह्यातील अवैध धंद्यावर पायबंद घालण्यासाठी ऑपरेशन प्रहार ही संकल्पना आणीत कारवायांचा सपाटा लावला. तर प्रशासकीय कामकाजाने सुद्धा गती पकडली आहे. अमली पदार्थांच्या विरोधी जनजागृती करताना पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी 'मिशन उडान' ही नवीन मोहीम सुरु केली. या मोहिमेत जिल्हा पोलिस दलाने जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय येथे जाऊन तब्बल १० हजार विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला. सोबतच जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात पोलिस दलाच्या वतीने मोटार सायकल रॅलीचे आयोजन सुद्धा केले. त्याआड जिल्ह्यात अमली पदार्थ विरोधी कारवायांचा सपाटा लावीत गांजा, अवैध दारू विक्री यांवर प्रहार केला. जिल्ह्यात कुठेही अवैध धंदे सुरू असल्यास त्याची माहिती द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गुपित ठेवण्यात येईल असे आवाहन करीत जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवायांचा सपाटा लावला. तर अवैध प्रवासी वाहतूक, खाजगी वाहने, नो एन्ट्री मध्ये वाहनांना प्रवेश बंदी, वाहतुकीची कोंडी सोडविण्यासह अनेक प्रकारावर पायबंद घालण्यासाठी ॲक्शन प्लॅन ची आखणी सुद्धा त्यांनी केली असून लवकरच तो अंमलात येणार असल्याची माहिती आहे.

कायदा व सुव्यवस्था सांभाळत याच कालावधीत जिल्ह्यातील समस्या घेऊन येणाऱ्या नागरिकांना न्याय देण्यासाठी त्यांच्या तक्रारी अतिशय संयमीपणे हाताळत लागलीच सदर तक्रारीवर योग्य ती प्रशासकीय कारवाई मार्गी लावण्याचे काम त्यांनी सुरू केले. यावेळी विशेष म्हणजे प्रथमच त्यांच्या दालनाबाहेर असलेल्या एकाही तक्रारदाराची त्यांना माहिती मिळाली तर प्रशासकीय काम काही काळासाठी बाजूला ठेवत थेट तक्रारदाराला कक्षात बोलावून त्याचे म्हणणे ऐकून घेत तक्रार सोडविण्याचा सकारात्मक प्रयत्न पोलिस अधीक्षक अर्चित चांडक करीत आहे. त्यांच्या या कार्यप्रणालीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेसोबतच पोलिसांप्रती असलेली विचारधारा ही सकारात्मक होत चालली आहे. गेल्या आठ दिवसात त्यांच्या कक्षाबाहेर येणाऱ्या अनेक तक्रारदारांशी संवाद साधला असता त्यांनी एसपी चांडक यांच्याद्वारे तक्रारदारांना देण्यात येणाऱ्या सकारात्मक वागणुकीबाबत समाधान व्यक्त करीत पोलिस अधीक्षक चांडक यांचे कार्यप्रणालीवर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

### क्राइम डिटेक्शन मध्येही पोलिस दलाची आघाडी

जिल्ह्यात मागील काही काळात घडलेल्या चोऱ्या, घरफोड्या, हल्ले, खून या प्रकरणात अल्पावधीतच आरोपींचा छडा लावण्यात पोलिसांना कमालीचे यश प्राप्त झाले आहे. परिणामी गुन्हे घडले जरी असले तरी मात्र त्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली पोलिस दलाने आघाडी घेतली आहे.

### ऑपरेशन प्रहार, मिशन उडान प्रभावी अन् परिणामकारक

एसपी अर्चित चांडक यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक पदाची सूत्रे स्वीकारताच जिल्ह्यातील अवैध धंद्याची शटर बंद करण्यासाठी ' ऑपरेशन प्रहार ' ही मोहीम हाती घेतली. या मोहिमे अंतर्गत जिल्ह्यातील अवैध धंद्यावर दररोज कारवाया करण्यात येत आहे तर दुसरीकडे जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या विक्री विरोधात शाळा, महाविद्यालयात तब्बल १० हजार विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संकल्प दिला हे विशेष !

एकंदरीत एसपी चांडक यांनी सुरू केलेल्या या दोन्ही मोहीम प्रभावी आणि परिणामकारक असल्याची भावना सामान्य नागरिक व्यक्त करीत आहे.

# भीषण अपघात एक ठार; एक जण गंभीर जखमी

■ प्रतिनिधी | रिसोड ■



राष्ट्रीय महामार्गावर शिरपूर येथील रिसोड फाटा परिसरात उभे असलेल्या मालवाहक ट्रकवर दुचाकी स्वार धडकल्याने त्यामध्ये ओम बाळूराम बहिरे वय १९ वर्ष या तरुणाचा जागेवरच मृत्यू झाल्याचि दूर्दैवि घटना घडलि तर कार्तिक विलास कव्हर हा गंभीर जखमी झाला आहे.

दिनांक २९ रोजी संध्याकाळी आठ वाजेच्या दरम्यान हे दोन्ही तरुण मालेगाव कडून शिरपूर कडे दुचाकी क्रमांक श्प ३७ १२७६ वर बसून येत होते .दरम्यान मालवाहू ट्रक क्रमांक श्प२ॅ ८० १७ हा ट्रक रिसोड फाटा परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर उभा होता . दुचाकी स्वार ट्रकच्या पाठीमागच्या भागाला वेगाने येऊन धडकला सदर धडक एवढी जबरदस्त होती की सदर ट्रकचा अँगल पुरेपूर वाकल्या गेला. या अपघातामध्ये ओम बाळू राम बहिरे व १९ वर्ष राहणार वाघी बुद्रुक हा या तरुणाचा जागेवरच मृत्यू झाला आहे. कार्तिक विलास कव्हर रा. वाघी बुद्रुक हा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलीस स्टेशनची पीएसआय इम्रान खान पठाण तसेच पोलीस कॉन्स्टेबल हरिहर गवंडे व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णाण्यात हलविले घटनास्थळी जाऊन आरटीओ वाशिम यांनी घटनास्थळाला भेट दिली. सदर अपघाताचा पुढील तपास शिरपूर पोलीस करीत आहेत.

# 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध दारू वाहतूक प्रकरणी कारवाई



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■


अकोला जिल्ह्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत मूर्तिजापूर शहरात अवैध दारू वाहतुकीवर मोठी कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईत ५ लाख ७० हजार रुपयांचा देशी-विदेशी दारूचा साठा आणि चारचाकी वाहन जप्त करण्यात आले.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली पथकाने बुब पेट्रोल पंपाजवळ सापळा रचून आरोपी योगेश अनिल कनोजे (वय ३३, रा. समता नगर) याला अटक केली. त्याच्या ताब्यातून देशी दारूचे १५ बॉक्स, विदेशी दारूचे २ बॉक्स (किंमत ६९,९२०/-) आणि चारचाकी वाहन (किंमत ५,००,०००/-) असा एकूण ५,६९,९२०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई एपीआय विजय चव्हाण, पोउनि गोपाल जाधव, दशरथ बोरकर, खुशाल नेमाडे, सुलतान पठाण, सतीश, अन्सारभाई, स्वप्नील आणि गोकुळ चव्हाण यांच्या संयुक्त पथकाने केली.

## प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यास विसर्ग सोडण्याची शक्यता

**अकोला** : अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील पूर्णा मध्यम प्रकल्पाच्या क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे प्रकल्पाच्या जलसाठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील ४८ तासांत 'पूर्णे'च्या पात्रात पाण्याचा विसर्ग सोडला जाऊ शकतो. त्यामुळे पूर्णा नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या धरणाची जलाशय पाणीपातळी ४४८.१५ मी. एवढी असून, टक्केवारी ५७.२० टक्के आहे. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सध्या होत असलेला पाऊस व पुढे होण्याची शक्यता पाहता जलसाठ्यात वाढ होऊ शकते. त्यामुळे पूर्णा नदीच्या पात्रात विसर्ग सोडण्याची शक्यता पाहता नदीकाठावरील गावकरी, मासेमार, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रात जाण्यास, नदीपात्र ओलांडण्यास मनाई करण्यात आली आहे.

# गुंटेवारी लेआउटचे काम लवकरच सुरू होणार - आयुक्तांचा विश्वास



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगर पालिकेकडून गुंटेवारी प्लॉट्सच्या लेआउट प्रक्रियेला लवकरच पुन्हा प्रारंभ होणार असल्याची माहिती मनपा आयुक्तांनी दिली आहे.ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) अकोला शाखेच्या शिष्टमंडळाने अलीकडेच महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन, बंद झालेली लेआउट प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याची विनंती केली. शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, दिनांक ३१ मार्च २०२५ नंतर ही प्रक्रिया थांबवण्यात आली होती.

त्यावेळी रमजान महिना सुरू असल्याने अनेक नागरिक आर्थिक अडचणीत होते व त्यांना प्रक्रिया पूर्ण करता आली नव्हती.

या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत मनपा आयुक्तांनी आश्वासन दिले की, लेआउटची प्रक्रिया लवकरच केवळ १० दिवसांसाठी सुरू करण्यात येणार आहे. या कालावधीत ज्या नागरिकांचे घर किंवा प्लॉटचे लेआउट शिल्लक आहे, त्यांनी ती प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या भेटीदरम्यान AIMIM अकोला शाखेचे कार्यकर्ते आसिफ अहमद खान यांनी सांगितले की, 'या दहा दिवसांत किमान १०० घरांचे लेआउट करून दाखवू,' असा विश्वास त्यांनी आयुक्तांना दिला. शिष्टमंडळात आसिफ अहमद खान, अब्दुल नासिर, अब्दुल साजिद, नदीम पठाण, मोहम्मद एजाज, शहजाद रब्बानी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## विधानसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून गदारोळ

# नाना पटोले यांचे निलंबन, आ. पठान यांच्याकडून निषेध

■ प्रतिनिधी | अकोला ■



मंगळवारी पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी एक मोठी वादग्रस्त घटना घडली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवल्यामुळे एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले. या निर्णयावर विरोधकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून, अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठान यांनी सरकारच्या या कृतीचा जोरदार निषेध केला आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नाना पटोले यांनी भाजप आमदार बबनराव लोनीकर आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या कथित अपमानासंदर्भात सभागृहात आवाज उठवला. त्यांनी सभापतींच्या आसनाजवळ जाऊन शांततामय पद्धतीने आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र सत्ताधाऱ्यांकडून त्यांचे निलंबन करण्यात आले. सत्ताधारी यांचे हे कृत्य म्हणजे लोकशाहीचा गळा दाबणारे असे आहे असा आरोप विरोधकांनी केला आहे.

आ. साजिद खान पठान यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले, 'विधानसभा हे तानाशाहीचे नव्हे तर लोकशाहीचे मंदिर आहे. जर शेतकऱ्यांच्या बाजूने बोलणाऱ्यांवर कारवाई केली जात असेल, तर हा लोकशाही आणि शेतकरी वर्गाचा अपमान आहे.'

आ. पठान यांनी सरकारकडे शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच विरोधी पक्षांना विधानसभेत संविधानिक अधिकारानुसार मोकळेपणाने बोलण्याचा संपूर्ण अधिकार बहाल करावा अशी मागणी ठामपणे मांडली. आजचा हा प्रकार सत्ताधाऱ्यांची टीका सहन न करण्याची वृत्ती दर्शवतो, अशी टीका करत त्यांनी राज्यातील जनतेने याकडे गांभीर्याने पाहावे असे आवाहन केले.

# ॲड. नकुल देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या शासन दरबारी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

भाजपाचे रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड. नकुल देशमुख यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. यावेळी त्यांच्यासोबत रिसोड पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष खरात हे होते. वाशिम जिल्ह्यात २५ व २६ जून रोजी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. पेरणी केलेली पिके खरडून गेली, शेती साहित्य वाहून गेले, अनेक गावात घरांची पडझड झाली, त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

तरी शेतकरी बांधवांचे झालेले मोठे नुकसान विचारात घेता झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी ?ड.नकुल देशमुख यांनी महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे केली. यावेळी बावनकुळे यांनी सरकार संपूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी असून, शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले. रिसोड मालेगाव विधानसभा आणि वाशिम जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्यामुळे शेतकरी बांधवांचे खरीप पिक खरडून जाऊन खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे सोबतच अनेक गावात घरांची पडझड झालेली आहे ही परिस्थिती बघता भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख नकुल देशमुख यांनी तात्काळ अधिकाऱ्यांशी संपर्क करून कोणताही शेतकरी न सुटता त्यांच्या नुकसानीचे पंचनामे करा आणि अहवाल हा तात्काळ शासनाकडे पाठवा ही तत्परता दाखवत लगेचच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची भेट घेतली आणि रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघ आणि वाशिम जिल्ह्यातील मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा महसूल मंत्री चंद्रशेखरजी यांना दिला त्यांच्या अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळे येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे चिन्ह आहेत

## टी.सी. गहाळ झाली आहे

स्वप्नील विजय जाधव (वय १७ वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा. राजगाव ता. जि. वाशिम) यांची १२वीची टी.सी. (श्री मैनागिरी महाराज क.म.टो-जुमडा) दि. ०१/०७/२०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता जुमडा येथून घरी जाताना गहाळ झाली आहे. कोणाला आढळल्यास कृपया खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

मोबा. नं. - ८६०५४७०४८१

# गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

गोविंद स्कूल अँड कॉन्व्हेन्ट कारंजा येथील नामांकित शाळेत संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अर्जुनराव पाटील चौधरी यांच्या १८व्या पुण्यतिथीनिमित्त गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. विदयार्थ्यांना शालेय जीवनात आपला हातभार लागावा ही इच्छा गोविंद स्कूल चे संस्थापक स्व. अर्जुनराव चौधरी यांची होती. व त्यांचे विचार त्यांचे तीन मुल किरण चौधरी चरण चौधरी, व संतोष चौधरी है आजही जोपासत आहे. वर्ग १० वी मध्ये प्रथम येणाऱ्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती ,वृक्षारोपण असे विविध उपक्रम आजही वडिलांच्या पुण्य स्मरणानीमित्त राबवित आहे. आज कारंजा शहरात प्रत्येक विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या हेतूने आपण आपले आयुष्य या संस्थेला अर्पण करून दोन्ही भावाना सोबत घेवून खरी शिक्षण क्रांती घडवून आणली व वडिलांचे स्वप्न पुर्ण केले .असे मत शाळेचे अध्यक्ष किरण चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणात आपले मत व्यक्त केले.

# आज साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव समितीची बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■



सामाजिक क्रांतीचे शिल्पकार, वंचित आणि शोषित समाजाच्या दुःखांना शब्दरूप देणारे, कामगारांचे नेते, थोर साहित्यिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अग्रणी डॉ. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव समिती (नोंदणी क्र. एफ-११७१९) ची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, २ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजता स्थानिक शासकीय विश्रामगृह, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याबरोबरच कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, तसेच अस्पृश्यता विरोधी आंदोलनात मोठे योगदान दिले. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंती निमित्त सर्वधर्मीय विचारांच्या योगदानातून नव्या पिढीला डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या महान कार्याचे स्मरण होण्यासाठी जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या बैठकीमध्ये समितीच्या अध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार असून, येत्या १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंती उत्सवाची रूपरेषा, नियोजन, कार्यक्रमांची आखणी तसेच विविध जबाबदाऱ्यांचे वाटप या संदर्भात सविस्तर चर्चा केली जाणार आहे. या बैठकीला जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, आजी-माजी पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषदेचे सदस्य, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच मातंग समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# पूल खचल्याने पांगरा गावाचा संपर्क तुटला



■ नासीर शेख ■

खेट्री : पातूर तालुक्यातील अतिदुर्गम पांगरा गावात

### प्रशासनाचा ढसाळ कारभार चव्हाट्यावर!

गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील पूल खचल्यावर आठवडाभर लोटूनही अधिकारी फिरकले नाहीत. ग्रामस्थांच्या विनंत्यांकडे दुर्लक्ष झाल्याने प्रशासनाच्या ढसाळ कारभाराचे उत्तम उदाहरण उघड झाले आहे.

गेल्या आठवड्यातील अतिवृष्टीमुळे मुख्य रस्त्यावरील पूल खचल्याने संपूर्ण गावाचा संपर्क तुटला असून, ग्रामस्थांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जवळपास ३५० लोकवस्ती असलेल्या पांगरा गावात जाणारा हा एकमेव रस्ता असल्याने नागरिक अक्षरशः तारेवरची कसरत करत घरापर्यंत पोहोचत आहेत.

२५ आणि २६ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पातूर तालुक्यातील ३२ गावांतील ८८७ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असून, ३५० हेक्टर क्षेत्रातील शेती खरडून गेली आहे. अनेक घरांमध्ये पाणी शिरले, तर काहींची पडझडही झाली.

'आठवडाभरापूर्वी अतिवृष्टीमुळे गावात जाणाऱ्या एकमेव रस्त्यावरील पूल खचला आहे. त्यामुळे आम्हाला मोठ्या त्रासातून जावं लागतंय. प्रशासनाचे दुर्लक्ष संतापजनक आहे.'

**श्रीचंद पवार,** ग्रामस्थ, पांगरा

परंतु या गंभीर परिस्थितीतसुद्धा आठवडाभर उलटून गेला तरी अद्याप कोणताही अधिकारी पूल पाहणीसाठी गावात पोहोचलेला नाही. ग्रामस्थांनी वेळोवेळी प्रशासनाशी संपर्क साधून पूल खचल्याची माहिती दिली, तरीही दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २१७ ■ बुधवार, २ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## भ्रष्टाचाराचे भगदाड प्रकरणी :
# राष्ट्रीय महामार्गावर दोन तास रस्ता रोको आंदोलन
### -कंत्राटदारावर कारवाई करण्याचे आश्वासनानंतर आंदोलन मागे



**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर नांदगाव चौक येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाला चार वर्षात दुसऱ्यांदा मोठे भगदाड पडले. रस्त्याच्या मधोमध पडलेले भगदाड अपघातास निमंत्रण देत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग भगदाड प्रकरणात समिती नेमून चौकशी करीत संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर तातडीने कारवाई करा याप्रमुख मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर १ जुलै रोजी पावसात दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. ठेकेदारावर कारवाई करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनाने रस्त्याच्या दोन्ही बाजून वाहतूक खोळंबली होती.

कृषी उत्पन्न बाजार समिती ते सेंट जॉन कॉन्व्हेंटपर्यंत उड्डाणपूल चार वर्षापूर्वी वाहतुकीसाठी सुरू केला. मात्र, त्यानंतर अनेकदा बंद करून वाहतूक वेगळ्या रस्त्याने वळवण्यात आली. अनेकदा पुलाची डागडुजी करण्यात आली. त्या खड्ड्यात अपघात झाला तर जबाबदार कोण असा प्रश्न विचारत यापुर्वीही महामार्ग अधिकाऱ्यांना निवेदनं देण्यात आली होती. त्याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. दुर्लक्ष केल्यामुळे आता पुन्हा हिंगणघाट शहरातून गेलेल्या राष्ट्रीय महामार्ग ४४ वर नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर दुसऱ्यांदा भगदाड पडले. आज अनेक नागरिक अपघात होता होता वाचले. राष्ट्रीय महामार्गावरील पडलेल्या भगदाडाची तात्काळ दुरुस्ती करावी व तातडीने या प्रकरणात समिती नेमून संबधीत अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्त्वात भरपावसात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग अधिकारी, तहसीलदारांनी तात्काळ आंदोलन स्थळी उपस्थित झाले.

महामार्ग अधिकाऱ्यांनी पुलाचे पूर्ण ऑडिट केले जाईल व संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई केल्या जाईल असे आश्वासन दिल्या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी शहर निरीक्षक महेश झोटिंग पाटील, विनोद वानखेडे, बालू वानखेडे, मो. रफिकभाई, सुनील डोंगरे, दशरथ ठाकरे, दिनेश देशकरी, अमोल बोरकर, मिलिंद कोपुलवार, प्रभाकर रेवतकर, आदी उपस्थित होते.

## वाहनचालकाने रचला दहा लाख रुपये चोरीचा प्लॅन
### -गाडीची ईएमआय भरण्यासाठी चोरली रक्कम



**वर्धा जनमाध्यम :** वायगाव निपाणी येथील एका किराणा व्यवसायाकाची यवतमाळ येथून रक्कम घेऊन येत असताना, वाहन चालकाने स्वतःच्या वाहनाची ईएमआय भरण्यासाठी चोरीचा प्लॅन आखला आणि नगदी रक्कम चोरीला गेली असे सांगण्यात आले होते. याप्रकरणी वाहन चालकाला अटक करीत साडे नऊ लाखांची रोकड जप्त करण्यात आली.

वायगाव निपाणी येथील किराणा व्यावसायीक अनुराग गोपलदास चांडक वय (४०) यांचे दुकानामधील किराणा साहित्य बाहेर गावी पाठवीत असतात. यवतमाळ जिल्ह्यातील खेड नेर परसोपंत या ठिकाणी कॉस्मेटिक माल घेऊन जाण्यासाठी त्यांच्या ओळखीचे वाहन मालक पवन गोपालराव ढेंगरे वय (२८) रा कारला चौक वर्धा याचे मालकीचे वाहन एम एच ३२ ए जे ३६१४ हे मालवाहतूक वाहन बोलावून घेतले. यवतमाळ जिल्ह्यात वाहन घेऊन गेले आणि तेथील व्यावसायिकाने वाहन चालकाला नगदी दहा लाख रुपये दिले. चांडक यांचे सांगण्यावरुन यवतमाळ येथून ५७ हजार८० रुपयांचे कॉस्मेटिक साहित्य खरेदी केले आणि वाहन चालक यवतमाळ वरुन वायगाव निपाणी कडे रात्रीच्या सुमारास येत असताना, त्याने चोरीचा प्लॅन आखला. आणि आरोपी वाहन चालक यांच्या जावयाने चांडक यांना भ्रमणध्वनिवर संपर्क साधून सांगितले की अज्ञात आरोपींनी चारचाकी मालवाहतूक वाहनाची अडवणूक करीत वाहन चालकाला मारहाण केली आणि नगदी रक्कम घेऊन पळ काढला अशी माहिती देण्यात आली. याप्रकरणी देवळी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली होती. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. पथकाने वाहन चालकाची कसून चौकशी केली असता, त्यात तो अज्ञात आरोपींच्या वर्तनात बदल करीत असल्याचे दिसून येताच, त्याला खाकी दाखविली आणि घटनेवरून सत्य परिस्थिती आरोपी वाहन चालकाने सांगितले. मालवाहतूक वाहनाची ईएमआय व उसनवारीवर घेतलेल्या रकमेची परतफेड करण्यासाठी हा प्लॅन आखला असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी आरोपी वाहन चालक पवन ढेंगरे याला अटक करीत ९ लाख ४२ हजार ९२० रुपये जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, पोउपनि बालाजी लालपालवाले, राहुल इटेकार, पोलीस अंमलदार चंद्रकांत बुरंगे, भुषण निघोट, अमोल नगराळे, मंगेश चौरे या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# अवैध रेती प्रकरणी तलाठी व मंडळ अधिकारीवर होणार निलंबनाची कारवाई
### -महसूल मंत्री बावनकुळें यांनी विधान परिषदेत केली घोषणा

**आर्वी जनमाध्यम :** तालुक्यातील देऊरवाडा घाटावरील अवैध रेती उपसा व साठवणूक प्रकरणी आ. दादाराव केचे यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला. प्रकरणी त्याभागातील तलाठी व मंडळ अधिकारी यांना निलंबित करण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे विधान परिषदेमध्ये १ जुलै रोजी केली.



तालुक्यातील देऊरवाडा घाटावर वर्धा नदीवर अवैध रेतीच्या मोठ्या प्रमाणावर उपसा व वाहतूक होत होती. मात्र, महसूल विभागाने कारवाई केली नाही. २६ एप्रिल रोजी आपण देऊरवाडा घाटावर जाऊन होत असलेल्या उत्खननाची पाहणी व माहिती घेतली. त्या ठिकाणी शेकडो ब्रास रेती काढलेली आढळली. बोटीच्या माध्यमातून नदी पात्रातून पाईप द्वारे रेती काढण्यात येत होती. रेतीचा उपसा करणारे साहित्य पडून होते. देऊरवाडा येथील पटवारी यांना सोबत घेऊन घाटाची पाहणी केली असता मोठ्या प्रमाणावर रेतीचे ढिगारे आढळून आले. मात्र, त्या भागातील तलाठी मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, पोलिस पाटील इतर महसूल अधिकारी असताना मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उपसा व विक्री व साठवणूक होत होती.

गोरगरिबांना घरकुलाला वाळू मिळत नाही. मात्र, रेती तस्कर मोठ्या प्रमाणावर रीतीने देऊरवाडा घाटावरून अवैध पद्धतीने रेतीचा उपसा व वाहतूक व साठवणूक करत आहे. त्यामुळे रेती तस्करावर आपण कारवाई करणार आहात का असा प्रश्न आ. केचे यांनी उपस्थित केला असता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तलाठी व मंडल अधिकारी या दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात येईल अशी घोषणा विधान परिषदेत केली. तसेच जप्त करण्यात आलेला रेतीसाठा घरकुलाकरिता देण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

# गांजाची वाहतूक करणारे दोन आरोपी जेरबंद
### -दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरात अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी नागपूर येथून दुचाकीने गांजा घेऊन येणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद करीत एक किलो गांजासह दीड लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना नागपूर- हैदराबाद मार्गाने अमली पदार्थांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच पथकाने रिमडोह परिसरातील एका हॉटेल जवळ सापळा रचला आणि आरोपी अंकित भाविक वावरे वय (१९) रा फुकटा आजनसरा ह मु शहालंगडी रोड संत ज्ञानेश्वर वॉर्ड हिंगणघाट व खेमेश भेरुदास भुते वय (२१) रा संत ज्ञानेश्वर वॉर्ड हिंगणघाट हे दोघेही एम एच ४९ बिएन ६४९८ या क्रमांकाच्या दुचाकीने नागपूर येथून १ किलो ३७ ग्रॅम गांजा हिंगणघाट शहरात विक्रीसाठी घेऊन येत होते. दोन्ही आरोपींना अमली पदार्थ गुन्ह्यांतर्गत जेरबंद करीत १ किलो गांजासह १ लाख ५० हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# कारला चौकात सि.सि.टीव्ही. कॅमेरा लावा
### -युवा संघर्ष सामाजिक संघटना पिपंरी मेघे ची मागणी

**वर्धा जनमाध्यम :-** पिपरी मेघे परिसरातील वाढती लोकसंख्या आणि दिवसेंदिवस वाढत असलेले गुन्हेगारीचे प्रमाण यावर अंकुश लागावा याकरिता कारला परिसरातील चौकात सि. सि. टीव्ही. कॅमेरे लावणाची मागणी युवा संघर्ष सामाजिक संघटना पिपरी मेघे च्या वतीने स्थानिक राम नगर पोलीस स्टेशन चे निरीक्षक भुसारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. ग्राम पंचायत पिंपरी मेघे ही जिल्ह्यातील क्षेत्रफळ आणि लोक संख्या नुसार सर्वात मोठी असलेले ग्राम पंचायत आहे, सदर ग्राम पंचायत चे हद्दीत मोठ्या प्रमाणात शाळा, महाविद्यालय, मंगल कार्यालय तसेच दाट लोकवस्ती आहे. आर्वी नाका ते जुना पाणी चौक या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते तसेच यात शाळकरी, महाविद्यालयात शिक्षण घेत असणाऱ्या मुली, नोकरी करणारा महिला वर्ग सोबतच ज्येष्ठ नागरिक रात्री उशिरा पर्यंत ये जा करताना दिसतात. परंतु या रस्त्यावर तसेच चौकात काही असामाजिक तत्वाचे लोक वावरतांना दिसून येत आहे. महिलांचे दागिने लंपास करणाऱ्या टोळी, चोरी, घरफोडी करणाऱ्या टोळी यांचा सुद्धा हौदोस वाढला आहे. मुलीची छेड काढणे, पेट्रोल पंपावर जाऊन गुंडागर्दी करणे असे प्रकार नित्याचेच झाले आहे. यामुळे परिसरातील नारिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



कारला चौक हा परिसर अत्यंत वर्दळीचा आहे आणि काही अनुचित प्रकार येथे पुन्हा भविष्यात घडू शकतात त्यामुळे अनुचित प्रकारस आळा बसवा तसेच कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी या उद्धात हेतूने कारला चौक पिंपरी मेधे या परिसरा शहरी भागाप्रमाणे पोलीस प्रशासनाच्या वतीने सि. सि. टीव्ही. कॅमेरे बसविण्यात यावा करिता परिसरातील नागरिक तसेच युवा संघर्ष सामाजिक संघटचेच्या वतीने मागणी केली आहे. यावेळी

उमेश खांडेकर, आनंद धामणकर , गजानन वानखेडे, सुधीर वसु, गजानन भातकुलकर, अतुल पिसे, हरीश कनोजे, पराग पिंपळे, रमेश आंबटकर, गजानन पुरणकर, गजानन महाजन, नुकुल वाघमारे, अनिकेत पांढरे, गजू भोयर, निखिल मस्के, प्रशिल चरडे, मुकुंद अडसड, राहुल सरोदे, महेश भस्मे, गुणवंत घसाट, भगवान गडकरी, पद्माकर खेकडे, भरत मुडे, अनिल पुरी, विकी पिंपळे, प्रणव साठवणे, रजत धुर्वे, दिनेश घोडे, मोहन मोहिते, झलके साहेब, अरविंद साहारे, पुंडलिक राऊत, शिवाजी काकर, ठाकूर, तसेच परिसरातील असंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

# खा. अमर काळे वाराणसी दौऱ्यावर
### -शिक्षण आणि क्रीडा विषयांवर महत्त्वाच्या बैठकीत सहभाग

**वर्धा जनमाध्यम :** 'शिक्षण, महिला आणि बाल कल्याण, युवा आणि क्रीडा' स्थायी समितीचे सदस्य, खा.अमर काळे हे १ जुलै रोजी वाराणसी दौऱ्यावर रवाना झाले आहेत. या दरम्यान ते राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट आणि शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्याचं या दौऱ्यात नियोजन आहे.काळे यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, केंद्रीय विद्यालय संघटना (केव्हीएस) आणि उत्तर प्रदेश सरकारच्या प्रतिनिधींसोबत बैठकीच्या चर्चेत, उत्तर प्रदेशातील शालेय शिक्षणासाठी निपुन भारत आणि इतर उपक्रमांची प्रगती, शिक्षक नियुक्ती आणि रिक्त पदांची स्थिती यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.यानंतर,युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, उत्तर प्रदेश क्रीडा विभाग, भारतीय क्रीडा प्राधिकरण (ऐंिं) आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या आणि बँकांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत, राज्यातील क्रीडा सुविधांच्या विकासात णऐं निधीचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करण्यावर चर्चा करण्यात आली.खासदार काळे यांनी सिग्रा येथील क्रीडा संकुलला भेट दिली आणि तेथील क्रीडा संरचनांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठ (ँप्ळ), घ्ध्ऊ ँप्ळ आणि घ्श्ए ँप्ळ लाही भेट दिली.त्यांनतर झालेल्या अंतिम बैठकीत उच्च शिक्षण मंत्रालय, उत्तर प्रदेश सरकारचा उच्च शिक्षण विभाग, ँप्ळ, घ्ध्ऊ ँप्ळ, घ्श्ए ँप्ळ, अलाहाबाद केंद्रीय विद्यापीठ आणि इतर संस्थांचे प्रमुख उपस्थित होते. या बैठकीत, अध्यापन, उद्योग-शैक्षणिक सहकार्य, संशोधनातील सर्वोत्तम पद्धती आणि उच्च शैक्षणिक संस्थांच्या आर्थिक आणि प्रशासकीय आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.या दौऱ्याचा उद्देश राज्यातील शिक्षण आणि क्रीडा विकासाला गती देणे आणि विविध स्तरांवर येणारे अडथळे दूर करणे आहे.



# पवनार-सेवाग्राम मार्गावर अपघातांचे सत्र कायम
## ठेकेदाराच्या हलगर्जीमुळे नागरिक त्रस्त

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्रामवरून पवनारकडे येणाऱ्या मुख्य मार्गावरील रेल्वे फाटकाजवळील पुलाखाली असलेल्या अंडरपासवर सुरू असलेल्या बांधकामामुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाल्याने अपघातांचे सत्र थांबत नसून, मंगळवार (दि. १ जुलै) रोजी दुपारी पुन्हा एकदा दुचाकीस्वार थेट खड्ड्यात गेल्याने दोघेजण जखमी झाले. ही घटना दुपारी एक वाजताच्या सुमारास घडली.

रेल्वे गेट जवळील या अंडरपास बोगद्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र ठेकेदाराने येथे कोणतेही सूचनाफलक लावलेले नाहीत. त्यातच या ठिकाणी केलेल्या खोदकामामुळे मोठे खड्डे पडले असून, पावसाळ्यात या खड्ड्यांतील माती रस्त्यावर वाहून येते. परिणामी येथे नेहमीच चिखल व घसरडे वाळलेले मातीचे थर साचलेले असतात. त्यामुळे पाऊस पडला की हा रस्ता अक्षरशः जीवघेणा ठरतो.

याच खड्ड्यात मंगळवारी एक दुचाकी चालक थेट घसरून पडला. त्याच्यासह मागे बसलेली महिलासुद्धा रस्त्यावर आदळून दोघे जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी धाव घेऊन त्यांना सेवाग्रामच्या कस्तुरबा रुग्णालयात दाखल केले. दररोज शेकडो नागरिक या मार्गाने सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयाकडे जातात. अनेक रुग्णवाहिका व रुग्णही याच मार्गाचा वापर करतात. मात्र प्रशासनाची बेफिकीरी आणि ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे येथे वारंवार अपघात होतात. या ठिकाणी पाणी बाहेर जाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने रस्त्यावर पाणी साचते. मोठमोठ्या भगदाडांमुळे दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडून ते थेट रस्त्यावर आपटतात.



स्थानिक नागरिकांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे प्रशासनाला अनेक वेळा तक्रारी करून देखील कोणतीच ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे ठेकेदाराच्या मनमानीवर नियंत्रण ठेवावे व तात्काळ रस्ता दुरुस्त करून, बांधकामस्थळी योग्य ती सूचना फलक लावावेत, नागरिकांच्या जीवावर बेतनारे हे अपघातात तात्काळ थांबावे अशी मागणी जोर धरत आहे.

# शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पन्नामध्ये भरीव वाढ होईल-पराग सोमण
### -जिल्हा परिषदेत कृषि दिन साजरा

**वर्धा जनमाध्यम -** शेतक-यांनी शेतीचा खर्च कमी करुन जास्त उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पन्नामध्ये भरीव वाढ निश्चितच होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी आज कृषि दिन कार्यक्रमात केले.

हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचा जन्म दिवस कृषि दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. आज जिल्हा परिषदच्या सिंधुताई सपकाळ सभागृहात कृषि दिन साजरा करण्यात आला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, कृषि विज्ञान केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ जीवन कतोरे, कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे, जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयाचे उपसंचालक श्री. काबंळे, कृषि व्यवसायी संघटनेचे अध्यक्ष रवी शेंडे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यामध्ये दुग्ध क्रांती घडवून आनण्यासाठी शेतक-यांनी शेतीसोबत दुग्ध व्यवसायाकडे वळावे. पारंपारिक शेती ऐवजी पिकांमध्ये बदल करुन अन्न प्रक्रिया उद्योग शेतक-यांनी सुरु करावे. कृषि शेत्रामधील नाविन्यपुर्ण बाबीची माहिती घेऊन तसेच शेती पिकांबद्दल अभ्यास करुनच शेती करावी, असे पुढे बोलतांना पराग सोमण म्हणाले.

जीवन कतोरे यांनी कापूस, सोयाबीन व तूर पिकांचे व्यवस्थापन व पिक संरक्षण तसेच शेतक-यांनी आपले उत्पन्न कसे वाढवावे याबाबत मार्गदर्शन केले

कार्यक्रमाप्रसंगी किटकनाशक फवारणी करतांना शेतक-यांनी घ्यावयाची काळजी या भिंतीपत्रकाचे मुख्यकार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच शेती मध्ये भरीव काम करुन दुस-यासाठी आदर्श निर्माण करणा-या ८ शेतक-यांचा मान्यवरांचे हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार विशाल वाघ यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# उपविभागीय अधिकारी कार्यालयात विषारी साप सोडण्याचा प्रयत्न
### -महिलांचे गटाचे कर्ज माफ करा
### -बहुजन समाज पार्टीने दिले निवेदन

**हिंगणघाट जनमाध्यम :** महिलांचे गटाचे कर्ज माफ करण्या करीता बहुजन समाज पार्टी हिंगणघाट विधानसभा यांनी उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांच्या कार्यालयात बसपाचे नितेश कांबळे व प्रलय तेलंग यांच्या नेतृत्वाखाली विषारी साप सोडण्याचा प्रयत्न केला. पण पोलिस प्रशासनाने त्यांना विषारी साप सोडू नये अशी विनंती केली त्यामुळे अनर्थ टळला. बसपा कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले निवेदनाद्नुसार वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. ९ जुन २०२५ रोजी वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर तालुक्यामध्ये मारडा गावी एका शेतकरी महिलेने आत्महत्या केली. भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर देखील बहुजन समाजाची लाडकी बहीण आत्महत्याग्रस्त का ? असा प्रश्न संपुर्ण महाराष्ट्रातील बहुजन समाजाला पडला आहे. मायक्रो फायनान्स कंपन्या बचतगटाच्या माध्यमातून



महिलांना अतिउच्च व्याजदराने कर्ज वाटप करत आहेत. तसेच काही सावकार खोट्या फायनान्स कंपन्यांना दाखवून महिलांना फसवून अमाप दराने कर्ज देत आहेत. महाराष्ट्रातील लाखो लाडक्या बहिणी अश्या नराधम सावकाराच्या तावडीत सापडल्या आहेत ही अतिशय गंभीर स्वरूपाची बाब असून महिला आता बचतगटांच्या माध्यमातून कर्जाच्या अवैध धंद्यामुळे कंटाळून आत्महत्या करायला लागल्या आहेत. हिंगणघाट शहरातील रामनगर वार्ड येथील ग्रामशक्ती मायक्रो फायनान्स बँकचे कर्मचारी महेश भुजाडे व मॅनेजर व अन्य सावकाराच्या त्रासाला कंटाळून समुद्रपूर तालुक्यातील मारडा येथील महिलेने आत्महत्या केली. अश्या मायक्रो फायनान्स कंपन्या व अवैध सावकाराच्या वर त्वरित कार्यवाही करावी तसेच सर्व लाडक्या बहिणीचे कर्ज माफ करून शासकीय योजनेतून सरकारी अनुदानित कर्ज सुविधा उपलब्ध करून द्यावी अन्यथा बहुजन समाज पार्टी हिंगणघाट विधानसभा द्वारा मायक्रो फायनान्स कंपन्या व अवैध सावकाराच्या कार्यालयात विषारी साप सोडून तीव्र जनआंदोलन करेल असा ईशारा बहुजन समाज पार्टी हिंगणघाट विधानसभा द्वारा देण्यात आला. सदर निवेदन देताना नितेश कांबळे, प्रलय तेलंग,सुदेश जवादे, गणेश बावणे, मोरेश्वर जवादे, प्रदीप हाडके, अशोक कांबळे, सेवक वानखेडे, रवींद्र भगत, प्रकाश नगराळे, अशोक मुन सेवकभाऊ वानखेडे, आवारी पाटील, प्रकाश पाणबुडे, राहुल मून, रामुजी वासेकर, बंदुजी थूल, भीमराव मुन, व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.


# जिल्हा सांख्यिकी कार्यालयात राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा

**वर्धा जनमाध्यम -** जिल्हा सांख्यिकी कार्यालयात जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुध्द राजुरवार यांच्या अध्यक्षतेखाली जी.एस.कॉमर्स कॉलेजच्या प्राध्यापक राधा तिवारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसचांलक प्रदीप पाटील यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

विश्वविख्यात संख्याशास्त्रज्ञ स्वर्गीय प्राध्यापक प्रशांत चंद्र महालनोबीस यांच्या जयंती निमित्त हा दिवस साजरा करण्यात येतो. विकास उद्दिष्टांचे विविध पैलू व सांख्यिकीमध्ये त्याचा वापर अधोरेखित करण्यासाठी सांख्यिकी एवं कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय यांच्याकडून दरवर्षी एक मध्यवर्ती संकल्पाना निवडली जाते. या वर्षीचा राष्ट्रीय सांख्यिकी दिन राष्ट्रीय नमुना पाहणीची ७५ वर्ष या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारीत होता.

यावेळी प्रा राधा तिवारी यांनी सांख्यिकीचे प्रशासनातील, धोरण निर्मितीत व विकासाच्या मोजमापातील महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रदीप पाटील यांनी राष्ट्रीय सांख्यिकी दिनाचे ऐतिहासिक व सामाजिक महत्व यावर मार्गदर्शन केले. अनिवृध्द राजुरकर यांनी कर्मचा-यांना सांख्यिकीय गुणवत्ता व अचुकतेचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक संशोधन अधिकारी सुनीता आढाव यांनी केले तर आभार दिवाकर वानखेडे यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा सांख्यिकी कार्यालयातील कर्मचारी कल्पना पाठरावे, उमेश बावणेर तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# महसूल राज्यमंत्री योगेश कदम वाळू चोर?



## ■ आ.परब यांचा विधान परिषदेत पटलावर आरोप

### ■ राज्याचे गृह तथा महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे गृह तथा महसूल राज्यमंत्री योगेश कदम हे वाळू चोर असल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी मंगळवारी विधान परिषदेत बोलताना केला. या प्रकरणी त्यांनी योगेश कदम यांच्या चोरीचे ठोस पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा केल्यामुळे या प्रकरणाचे गांभिर्य वाढले आहे. दरम्यान, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे या प्रकरणी कदम यांच्यावर कारवाई करणार का? असा सवालही त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे. त्यात ठाकरे गटाचे विधान परिषदेतील आमदार अनिल परब यांनी राज्याचे महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर वाळू चोरीचे गंभीर आरोप केले. ते म्हणाले, चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पोलिसाला निलंबित करण्याचे अधिकार आहेत. कोणत्याही लोकसेवकाने गुन्हा केल्यास त्याच्यावर कारवाई करता येते. आमदार व मंत्रीही लोकसेवकाच्या व्याख्येत बसतात. महसूल राज्यमंत्र्यांनी (योगेश कदम) वाळू पकडल्याची ५ प्रकरणे मी तुम्हाला (बावनकुळे) पुढील ३ दिवसांत देतो. त्याचे पुरावेही सादर करोत. त्यांच्यावर कारवाई करून हे राज्य सरकार आपला कणखरपणा दाखवणार आहे का? असा प्रश्न अनिल परब यांनी केला आहे. महसूल राज्यमंत्र्यांनी वाळू पकडली. ती वाळू तुमच्या सरकारच्या धोरणानुसार तहसीलदारांकडे द्यायला हवी. त्यापैकी ५ ब्रास वाळू गरिबांना द्यायला हवी. पण इथे तसे झाले नाही. त्यामुळे माझा साधा प्रश्न आहे की, जी हिंमत एक कणखर महसूलमंत्री तलाठी, तहसीलदार व आरटीओ अधिका-यांच्या बाबतीत दाखवतात, ती हिंमत ते महसूल राज्यमंत्र्यांच्या बाबतीत दाखवतील का? असे देखील अनिल परब म्हणाले.

महसूल मंत्र्यांनी संबंधित ठिकाणाला भेट दिल्याचे पुरावे, तिथल्या नोंदी व अहवालांची कॉपी मी सभागृहाला देतो. त्यानंतर महसूल राज्यमंत्र्यांना निलंबित कराल का? त्यावेळी हिंमत दाखवाल का? माझा महसूल मंत्र्यांना प्रश्न आहे की, आमच्यावर कारवाई करताना जी हिंमत दाखवता, ती महसूल राज्यमंत्र्यांच्या बाबतीत दाखवाल का? छोटी चिलटे मारू नका. मोठा गडी मारा. असे केल्यास आम्ही तुमच्या हिंमतीची दाद देऊ. तुम्ही ताकदवान नेते आहात. आज तुमच्या माध्यमातून सभागृहाला नव्हे तर महाराष्ट्राच्या संपूर्ण १२ कोटी जनतेला कळू द्या की, महसूल राज्यमंत्र्यांची चोरी असेल तर ती आम्ही मान्य करणार नाही. सरकारचा कणखरपणा दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे, असे अनिल परब यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना उद्देशून म्हणाले.



## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना विधानभवन येथे अभिवादन

**मुंबई :** महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवन येथे विनम्र अभिवादन केले. विधानभवन प्रांगणातील स्व. वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास तसेच प्रतिमेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आदी मान्यवरांनीही पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्ताने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पटोले विधानसभेतून एका दिवसासाठी निलंबित

### विधानसभा अध्यक्षांनी केली कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांना एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही कारवाई केली. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विधानाचा मुद्दा नाना पटोलेंनी विधानसभेत उपस्थित केला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतक-यांची माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई केली.विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर दुस-या विषयाचे काम सुरू झाले असताना नाना पटोले यांनी बबनराव लोणीकर आणि कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतक-यांबद्दल केलेल्या विधानांबद्दल संताप व्यक्त केला. मोदी तुमचे बाप असतील, राज्यातील शेतक-यांचे नव्हे, असे म्हणत पटोले सभागृहात संतापले. माणिकराव कोकाटे आणि बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विधानांबद्दल मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतक-यांची माफी मागावी अशी मागणी नाना पटोले यांनी केली. त्यावरून सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. त्यामुळे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करावे लागले.

**विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार**

कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांची माफी मागावी अशी मागणी लावून धरली. नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार हे त्यांच्या आसनावरून उठून विधानसभा अध्यक्षांच्या आसनापर्यंत गेले. नाना पटोलेंनी राजदंडालाही हात लावला. अध्यक्षांच्या समोर उभे राहून माफीची मागणी केली. त्यानंतर सत्ताधारी चांगलेच आक्रमक झाले.

दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस आणि सत्ताधारी मंत्री, आमदार आक्रमक झाले. विधानसभा अध्यक्ष राहिलेल्या माणसाने विधानसभा अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे बरोबर नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. विरोधकांचा गोंधळ वाढल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांना एका दिवसासाठी निलंबित केले. मात्र, विरोधी पक्षातील आमदार माफी मागण्याच्या मुद्यावर आक्रमक झाले. घोषणा दिल्या. त्यामुळे काही काळ गोंधळ सुरू होता. त्यानंतर विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार टाकला.

## प्रदूषित पाणी थेट नदी, नाल्यांमध्ये सोडणा-या उद्योगांवर कडक कारवाई करणार-मंत्री मुंडे

**मुंबई/प्रतिनिधी :**ज्या औद्योगिक घटकांकडून दूषित पाणी थेट नदी, नाल्यांमध्ये सोडले जाईल, अशा उद्योग घटकांवर कडक कारवाई केली जाईल, असे पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितलेसदस्य भास्कर जाधव यांनी लोटे ( ता. खेड, जि. रत्नागिरी ) येथील औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य अबू आझमी, शेखर निकम, सुनील प्रभू, मनीषा चौधरी, योगेश सागर यांनी सहभाग घेतला. मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, जे उद्योग प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया न करता नदी नाल्यात सोडतात अशा उद्योगांना प्रथम नोटीस दिली जाते. नोटीस दिल्यानंतर त्यांच्यात सुधारणा झाली नसल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जात आहे.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांना लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांच्या केलेल्या स्थळ पाहणीच्यावेळी दोषी आढळलेल्या मे. रिव्हरसाईड इंडस्ट्रीज या उद्योगास पर्यावरण संरक्षण कायद १९८६ व घातक घनकचरा अधिनियम अंतर्गत निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या उद्योगाला १८ जून रोजी बंद करण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. उद्योग घटक कितीही मोठा असला तरी प्रदूषणाचे नियम तोडले जात असतील तर कोणाचीही गय केली जाणार नाही. या संदर्भात लवकरच एक बैठक घेतली जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## नागपूर विभागातील शालार्थ लॉगिन गैरवापर प्रकरणाची सखोल चौकशी सुरू

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर विभागात शालार्थ प्रणालीच्या लॉगिन आयडीचा गैरवापर झाल्याच्या प्रकरणाची सखोल चौकशी विशेष तपासणी पथक तसेच शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांमार्फत सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली. विधानसभेत सदस्य अजय चौधरी यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली. या चर्चेत सदस्य नरेंद्र भोंडेकर, प्रशांत बंब, काशिनाथ दाते, प्रवीण दटके, सुरेश भोळे, मुफती महोम्मद इस्माईल अब्दुल खालिक या सदस्यांनी सहभाग घेतला.



मंत्री श्री. भुसे म्हणाले, यामध्ये दोषी आढळणा-या कोणत्याही व्यक्तीला पाठीशी घालण्यात येणार नाही. आतापर्यंत या प्रकरणात १९ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून यामध्ये वरिष्ठ शासकीय अधिकारी, संस्था चालक आणि संचालक यांचा समावेश आहे. या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी संचालक योजना यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे.

## जलसंधारण खात्याच्या रिक्त पदांच्या भरतीस गती; 8,767 पदांना मान्यता

### मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड

**मुंबई/प्रतिनिधी :** जलसंधारण विभागाला नव्याने ८,७६७ पदांचा आकृतीबंध तयार करून तो वित्त विभागाकडे सादर करण्यात आला होता. या सर्व पदांना आता हाय



पॉवर कमिटीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आता लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ही भरती प्रक्रिया जलदारित्या राबविली जाईल, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात दिली. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तसेच सदस्य प्रज्ञा सातव, अभिजित वंजारी, अनिल परब यांनी यासंदर्भातील लक्षवेधी उपस्थित केली होती.मंत्री श्री. राठोड म्हणाले, की २०१७ साली जलसंधारण विभागाची स्वतंत्र निर्मिती झाली. त्यावेळी १६,४९९ पदांचा आकृतीबंध मंजूर झाला होता. त्यातील ९,९६७ पदे कृषी विभागाकडून आणि ६,५१२ पदे जलसंपदा व ग्रामविकास विभागाकडून वर्ग होणे अपेक्षित होते. मात्र, कृषी विभागाकडून केवळ २,१८१ पदांचीच मंजुरी मिळाली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.मंत्री श्री.राठोड यांनी जाहीर केले की, या नव्या पदांच्या माध्यमातून विभागाची रचना अधिक सक्षम केली जाणार असून, छत्रपती संभाजीनगर येथे अप्पर आयुक्तांचे नवीन कार्यालय स्थापन केले जाईल. तसेच पालघर, वर्धा, सिंधुदुर्ग, लातूर, कोल्हापूर, रत्नागिरी आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये जिल्हा जलसंधारण अधिका-यांची नवीन कार्यालये सुरू केली जातील. आज जर महाराष्ट्र सुजलाम-सुफलाम करायचा असेल, तणावमुक्तकरायचा असेल, तर जलसंधारण विभागाला बळकटी देणं आवश्यक आहे. त्यासाठी ही पदभरती आवश्यक असल्याचे मंत्री श्री.राठोड यांनी नमूद केले.

## घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू तहसीलदारार्फत मोफत मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्य शासनाने राज्यात एक व्यापक वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.विधानपरिषद सदस्य सर्वश्री दादाराव केचे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. वर्धा जिल्ह्यातील देउरवाडा येथे अवैध वाळू साठ्याचा तपास केला होता. त्यानंतर



संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यांमध्ये नदीतून चोरटी वाळू काढण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी ड्रम, पाईप, चाळण्या, टोपले आदींचा समावेश आहे. या प्रकारावर कारवाई करताना संबंधित व्यक्तींना अटक करण्यात आली असून, शासनाच्या सूचनेनुसार दोषी तलाठी व महसूल निरीक्षकांना निलंबित करण्यात येणार असल्याचेही महसूल मंत्र्यांनी यावेळी सांगितले. शासनाने वाळू चोरी रोखण्यासाठी आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात एम.सी.आर.डी.ओ. धोरण लागू करून प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे



नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होईल आणि वाळूचा तुटवडा कमी करून काळाबाजाराला आळा बसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.स्थानिक ग्रामपंचायती, नगरपंचायती व खासगी बांधकामांसाठी देखील ठराविक दराने वाळू उपलब्ध करून देण्याची योजना असल्याचे सांगून महसूलमंत्री श्री.बावनकुळे म्हणाले की, या सर्व प्रक्रियेचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले असून, हे पोर्टलमार्फत पारदर्शकपणे राबवले जाणार आहे. गृह व महसूल खात्यांनी संयुक्तनिर्णय घेतला आहे की, वाळू चोरीसंदर्भात महसूल किंवा पोलीस यांपैकी कोणाकडेही गुन्हा दाखल झाला असेल तरी दोन्ही विभाग हे संयुक्तकारवाई करतील, असे श्री.बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## नागपूरच्या गोरेवाडा प्राणी संग्रहालयात लवकरच अनुभवता येणार 'आफ्रिकन सफारी'

**मुंबई/प्रतिनिधी :**नागपूर येथील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयात आता आफ्रिकन सफारी अनुभवता येणार आहे. गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी विकसित करण्यासंदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड आणि नॅशनल बिल्डिंग कंन्ट्रक्शन कार्पोरेशन (एनबीसीसी -क्ष्द-ड्डत्त्) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. विधानभवनातील समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात एनबीसीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक के.पी.एम. स्वामी, कार्यकारी संचालक प्रविण डोईफोडे आणि महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नरेश झुरमुरे, एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखरन बाला यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे आदी यावेळी उपस्थित होते.गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी सुरु करण्यासंदर्भात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी निर्देश दिले होते. त्या नुसार आफ्रिकान सफारी आणि प्रवेशद्वारावर प्लाझा विकसित करण्यात येणार आहे.या प्रकल्पाअंतर्गत गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील सुमारे ६३ हेक्टर जागेवर आफ्रिकन सफारी



विकसित करण्यात येणार असून, सुमारे २२ आफ्रिकन प्रजातींचा समावेश या भागात असणार आहे. तसेच प्रवेशद्वाराचेही काम करण्यात येणार आहे. सुमारे २८५ कोटींचा हा प्रकल्प असून ही कामे १८ महिन्यांत हे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही आफ्रिकन सफारी पूर्णत्वास गेल्यानंतर नागपूर हे प्राणीसंग्रहालय पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाणार असून, पर्यावरण जागरूकता व जैवविविधतेचे संवर्धन यास चालना मिळणार आहे.

***प्रकल्पाची पार्श्वभूमी :*** प्राणीसंग्रहालयातील इंडियन सफारीचे काम आधीच पूर्ण झाले असून, २६ जानेवारी २०२१ रोजी त्याचे लोकार्पण करण्यात आले होते. आता दुस-या टप्प्यात आफ्रिकन सफारी तयार होणार आहे. एनबीसीसी या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेमार्फत हे बांधकाम करण्यात येणार आहे.

बेटांवरील प्राणी दर्शन (मॉटेड आयलँड एक्झिबिट) ठिपकेदार तरस, पांढराशिंगी गेंडा, पाटस मंकी, रेड रिव्हर हॉग, आफ्रिकन सिंह, चिंपांझी, हमाड्रायस बबून, चिता. मोकळ्या परिसरात मुक्तपणे वावरणारे प्राणी -शहामृग, पाणगेंडा, इम्पाला हरण, जेम्स बाक, कामन ईलंड ब्लू विल्डबीस्ट, जिराफ, बर्चेल्स झेब्रा, कुडू हे प्राणी या उद्यानात असणार आहेत.

## अधिवेशनातून

### अन्नपदार्थांची सेवा देणा-या ऑनलाईन कंपन्यांसाठी लवकरच टोल फ्री क्रमांक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अन्नपदार्थाच्या घरपोच सेवा (ऑनलाईन) देत असलेल्या कंपन्यांच्याबाबत नागरिकांना तक्रारी दाखल करण्यासाठी विभागाकडून लवकरच टोल फ्री क्रमांक घोषित करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले. विधान परिषद सभागृहात अन्नपदार्थांची घरपोच सेवा देणा-या ऑनलाईन कंपन्यांबाबत लक्षवेधी सदस्य संदीप जोशी यांनी मांडली होती. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य एकनाथ खडसे, सत्यजित तांबे, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.परिणय फुके, सदाशिव खोत आदींनी यावेळी चर्चेत भाग घेतला. मंत्री श्री. झिरवाळ म्हणाले, राज्यात अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नियम व नियमने मधील तरतुदींनुसार नियमानुसार झेप्टो, स्वीगी, झोमॅटो इत्यादी कंपन्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. एकूण ४३ अन्न ई-कॉमर्स आस्थापनांपैकी सखोल तपासणी दरम्यान अस्वच्छता तसेच गोदामात मुदत संपलेले खाद्यपदार्थ आढळून आले. या गभीर त्रुटींच्या पार्श्वभूमीवर तत्काळ कारवाई करण्यात येत आहे. ३४ अन्न आस्थापनांना त्रुटींच्या सुधारणा नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. एक परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली असून पाच अन्न आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंत्री श्री.झिरवाळ म्हणाले, ई-कॉमर्स आस्थापना या केंद्रीय परवानाधारक आस्थापना असून सदर आस्थापनांच्या गोदामांसाठी राज्याचा परवाना देण्यात येतो. या गोदामांच्या तपासण्या वाढविण्यात येत आहेत.

### बीड लैंगिक अत्याचार प्रकरणात 'एसआयटी'स्थापन करण्यात येणार

**मुंबई/प्रतिनिधी :**बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटीची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणा-या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.

### अधिक व्याजाचे आमिष देणा-या योजनांविरोधात पोलिसांची विशेष मोहीम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अधिक व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणा-या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले.याबाबत सदस्य भिमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य नाना पटोले, जितेंद्र आव्हाड यांनी उपप्रश्न विचारले.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागरिकांनी गुंतवणूक करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक परवाने, नोंदणी व अधिकृत मंजुरी आहेत की नाही, याची खातरजमा करावी. कोणतेही अतिरिक्त लाभाचे किंवा अधिक व्याजाचे आमिष दाखवणा-या योजनांपासून दूर राहावे. अशा योजनांमार्फत फसवणुकीचे प्रकार घडू नयेत याकरिता फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट कार्यरत करण्यात आले असून, संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे. टोरस कंपनीविरोधात आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणी शासनाने कारवाई सुरू केली असून, मागील तीन महिन्यांपासून एमपीआयडी कायद्यान्वये कंपनीची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी दिली.

### मुंब्रा येथील अल्पवयीन मुलीवरील हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात जाणार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंब्रा येथे अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार आणि तिची निर्घृण हत्या ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले. या गुन्ह्याचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडितेला न्याय मिळावा, यासाठी हे प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यात येईल, असेही गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य देवयानी फरांदे यांनी प्रश्न उपस्थित केला. गृहराज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडी मध्ये आहे. फ?रेन्सिक तपास अहवाल निश्चित वेळेत प्राप्त व्हावा, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

### एस.टी महामंडळाच्या सल्लागार संस्थेच्या सल्लागारांविरुद्ध कारवाई करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडील कामकाजासाठी सल्लागार म्हणून नियुक्त कंपनीच्या सल्लागारांविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. याबरोबरच एस. टी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता खात्यामार्फतही स्वतंत्र चौकशी करण्यात येत आहे. या चौकशीचा अहवाल आल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.या संदर्भात सदस्य अभिजीत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले, मे. के. पी. एम. जी. या सल्लागार संस्थेच्या सल्लागारांविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गैरव्यवहाराच्या आरोपावरून चौकशी सुरू आहे. सल्लागार संस्थेला तालिकाबद्ध करणा-या माहिती व तंत्रज्ञान विभागाला याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच या संदर्भात गुन्हा दाखल झाला असून चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला एस. टी. महामंडळमार्फत आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.



### महाराष्ट्र लोकसेवा आयोगात नवीन सदस्यांची नियुक्ती

#### राजीव निवतकर व महेंद्र वारभुवन यांचा शपथविधी संपन्न

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यशासनाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगावर (एम.पी.एस.सी) राजीव निवतरकर, दिलीप भुजबळ-पाटील व महेंद्र वारभुवन यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, राजीव निवतकर आणि महेंद्र वारभुवन यांनी सदस्य पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतली. आयोगाचे अध्यक्ष रजनीश सेठ यांनी नवीन सदस्यांना शपथ दिली. आयोगाच्या बेलापूर, नवी मुंबई येथील मुख्यालयात हा शपथविधी सोहळा पार पडला. याप्रसंगी आयोगाचे सदस्य अभय वाघ आणि सतिश देशपांडे यांच्यासह आयोगाच्या सचिव सुवर्णा खरात, सहसचिव तथा परीक्षा नियंत्रक सरिता बांधेकर- देशमुख, उपसचिव मा. पां. जाधव उपस्थित होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## त्रिभाषा धोरणाला तिलांजली

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या हिंदी भाषा समावेशाच्या वादावर आता जवळपास पडदा पडला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याबद्दलचे दोन शासकीय आदेश रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली असून, त्रिभाषेच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी अर्थतज्ज्ञ आणि माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. ही स्थगिती, तसेच स्थापन केलेली नवीन समिती याचाच अर्थ नवीन शैक्षणिक वर्षात त्रिभाषा धोरण नसेल. त्यामुळे पहिलीच्या विद्यार्थ्यांवर तीन-तीन भाषा शिकण्याचे ओझे नसेल. विद्यार्थी व पालकांच्या दृष्टीने ही आनंदाचीच बातमी; पण 'स्थगिती'ऐवजी पहिलीपासून हिंदीची अनिवार्यता कायमची जावी, अशी मागणी आहे. हा निर्णय रद्द झाला आहे, असे आम्ही गृहीत धरतो. त्यामुळे आता समितीचा घोळ घालू नये; अन्यथा समितीला काम करू दिले जाणार नाही, असे मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी सुनावले आहे.मनसेने एप्रिलमध्येच या धोरणाविरोधात चढा सूर लावला आणि त्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना, काँग्रेस, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही विरोध केला. आता सरकारच्या निर्णयामुळे ठाकरे बंधूंनी नियोजित मोर्चा मागे घेतला. त्रिभाषा सूत्रानुसार वास्तविक ही सक्ती नसून, अन्य भाषांचा पर्यायही उपलब्ध आहे. गरज पडल्यास, तिसरी भाषा म्हणून विविध भाषांच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल, ही सरकारची भूमिका होती; पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंदी पहिलीपासून नव्हे, तर पाचवीपासून शिकवावी, असे मत जाहीरपणे मांडले होते. तसेच, हिंदीचा मुद्दा रेटला तर त्याचा येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुका आणि खासकरून मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीला तडाखा बसेल, अशी भीती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, तसेच अन्य काही मंत्र्यांनीही व्यक्त केली होती. त्यामुळेच अखेर त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत १६ एप्रिल आणि १७ जून रोजी काढलेले दोन्हीही शासकीय आदेश रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.नवीन शिक्षण धोरणात पहिली व दुसरी हा बालशिक्षणाचा भाग करण्यात आला आहे. बालशिक्षण हे अनौपचारिक शिक्षणाचे अंगण असून, ते पुढील शिक्षणासाठी आणि आयुष्य जगण्यासाठी लागणाऱ्या क्षमतांच्या विकासाचे क्षेत्र आहे. या उमलत्या वयात मुलांच्या मनावर कुठल्याही प्रकारचा ताण असू नये, तर ते आनंदाने, हसतखेळत शिकण्याचे क्षेत्र आहे, असे मानले जाते. म्हणजेच त्या वयात मुलांमध्ये शिकण्याची आणि अभ्यासाची आवड निर्माण केली जाते. या वयात मुलांना सक्तीने किंवा हट्टाने एखादी भाषा शिकवणे हे योग्य नाही. त्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाची नावड निर्माण होऊ शकते. मुळात पहिलीतील मुले अगदी लहान असतात. एका ठिकाणी चार-पाच तास बसणे त्यांच्या दृष्टीने कठीण असते. त्यांना एकदम बरेच विषय शिकावे लागतात आणि त्यातच तीन-तीन भाषा शिकाव्या लागणे, हे अशैक्षणिक आणि अन्यायकारक आहे.खरे तर, इयत्ता चौथीपर्यंत सर्व विषय हे मातृभाषेतच शिकवायला पाहिजेत. कारण, पहिल्या चार वर्षांत शाळेची सवय होते, शारीरिक क्षमता वाढते, आकलनाचा पाया मजबूत होतो आणि मातृभाषेत शिकल्यामुळे विषय नीट समजतो. मध्येच दुसरी भाषा आली, तरी मुला-मुलींच्या ग्रहणक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. लहान मुलांना एकाच भाषेत आणि तेही मातृभाषेतच शिकवले पाहिजे, असे आचार्य विनोबा भावे, तसेच आचार्य जावडेकर यांचेही मत होते. मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांच्या मते, मूल पहिल्यांदा इतरांना बोलताना पाहत असते. आई गाणी म्हणते, आजी काही तरी बोलत असते, याचे निरीक्षण लहान मूल करत असते. त्याला लीपरीडिंग, म्हणजे ओष्ठवाचन म्हणतात. यानंतर उच्चार करण्याचा आणि त्याच पद्धतीने बोलण्याचा प्रयत्न ते करते; मग ते वाचू लागते. यानंतर समोर दिसणारे अक्षर आणि कानवळणी पडलेल्या उच्चारांची सांगड घालण्याचा प्रयत्न करते; मग पुढे शेवटच्या टप्प्यात लिहायला लागते.भाषाशास्त्रानुसार, मुलाच्या आकलनाचे ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे असे टप्पे असले पाहिजेत. भाषेचे आकलन नीट व्हावे, म्हणून चौथीपर्यंत सर्व विषय मातृभाषेतच शिकवायला हवेत. विद्यार्थी पाचवीत गेल्यानंतर त्याला दुसरी भाषा शिकवावी व आठवीत गेल्यावर तिसऱ्या भाषेचे ज्ञान द्यावे, असेही श्रीमती भवाळकर व अनेक शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे. मात्र, महाराष्ट्रात पहिलीपासून इंग्रजी शिकवली जाते आणि त्यास कोणाचाही विरोध नाही. कारण, इंग्रजीशिवाय उच्च शिक्षण घेणे व चांगली नोकरी मिळणे अशक्य आहे, हे लोकांना कळले आहे. त्यामुळे शिक्षणतज्ज्ञांचे मत काहीही असले, तरी इंग्रजीला लोकांचा विरोध नाही. हिंदीला मात्र आहे. आता सरकारने माघार घेतल्यामुळे विरोधकांचा मोर्चा रद्द झाला आहे. त्याऐवजी विजयी मेळावा घेतला जाणार आहे. त्रिभाषा सूत्रासंदर्भात उद्धव ठाकरे सरकारने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञांची समिती नियुक्त केली होती.हिंदी व इंग्रजी भाषा पहिलीपासून सक्तीची करण्याची शिफारस समितीने केली होती आणि ठाकरे यांनी तो अहवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्वीकारला होता, याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनीच दिली आहे. म्हणजे जो अहवाल स्वीकारला, त्यावरच सरकारबाहेर पडल्यानंतर ठाकरे प्रभृतींनी टीका करण्यास आरंभ केला आहे. त्यावरून सुरू असलेले राजकारण त्याहून चिंता वाढवणारे आहे. मात्र, मुळात त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यापूर्वी ते कशासाठी आहे, याचे प्रबोधन गरजेचे होते. या शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्याला काय हवे याचा साकल्याने विचार कधी होणार? तो केला गेला असता, तर विद्यार्थी व पालकांच्या मनातही इतका गोंधळ निर्माण झाला नसता. शालेय शिक्षणासंबंधीचे निर्णय अधिक विचारपूर्वक आणि सर्व अंगाने विचार करून घेतले जाणे अपेक्षित असते, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

# हिंदीवरून महाराष्ट्रातील तिखट तथ्य !

**सरकारने वेळीच सावध होऊन हिंदीबाबतचा निर्णय मागे घेऊन विरोधकांची हवा काढली असली तरी हा निर्णय मागे घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान मात्र नक्की केले आहे.सरकारने ठाम रहायला पाहिजे होते.**

मागील दोन आठवड्यात महाराष्ट्रात हिंदीवरून रणकंदन माजले होते.ज्यांची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकली ते नेते हिंदीला विरोध करुन राजकारण करताहेत हे समजण्याइतपत महाराष्ट्र दूधखुळा नाही.सत्तेवर असतांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा सूत्र ज्या उध्दव सरकारने स्विकारले तेच आता शिर्षासन करू लागले.आंदोलनाची भाषा करीत महाराष्ट्राला अस्थिर करण्याचा राजकीय डाव मराठी माणसाच्या लक्षात आलेलाच होता.त्यात सरकार हिंदीबाबत निर्णय मागे घेऊन या आंदोलनजिवींची हवाच काढून टाकण्याचा आनंद घेत आहे.आणि उलटपक्षी आंदोलनजीवी मात्र सरकार झुकले,आम्ही जिंकलो या दिवास्वप्नात राहून विजयी सभा घेण्याचा विचार करीत आहे.

राष्ट्रीय धोरण केवळ ६६ पानी आहे.ते जर निट वाचले तर धोरणाचे ध्येय 'चारित्र्यसंपन्न मनुष्यनिर्माण' आहे.ऐहिक सुखासोबत पारलौकिकाचा विचार करणारे,भारतीय संस्कृतीची अनुभूती देणारे असे धोरण आहे.'भारतात शिक्षण आणि शिक्षणात भारत' असा उदात्तहेतू त्यात आहे.मेकॅलोचा भोगवाद संपवून राष्ट्रवाद पुढील पिढीने स्विकारावा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.त्यासाठी हजारो शिक्षणतज्ज्ञांनी रात्रंदिवस मेहनत घेतली आहे.

९५००० गावापर्यंत पोचून,२५ कोटी लोकांचे मत घेऊन,९०० विद्यापीठातील ४४ हजार महाविद्यालयात चर्चासत्रे घेऊन हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार होऊन संसदेत मांडले आहे.त्याचा काहीही विचार न करता स्वतःची मुले इंग्रजीशाळेत शिकविणारे राजकीय कोल्हेकुई करताहेत.

मुळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात२९ जुलै २०२० लाच भाषा धोरणही विदित केले आहे.प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच सक्तिचे केले आहे.त्यामुळे महाराष्ट्रात मराठी भाषा अत्यावश्यकच ठरणार आहे.म्हणजे महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण घेणारे मग ते गुजराथी असोत की तामिळ,काश्मिरी असोत की कन्याकुमारी त्यांना मराठीतूनच शिकावे लागणार हे नक्की. राहिला प्रश्न त्रिभाषा सुत्राचा.सोप्या शब्दात विचार केला तर यात मराठी सोबत इतर दोन भाषा शिकवणे.हिंदीला विरोध करणारे सोयीस्कर इंग्रजीला विसरतात.इंग्रजी ही भाषा जगात




सर्वत्र बोलली जात नाही.फार कमी देशात ही भाषा बोलली जाते.जापान मध्ये तर इंग्रजी नाहीच तरी देखिल त्यांचे काहीच अडत नाही.

राष्ट्रभाषा हिंदीला विरोध करणारे इंग्रजीवर मूग गिळून बसलेत.इंग्रजीऐवजी हिंदी का नको?पण यांना केवळ राजकारण करायचे आहे.असो.त्यांना करू द्यात राजकारण पण वस्तुस्थिती ही आहे की मराठी सोबत इंग्रजी आणि हिंदी असण्याला महाराष्ट्रात कोणत्याही पालकाचा विरोध नाही.

पुर्वी हिंदी हा विषय पाचवी पासून होताच.आता तो प्राथमिकस्तरावर देखिल ऐच्छीक केला.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ज्याला आपण खेळगट,बालक मंदिर,पुर्वप्राथमिक म्हणायचो ज्याला इंग्रजी माध्यमात नर्सरी,लोकेजी,युकेजीही म्हणतो असे तीन वर्ग आणि पहिला दुसरा वर्ग असे एकूण पाच वर्ग म्हणजे फाऊंडेशन स्टेज असणार आहे.हे पायाभूत शिक्षण दप्तरविरहित राहाणार आहेत.हे पाच वर्ग पायाभूत असून वय वर्ष तीन ते आठ हे पाच वर्ष केवळ अनुभवातून शिक्षण राहाणार आहे. लिखाणकाम, गृहपाठ हे काहीच राहणार नाही. केवळ शब्द,अंक या अनुषगाने अध्ययन राहाणार आहे.सर्व शिक्षण आनंददायी आणि अनुभूतीवर असणार आहे.त्यामुळे दुसरीपर्यंत तणावविरहित शिक्षण त्यांना मिळणार आहे.पुर्वी पाचवीपासून हिंदी होतीच.आता दुसरीपर्यंत दप्तर नाही.म्हणजे फक्त तिसरी आणि चौथी हिंदी जादा विषय राहिल.ते फार अडचणीचे नाही.

पण केवळ राजकीय पोळी भाजण्यासाठी हिंदीचे स्तोम माजविण्याचा प्रयत्न सुरु आहे.भारतात तर हिंदी आलीच पाहिजे.एव्हढे मोठे मराठा आंदोलक श्री.मनोज जरांगे पण हिंदी वृत्तवाहिन्यावर बोलतांना त्यांची वाट लागत होती.बर!याही उपर पाहिले तर महाराष्ट्र शासनाने हिंदी अत्यावश्यक केली नव्हती तर ती ऐच्छीक ठेवली होती. अठरा भाषांचे ज्ञान असणारे पी.व्ही.नरसिंहराव, बारा भाषांचे ज्ञान असणारे कुप्प.सी.सुदर्शनजी हे जगात आदर्श ठरले.आपण मात्र हिंदी नको करत आरडा ओरडा करुन नरडा कोरडा करीत आहोत.ज्ञान ग्रहणाचे पायाभूत वय देखिल वय वर्ष अडीच ते वय वर्ष दहा हे अधिक योग्य सांगितले आहे.

याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट रचना म्हणजे श्रेयांक बँक राहाणार आहे.त्यावरही त्रिभाषेमुळे मार्क क्रेडिट जमा होणार आहे.या सर्व बाबींचा कुठलाही विचार न करता केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन शिक्षणा सारख्या पवित्र क्षेत्राला गढूळ करण्याचा हा राक्षसी विचार आहे.

प्राथमिक शिक्षण मराठीतूनच असणार आहे हे डोके फोडून सांगितले तरी त्यांना समजुन घ्यायचेच नाही.त्रिभाषासूत्राला विरोध करतांना ते हे ही विसरलेत की महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हिंदी ऐवजी गोंड,कोरकू अशा स्थानिक भाषेतून शिकविल्या जाते.त्या बोलीभाषेतून पुस्तके देखिल छापली आहेत.

स्वतःची मुले इंग्रजीत आणि बाकीच्यांना हिंदी ही नको.वाऽऽऽ रे नेते? महाराष्ट्रात भाषेवरून तरुणांची माथी भडकायची आणि महाराष्ट्र आस्थिर करायचा.सरकारने वेळीच सावध होऊन हिंदीबाबतचा निर्णय मागे घेऊन विरोधकांची हवा काढली असली तरी निर्णय मागे घेऊन विद्यार्थ्यांचे नुकसान मात्र नक्की केले आहे असे माझे मत आहे.सरकारने ठाम रहायला पाहिजे होते.आंदोलनाची धमकी देणाऱ्यांमागे महाराष्ट्रातील जनता अजिबात नाही.उलट ते दिगंबर झाले असते.महाराष्ट्रातील पालक आनंदीत झाला असता.पण निर्णय मागे घेऊन विद्यार्थ्यांना एका भाषेपासून वंचित ठेवण्याचे कृत्य सरकारने केले आहे.दोघांच्या राजकारणात विद्यार्थी मात्र पिचल्या गेला हेच कटू सत्य आहे.

**विद्यावाचस्पती**
**प्रा.दिलीप जोशी,** वाशिम.
मो.९८२२२६२७३५

## यालाच पुरोगामित्व व धर्मनिरपेक्षता म्हणायचे का?

भारत या हिंदूबहुल देशात कुठल्या कोण ब्रह्मदेशातील रोहिंग्यांसाठी आणि इस्त्रायलमधील गाजा पट्टीतील मुसलमानांसाठी भव्य मोर्चे काढले जातात,त्या मोर्चामधील लोक पोलिसांच्या गाड्या पेटवून देतात, स्त्री पोलिसांच्या अंगावर हात टाकतात. हुतात्मा स्मारकाला लाथा घालतात. तरी त्यांना काही होत नाही; परंतु हिंदुंनी दिलेली 'जय श्रीराम' ही घोषणा जातीयवादी ठरते. वर्ष १२९३ मध्ये आक्रमक बख्तियार खिलजी याने नालंदा विद्यापीठाचा विध्वंस करून तेथील विद्यार्थी आणि अध्यापक यांच्या कत्तली केल्या. भारतीय ज्ञानाचा खजिना असलेले तेथील ९० लाख ग्रंथ तीन मास जळत होते.आजही नालंदाच्या रेल्वे स्थानकाचे नाव आहे बख्तियारपूर......! हे चालते; पण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या मराठा साम्राज्याची पताका दिल्लीपार फडकवणाऱ्या महापराक्रमी बाजीराव पेशवे यांचे नाव पुणे रेल्वेस्थानकाला दिलेले चालत नाही.

**संजय चौधरी** अमरावती

## एकात्मतेचे बोलके स्वरूप : पंढरपूर वारी

पंढरपूर वारी ही केवळ भक्तीची यात्रा नसून, ती एक सामाजिक आणि आध्यात्मिक चळवळ आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या पालख्या सोबत लाखो वारकरी हजारो किलोमीटरचा पायी प्रवास करताना सामूहिक भक्ती, अभंगगायन, कीर्तन आणि साधना करतात. या यात्रेमुळे व्यक्तीच्या मनात भक्तीभाव जागृत होतो, नम्रता आणि सहनशीलता वाढते. वारी ही संपूर्ण समाजाला एकत्र आणणारी परंपरा असून, ती जात, धर्म, वय यांच्यापलीकडे जाऊन एकात्मता आणि समरसतेचा संदेश देते.

या यात्रेमुळे शारीरिक, मानसिक आणि पर्यावरणीय लाभही मिळतात. रोजच्या चालण्यामुळे वारकऱ्यांचे शरीर तंदुरुस्त राहते, तर कीर्तन आणि नामस्मरणामुळे मानसिक स्थैर्य आणि समाधान मिळते. अनेक ठिकाणी पर्यावरणविषयक जनजागृती, स्वच्छतेचे महत्त्व आणि सेवा कार्ये केली जातात. वारीमुळे समाजात सेवाभाव, संयम आणि शिस्तीचे मूल्य रुजते, जे वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते. विविध प्रकारची माणसे एकाच ध्येयाने प्रेरित असतात ते म्हणजे विठू माऊलीचे दर्शन आणि हीच त्या सर्वांना एकसूत्र बांधून ठेवते.

**आल्हाद माळगावकर**

## गुरुपौर्णिमेचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरु .आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरु याचा अर्थ, गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे अंतःकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरु नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरु म्हणजे शिष्याला किंवा भक्ताला मायेच्या मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. गुरु म्हणजे निरपेक्ष प्रेम, भरभरून दोन्ही हाताने शिष्यांना विद्या देणारे. आषाढ पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरु पूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. अध्यात्मात असो किंवा कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रात असो गुरूंशिवाय तरुणोपाय नाही. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरु आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रता ही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याच बळ मात्र गुरूच देतात. शिष्याची गुरूंवरील श्रद्धा, निष्ठा, भक्ती, शरणागत भाव ,आज्ञापालन हे जेवढे जास्त असेल तेवढी त्याची प्रगती जलद होते. आपल्याला असणारी संसारिक आसक्ती ही केवळ साधनेनेच कमी होते. आपले षडरिपु हे फक्त गुरूंच्या मार्गदर्शनातच आपण कमी करू शकतो. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य, गुरूंची 'पाद्य पूजा' करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात.

**माधवी पत्की**

## गुरूंना अपेक्षित असलेले कार्य

लोक धर्माचरण करत नसल्याने दुष्प्रवृत्ती बळावल्या आहेत. भ्रष्टाचार, अत्याचार, अनैतिकता इत्यादींनी परिसीमा गाठली आहे. हिंदु धर्म, धर्मग्रंथ, देवता, संत, गोमाता, गंगा इत्यादींचा अनादर केला जात आहे. आर्य चाणक्य-चंद्रगुप्त, विद्यारण्यस्वामी-हरिहरराय, समर्थ रामदास्वामी-छत्रपती शिवाजी महाराज इत्यादी गुरु-शिष्यांनी धर्मसंस्थापनेचे ऐतिहासिक कार्य केले. गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस गुरुपौर्णिमेला गुरूंप्रती एक दिवसाची कृतज्ञता व्यक्त करण्यापेक्षा गुरूंना अपेक्षित असलेले कार्य वर्षभर आणि सातत्याने करत रहाणे, हीच खरी कृतज्ञता ठरते.



**अपर्णा जगताप**

## इंदूर बनले डिजिटल पत्ता असलेले भारतातील पहिले शहर!

शहरातील प्रत्येक घराला 'युनिक क्यूआर कोड'सह डिजिटल घर पत्ता देणारे मध्य प्रदेशातील इंदूर हे देशातील पहिले डिजिटल पत्ता असलेले शहर बनले आहे. इंदूरच्या सुदामा नगरमध्ये युनिक क्यूआर कोडसह डिजिटल प्लेट्स बसवून या विषयीचा पथदर्शी प्रकल्प नुकताच सुरू करण्यात आला. या अनुषंगाने शहरातील प्रत्येक घराबाहेर युनिक क्यूआर कोडसह विशेष डिजिटल प्लेट्स बसवण्यात येणार आहेत. महिन्याभरापूर्वीच भारतीय पोस्ट विभागाने एखाद्या जागेच्या अचूक अक्षांश आणि रेखांशावर आधारित एक १० अंकी 'डिजीपिन' (डिजिटल पोस्टल इंडेक्स नंबर) नावाची डिजिटल पत्ता प्रणाली सादर केली होती. त्या प्रणालीशी हा डिजिटल घर पत्ता प्रकल्प जोडण्यात आला आहे. मोबाईल फोनने घराबाहेर प्लेट्सच्या स्वरूपात असलेला युनिक क्यूआर कोड स्कॅन करताच, वीज, पाणी, मालमत्ता कर, बिल भरणे, सुविधांबाबत तक्रारी नोंदवणे इत्यादी विविध वीस नागरी सुविधा नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. तसेच जीपीएस आधारित घराचा डिजिटल पत्ता कळू शकेल. दोन महिन्यांपूर्वी शहरातील सर्व भिकाऱ्यांचे पुनर्वसन करून इंदूर शहर देशातील पहिले भिकारीमुक्त शहर बनले. तसेच गेली अनेक वर्षे देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदूर शहराला प्रथम क्रमांक मिळतो आहे.

**-प्रदीप मोरे**

## वार्षिक फास्टॅग पास

भारत सरकारने १५ ऑगस्ट २०२५ पासून खासगी वाहनांसाठी (कार, व्हॅन, जीप) वार्षिक फास्टॅग पास उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ तीन हजार रुपयांमध्ये मिळणारा हा पास एकूण २०० फेऱ्यांपर्यंत किंवा एका वर्षासाठी (जे आधी पूर्ण होईल ते) वैध असेल. राष्ट्रीय महामार्गावर वारंवार प्रवास करणाऱ्यांसाठी ही योजना खरोखरच उपयुक्त ठरणार आहे. सध्याच्या टोल दराच्या तुलनेत, या पासमुळे वर्षाला सुमारे सात हजार रुपयांपर्यंत बचत होऊ शकते. विशेषतः नोकरी, व्यवसाय किंवा वैयक्तिक कारणाने दररोज किंवा दर आठवड्याला लांबचा प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी हा पर्याय आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे.फास्टॅगमुळे आधीच टोल प्लाझांवरील गर्दी, रोख व्यवहार आणि वेळेचा अपव्यय कमी झाला आहे. आता या वार्षिक पासमुळे नियमित प्रवाशांचा टोल खर्चही कमी होईल, ही बाब स्वागतार्ह आहे. सरकारने घेतलेला हा निर्णय नागरिकांच्या सोयीसाठी व खर्च विषयक नियोजनासाठी निश्चितच सकारात्मक पाऊल आहे.

**- प्रा. विजय कोष्टी**


५७ वर्षांत प्रथमच विद्यापीठातील 'पत्रकारिते'ला शून्य प्रवेश

## नव्या पिढीला पत्रकारितेबद्दल तिटकारा का?

'कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात बीजेला म्हणजे पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी एकही अँडमिशन झाली नाही' अशी बातमी आहे ही बातमी वाचून अजिबात धक्का वगैरे बसला नाही.. कारण कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठच नव्हे तर महाराष्ट्रातील वृत्तपत्र विद्या अभ्यासक्रमाचे वर्ग जेथे जेथे चालतात तेथे कमी अधिक प्रमाणात हीच स्थिती आहे. राज्यात या अभ्यासक्रमाच्या ३००० जागा आहे ती आणि त्यातील ३०० जागा देखील भरल्या जात नाहीत..हे आजचे वास्तव आहे.

१९८३ ला माझा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात बीजे ला नंबर लागला नव्हता...३० जागा होत्या.. मग १९८४ ला परत मी प्रयत्न केला तेव्हा नंबर लागला.. मी बीजे केले.. त्याकाळात बीजेकडे तरूणांचा ओढा होता. पत्रकार व्हावे असे तरूणांना वाटायचे.. सगळ्या जागा भरायच्या.. आज तसे होत नाही..मी अलिबागेत असताना पत्रकार संघाच्यावतीने मुक्त विद्यापीठाचा अभ्यासक्रम आम्ही चालवायचो.. तेथेही सहज २५ अँडमिशन व्हायचे..

नंतर हे चित्र बदलत गेले का?

एक तर बीजे करून नोकरी मिळेलच याची गँरंटी उरली नाही.. आधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियात माणसांची गरज कमी झाली..त्यामुळे नोक-या मर्यादित झाल्या..वेगवेगळ्या कंपन्यात पीआरओ, माहिती जनसंपर्क विभागातील संधीही कमी झाल्या त्यामुळे बीजे करून एक वर्ष वाया घालायला कोणी तयार नाही.. शिवाय जॉब मिळालाच तर तुटपुंजे वेतन आणि नोकरी कायमस्वरूपी टिकेलच याची खात्री नाही.. लोकांवर होणा-या अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठविणारया पत्रकारांची जेवढी पिळवणूक माध्यम समुहाकडून होते तेवढी अन्य कोणत्या व्यवसायात होत नाही..हे वास्तव आहे..

सरकारने मजेठिया वगैरे आयोग नेमले, सुप्रिम कोर्टाने आदेश देऊनही धनदांडगे मालक त्याची अंमलबजावणी करीत नाहीत.. त्यामुळे पगाराचे वांदे.. त्याविरोधात संघटीत आवाजही उठत नाही..सारीच अनिश्चितता आहे..

ती स्वीकारण्याची नव्या पिढीची मानसिकता नाही.. काही ध्येयवादी तरूणांना व्यवस्था बदलायची असते, व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवायचा असतो त्यासाठी ते पुर्वी जाणीवपूर्वक पत्रकारितेत यायचे.. परंतू आता तेही शक्य नाही..

सारा मिडियाच व्यवस्थेला शरण गेलेला असलयाने आपण पत्रकार होऊन काही दिवे लावू शकत नाही हे वास्तवही नव्या पिढीच्या लक्षात आले.. पत्रकारितेकडचा ओढा कमी होण्याचे हे ही एक कारण आहे.. हे चित्र चिंता वाढविणारे आहे..

नव्या पिढीतून चांगले पत्रकार तयार झाले पाहिजेत पण ते होणार नसेल तर सामान्यांचा आवाजच व्यक्त होणार नाही.. लोकशाहीसाठी देखील हे चित्र चांगले नाही..

**एस.एम देशमुख**



वेचक

## समुद्र किनाऱ्यावर सापडले पती-पत्नीचे मृतदेह


## श्रीराम पुरोहित यांना 'देवर्षी नारद' पत्रकारिता पुरस्कार

## लायन्स क्लब पोयनाडच्या अध्यक्षपदी गुरुनाथ माळी

# इलेक्ट्रिक वाहनधारकांच्या खिशाला फटका

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

### महावितरणाकडून दरवाढ



पुरवल्या जाणाऱ्या प्रतियुनिट विजेचा दर (रुपयांमध्ये)

२०२५-२६

२०२६-२७

महिन्याला वाचतात सुमारे १० लाख रुपये

# महापालिकेचे स्वत:चे ड्युरा सिलिंडर रिफिलिंग केंद्र

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



वार्षिक देखभालीसाठी दीड कोटींचा खर्च

# आगरी समाज सेवाभावी संस्थेकडून विद्यार्थ्यांचा गुणगौरव

◆ सफाळे (वार्ताहर) :



## साळाव विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता

◆ नांदगाव मुरुड (वार्ताहर) :

# फोन-पे, एचडीएफसी बँकेची भागीदारी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



## पार्किन्सन्स आजारामधील ब्रेन सर्जरीच्या कल्पनांचे निरसन

# 'गायत्री एआय' तर्फे सक्षम वेलनेस सेंटरची घोषणा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

बेळगाव स्मार्ट सिटीमध्ये महाराष्ट्राची दादासाहेब फाळके चित्रनगरी

# एनडी स्टुडिओमार्फत साकारणार कलाप्रकल्प

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



## रोजगार हमी संवाद वारी, पंढरीच्या दारी

# छत्रपती शाहू महाराजांचे संकल्प विचार घराघरांत पोहोचविणार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विद्यार्थी, कामगार, व्यावसायिकांचा समावेश

# 'ऑपरेशन सिंधू' अंतर्गत ४,४०० हून अधिक भारतीय मायदेशी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



वचनबद्धता पूर्ण

# शाळांमध्ये साकारणार भिंतीवरील पुस्तकालय

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

### इतवारा बाजार - नागपुरी गेट उड्डाणपुलाचे रखडलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी

# डॉ. सुनील देशमुखांच्या दाखल जनहित याचिकेची दखल

**अमरावती/का.प्र.**

शहरातील अत्यंतिक वर्दळीचा मार्ग असलेल्या चित्रा-चौक इतवारा बाजार - नागपूरी गेट उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू होऊन तब्बल सात वर्षे उलटून सुद्धा अद्यापही पूर्णत्वास गेलेला नसून या रखडलेल्या उड्डाणपुलामुळे किमान लाखभर नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे त्रास होत असून राज्य शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग व कंत्राटदार यांनी अवलंबलेल्या अत्यंतिक दिरंगाई व अनास्थेबद्दल माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या मागणीला घेऊन जनहित याचिका दाखल केलेली होती. याची सात दिवसाचे आत कधीपर्यंत उड्डाणपूल पूर्ण करणार याबद्दल नोटिसेस जारी करून त्याचा रोड मॅप न्यायालयासमक्ष सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती व कंत्राटदार मे.चाफेकर ॲण्ड कंपनी यांना प्रतिवादी केले होते . उच्च न्यायालयाचे मा.नायमूर्ती नितीन सांबरे व मा.न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या द्वि सदस्य खंडपीठाने सरकारी अधिवक्तांना निर्देश देऊन उपरोक्त तीनही प्रतिवादी सात दिवसाचे आत कधीपर्यंत उड्डाणपूल पूर्ण करणार याबद्दल नोटिसेस जारी करून त्याचा रोड मॅप न्यायालयासमक्ष सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.या मध्ये संविधानातील कलम २१ अनुसार नागरिकांना बहाल केलेल्या न चांगल्या मूलभूत सुविधा निर्धोकपणे वापरण्याच्या संवैधानिक अधिकाराचे हनन,या अव्याहत बांधकामामुळे हवा प्रदूषण व ध्वनी



प्रदूषणामुळे नागरिकांच्या स्वास्थ्यावर होणारे परिणाम , ट्रॅफिक जॅम मुळे नागरिकांना होणारा मनस्ताप , त्याचप्रमाणे प्रकल्प पूर्ण होण्याच्या दिरंगाई मुळे या प्रकल्पाच्या वाढलेल्या किमती पोटी होणाऱ्या वाढीव शासन निधीचा अपव्यय याला लगाम घालून संबंधिताना योग्य ताकीद देऊन न्यायालयाने कारवाईचा बडगा उगारून उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधीची उपलब्धता व टाईम बउंड कार्यक्रम सादर करण्याबाबत राज्य शासनाला निर्देशित करण्यात यावे अशी मागणी या जनहित याचिकेत डॉ.सुनील देशमुख यांनी न्यायालयाला केली होती. या जनहित याचिकेच्या रेट्यामुळे आता तरी या उड्डाणपुलाचे काम मार्गी लागेल असे आशादायी चित्र निर्माण झालेले आहे. ही जनहित याचिका डॉ. सुनील देशमुख यांनी अमरावती शहरातील प्रथितयश उच्च न्यायालयाचे अधिवक्ता शाहू चिखले यांच्या माध्यमातून दाखल केलेली असून त्यांनी अमरावती शहराच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या विषयात यशस्वी युक्तिवाद केला.

मुळात करारनाम्या नुसार उड्डाणपुल दोन वर्षात पूर्ण करण्याची अट असलेले बांधकाम आजकालच्या अद्यावत तंत्रज्ञानाच्या युगात तब्बल सात वर्षे रेंगाळत राहणे हे खरंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रतिमेला अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. यामुळे संपूर्ण अमरावतीकर नागरिक वाहतूक कोंडी मुळे त्रस्त होत असून त्यांचा बहुमूल्य वेळ रोज वाया जाऊन व्यवसायाचे सुद्धा नुकसान होत आहे. वस्तुतः या जनहित याचिकेच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकरणांमध्ये एक विकासप्रेमी अमरावतीकर नागरिक व एक दक्ष लोकप्रतिनिधी म्हणून सदर काम तातडीने पूर्णत्वास जाण्याकरिता मा.उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून सदर जनहित याचिकेच्या माध्यमातून अमरावतीकर जनतेला न्याय मिळवून द्यावा अशी याचिका दाखल करून महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती व मेसर्स चाफेकर अँड कंपनी, कंत्राटदार यांना प्रतिवादी करून न्यायालयीन लढ्याला सुरुवात केलेली आहे. या जनहित याचिकेवर न्यायालय तातडीने सकारात्मक भूमिका घेतल्याने या रखडलेल्या उड्डाणपुलाचे कार्य आता तरी पूर्णत्वास जाईल असा सार्थ विश्वास डॉ. सुनील देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

## शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नांबाबत ८ जुलैला महासंघातर्फे चर्चासत्र

**अमरावती** -शेतकरी, शेतमजुरांच्या न्याय, हक्क आणि अधिकारासाठी ८ जुलै रोजी राष्ट्रीय अधिवेशन आणि त्यानिमित्त चर्चासत्राचे आयोजन केले आहे. दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दिवसभर चालणारे हे चर्चासत्र गुरुकुंज मोझरी येथे होईल. शेतकरी, वारकरी, कष्टकरी महासंघाने या अधिवेशन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रात सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य या मुद्द्यांसह शेतकरी-शेतमजुरांचे प्रश्न, बेरोजगारांचे प्रश्न सोडवण्यावर भर दिला जाईल. या वेळी शेतकरी नेते ॲड. वसंतराव ढोके, किसान ब्रिगेडचे प्रकाश पोहरे, क्रांतीज्योती ब्रिगेडचे ॲड. नंदेश अंबाडकर, गुरुदेव सेवा संस्थेचे ॲड. अशोकराव यावले उपस्थित राहतील, असे आयोजक धनंजय काकडे यांनी कळवले आहे. याप्रसंगी शेतकरी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वसंतराव नाईक यांना अभिवादन

**अमरावती**-महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



# शिधावाटपाच्या तांदुळाची जागेवरच विक्री

## पुरवठा विभागाने पाठविली तपासणी पथके

**अमरावती/का.प्र.**

शहरात सरकारी रेशनचा काळाबाजार केला जात आहे. एकीकडे रेशन खरेदीदार रस्त्यांवर आणि गल्लीबोळात फिरत आहेत आणि 'तांदूळ आहे का?' असे ओरडत आहेत. आता काही रेशन दुकानदारही त्यांच्यात सामील झाले आहेत. शहरातील खोलापुरी गेट, महाजनपुरा, यशोदा नगर येथून रेशन दुकानदार खुलेआम लाभार्थ्यांना तांदळाच्या बदल्यात पैसे मागत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. जिल्हा पुरवठा विभागाला तक्रार मिळाल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी पुरवठा विभागाच्या तपासणी पथकांना आदेश दिले. पुरवठा विभाग नागरिकांना सरकारी धान्य विकू नये असे आवाहनही करत आहे.

पावसाळ्यात लाभार्थ्यांना रेशन मिळविण्यासाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत यासाठी सर्व रेशन कार्डधारकांना एकाच वेळी तीन महिन्यांच्या रेशनचे वाटप सुरू झाले आहे. त्यामुळे प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला ५० ते ९० किलो तांदूळ दिला जात आहे. परंतु जिल्ह्यातील नागरिकांचे मुख्य अन्न भात नाही तर भाकरी आहे. परंतु रेशन दुकाने तांदूळा इतकाच गहू आणि द्यायचा तेवढाच गहू वितरित करत असल्याने, बहुतेक लाभार्थी त्यांना मिळत असलेला तांदूळ विकत आहेत. शहर आणि जिल्ह्यात तांदूळ खरेदीदारांचा एक गट आहे. प्रत्येक गावात, रस्त्यावर आणि परिसरात, लोकांच्या दाराशी जाऊन रेशन धान्य खरेदी करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या आहेत.

**इतक्या तांदळाचे काय करायचे - लाभार्थी**

रेशन दुकानातून अपेक्षित प्रमाणात गहू वितरित केला जात नाही. सरकारी रेशनच्या नावाखाली गव्हाऐवजी तांदळाची मोठी खेप दिली जात आहे. कुटुंबात इतका तांदूळ वापरला जात नाही, म्हणून आम्ही तो खरेदी करणाऱ्या व्यक्तीला विकतो.

जर सरकारने तांदळाऐवजी गहू वितरित केला तर रेशन धान्य विकण्याची गरज भासणार नाही. यशोदा नगर येथील रहिवासी असलेल्या एका लाभार्थी कुटुंबाने नाव न सांगण्याच्या अटीवर हे सांगितले.

**'मग' लाभार्थ्यांनाही शिक्षा होईल - पुरवठा विभाग**

लाभार्थ्यांकडून रेशन खरेदी करणाऱ्या रेशन विक्रेते किंवा दुकानदारांवर कठोर कारवाई केली जाईल. सरकारी रेशन विकताना आढळणाऱ्या लाभार्थ्यांची रेशन कार्ड निलंबित करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. रेशन दुकानांमधून दिले जाणारे तांदूळ पौष्टिक आहे, लाभार्थी कुटुंबाने ते स्वतः वापरावे, विकू नये. हे आवाहन जिल्हा आणि शहर पुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे.

## संक्षिप्त

### गांधी विद्यालयात शैक्षणिक प्रवेश उत्सव

**अंजनगाव बारी**-गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बडनेरा येथे शैक्षणिक सत्र २०२५ -२०२६ मध्ये नवीन शैक्षणिक सत्राचे औचित्य साधून शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेच्या उपमुख्याध्यापिका वंदना टिक्कस या उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे प्रमुख अतिथी म्हणून पालक वर्गामधून जया साठवणे, शितल डोईफोडे, सुरेश बोबडे, प्रशांत तायडे, आशिष यादगिरे, अजय चोरमले यांनी व्यासपीठावर आपली उपस्थिती दर्शविली.निलिमा देव यांनी यावेळेस शारदास्तवन सादर केले. वंदना टिक्कस यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना नवीन व शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा व मार्गदर्शन केले. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व पालकांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व विद्यार्थ्यांना पुस्तक वाटण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या शिक्षिका मनोरमा उईके यांनी केले तर आभार प्रदर्शन सकाळ पाळी प्रमुख सुधीर अवघड यांनी केले. उपक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता सदाफळे, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा चे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष आनंद इंगोले व राजेश टारपे, शाळा सभापती रामेश्वरजी लाड तथा सर्व कार्यकारिणी यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्यात.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'मड डे' साजरा

**अमरावती** - पोदार मुख्य संचालिका डॉ. स्वाती पोपट वत्स यांच्या चिखलात योग या थीमअंतर्गत योगा करण्यापासून ते आश्चर्यकारक मड पेंटिंग मास्टरपीस तयार करण्यापर्यंत मुलांनी बेकरी मध्ये लहान शेफ यांनी त्यांची संकल्पना शक्ती वापरून बनावटी केक बनवले. पोदार प्रेप मध्ये मुलांना पालकांना आणि त्याच्या नातेवाईकांना निसर्गाशी जोडण्यासाठी आणि त्यांच्या सृजनशीलतेचा शोध घेण्यासाठी दरवर्षी हा चिखल दिवस साजरा केला जातो. हे एक संवेदी ती मैदान आहे जिथे मुलांचा वेगवेगळ्या क्रिया कलापाद्वारे त्यांचे सूक्ष्म आणि स्थूल कौशल्य बळकट करते. हा एक आनंददायी आणि संवेदनांनी समृद्ध उत्सव आहे जो सृजनशीलता, एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न आणि आनंददायी शिक्षणाला पाठिंबा देतो. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या मनीषा संगर यांचे योग्य मार्गदर्शन लाभले, तसेच पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका पल्लवी बोके , सीनियर ॲडमिन ऑफिसर भूषण पथे आणि एडमिन असिस्टंट मॅनेजर प्रज्ञा दर्जी यांनी पालकांशी विशेष संवाद साधला. तसेच पालकांचा भरपूर प्रतिसाद मिळाला शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केलेत.



### वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी

**अमरावती**-राज्याचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे प्रणेते, शेतक-यांचे कैवारी श्री वसंतराव नाईक यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात कृषिदिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिवविलास काकडे तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व वसंतराव नाईक यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. नांदुरकर यांनी दिली.



### शैक्षणिक सत्राची पहीली शिक्षण परिषद

**अमरावती**- ३०जूनला नविन शैक्षणिक सत्र २०२५-२६ची पहीली शिक्षण परीषद शिपगाव येथे घेण्यात आली.या शिक्षण परीषद गणोरी केंद्राच्या केंद्र प्रमुख निता सोमवंशी यांनी मार्गदर्शन केले.या शिक्षण परीषद मध्ये ऐंउ गटाचे पुनर्गठन, निपुण महाराष्ट्र ५ मार्च शासन निर्णय, शाळा निहाय आढावा व नियोजन, पायाभुत चाचणी पूर्व तयारी व सराव, माहे जुलै मासिक नियोजन यावर मार्गदर्शन करण्यात आहे.शिक्षण परीषदला गणोरी, उत्तमसरा, परलाम, ईब्राम‌पूर, खरबी, शिपगाव, शिवणी बु., शिवणी खुर्द, खल्लार, निंभोरा, बोरगाव, बहादरपूर व गणोरी उर्दू शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षिका उपस्थित होत्या.शिक्षण परीषद वंदे मातरम ने शिक्षण परीषदचा समारोप करण्यात आला.

# दर्यापूर शहरातील न. प.कन्या शाळेचे मैदान बनले डम्पिंग ग्राउंड

**खल्लार/वार्ताहर**



दर्यापूर शहराच्या केंद्रस्थानी नगरपालिकेचे मोठे मैदान असून या मैदानावर अनेक खेळाडू घडले गेले आहे. मात्र मागील महिन्याभरापासून व्यावसायिकांना नगरपरिषद प्रशासनाने मैदान उपलब्ध करून दिले होते. दरम्यान ते व्यावसायिक त्यांचा कालावधी संपल्यानंतर संपूर्ण मैदानावरती अस्वच्छतेचा धिंगाणा पसरवून निघून गेले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नसल्याने मैदानात सराव करणारे खेळाडू मोबाईल मध्ये गुंतलेले दिसत आहेत.

सदर मैदानाची इतिहास दप्तरी नोंद सुद्धा आहे. दर्यापूर शहरातील कानाकोपऱ्यातील मुले खेळण्यासाठी या मैदानावरती येत असतात. क्रिकेट, हॉलीबॉल, फुटबॉल यासह परिसरातील वयोवृद्ध नागरिक हे व्यायाम करण्यासाठी शतपावली करण्यासाठी कुटुंबासमवेत उपस्थित असतात. परंतु प्रशासनास मिळणाऱ्या मोबादल्यासाठी हे मैदान कुणाच्याही ताब्यात देण्यात येत असते. या अगोदर सुद्धा हे मैदान विविध व्यावसायिकांना भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. त्यांनी सुद्धा मैदानाची ऐशी तैशी केली होती. मैदानाचा एक दोन एकराचा परिसर हा पूर्णपणे अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला गेला आहे. पालिका प्रशासनाचे शहराच्या विकास कामावर पूर्णतः दुर्लक्ष असून आता हा ज्वलंत प्रश्न उपस्थित झाला आहे. परिसरातील फळ विक्रेते भाजीपाला विक्रेते किरकोळ स्वरूपाचे व्यावसायिक व परिसरातील नागरिक हे आपला कचरा थेट मैदानाच्या आवारात टाकत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे.

तसेच नागरिक सदर मैदानावर लघुशंका करतात?. त्यामुळे दुर्गंधी पसरली असून महिला वर्गांना सुद्धा फिरण्यासाठी मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. संबंधित नगरपरिषद प्रशासनाने मैदानाच्या सफाई व स्वच्छते कडे अधिक लक्ष देण्याची गरज बनली आहे त्यासोबतच लोकप्रतिनिधींनी सुद्धा ह्या अति गंभीर समस्येवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

## सुधारित पीक विमा योजनेसंदर्भात सर्वंकष चर्चेसाठी बैठक लावावी- आ.संजय खोडके

**अमरावती/का.प्र.**



राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानपरिषदेतील कामकाजा दरम्यान प्रशोत्तराच्या तासांमध्ये सुधारित पीक विमा योजने संदर्भात चर्चा करतांना आ.संजय खोडके यांनी पीक विमा योजनेचे पूर्वीचे चार ट्रिगर बंद करून एकच ट्रिगर सुरु असल्याने पुढील काळात नवा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात लोकप्रतिनिधीच्या मार्फत एक समिती व सर्वंकष चर्चा करण्यासाठी बैठक लावावी, अशी सुचना सभागृहाला केली. यावेळी प्रश्नावर उत्तर देतांना कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी पीक कापणी प्रक्रिया आधारित पीक विमा योजना हि राज्य शासनाने सुरु केली असल्याने या सभासदांना याबाबत शंका व संशय असेल त्या दृष्टीने सुधारणा करण्यासंदर्भात बैठक घेण्याचे मान्य केले आहे.

राज्य विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रश्न क्रमांक - २ वर चर्चा करतांना आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले की, शासनाने सुधारित पीक विमा योजना लागू केली आहे.म्हणजेच नवीन पीक कापणी प्रयोग आधारित पीक पिमा योजना यातून पूर्वीचे तीन ट्रिगर बंद केले आहे. पीक विमा योजनेत जे चार ट्रिगर होते ज्यामध्ये पेरणी नंतर पाऊस न पडल्यास शेतकऱ्यांना अग्रीम मिळत होती.अनियमित हवामान,तापमान, किंवा इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास भरपाई दिली जात होती. पिकाची कापणी केल्यानंतर ती शेतातच भरून ठेवलेली असताना अतिवृष्टीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास भरपाई मिळत होती. असे चार ट्रिगर होते. परंतु नवीन पीक विमा योजनेत वरील तीन ट्रिगर बंद करण्यात आले. शेवटचा चौथा काढणीपश्चात नुकसान भरपाई या आधारावरच पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. कुठल्याही योजनेमध्ये जर २५ टक्के पाऊस राहिला किंवा नापेर राहिला तर पीक विमा मंजूर होते. नापेर क्षेत्रात मोजणी सुद्धा करता येत नाही. त्यामुळे पीक विमा लागू होणे अपेक्षित असते. परंतु शासनाने आता सुधारित पीक विमा योज़ना आणली आहे. सुधारित पीक विमा योजनेतील भांडवली बाबी खूप चांगल्या आहेत , ती एक चांगली योजना आहे , पण त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यात म्हणून या संदर्भात लोकप्रतिनिधींच्या मार्फत समितीच्या माध्यमातून सर्वंकष चर्चा करण्यासाठी बैठक बोलावून निर्णय घ्यावा , अशी सूचना आ.संजय खोडके यांनी केली. या प्रशांवर उत्तर देतांना सभागृहात उपस्थित राज्याचे कृषिमंत्री ना. माणिकराव कोकाटयासाठी बैठक लावण्याचे सुद्धा मान्य केले. याबाबत पीठासीन सभापती राम शिंदे यांनी सभागृहात याबाबतची घोषणा करून या चर्चेला विराम दिला.

# जबाबदारीची पत्रकारिता काळाची गरज

## माहिती आयुक्त गजानन निमदेव यांचे प्रतिपादन,विश्व संवाद केंद्र पत्रकार सन्मान सोहळा

**अमरावती/का.प्र.**

आजच्या काळात पत्रकारला स्वतःच्या मनाने काम करता येत नाही. जे व्यवस्थापनाचे धोरण आहे, तेच मांडावे लागते. आपल्या लिखाणाने कोणाची बदनामी होणार नाही, याची काळजी घ्यायलाच हवी. आरोपांच्या बातम्या प्रकाशित करताना दोन्ही बाजूंचा समावेश असावा. जबादारीची पत्रकारिता ही काळाची गरज असून तिन्ही पुरस्कार प्राप्त पत्रकारांची निवड योग्य असल्याचे प्रतिपादन नागपूर खंडपीठाचे राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव यांनी केले.

विश्व संवाद केंद्र, अमरावतीद्वारे आद्य पत्रकार देवर्षी नारद जयंतीनिमित्त अमरावती विभाग पत्रकारिता सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी सांयकाळी श्री हव्याप्र मंडळाच्या सभागृहात करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख वक्ता म्हणून बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून कॉलेज ऑफ ॲनिमेशन बायोइंजिनियरींग ॲन्ड रिसर्च सेंटरचे संस्थापक संचालक विजय राऊत उपस्थित होते. याशिवाय मंचावर रा. स्व. संघाचे महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, विदर्भ प्रांत प्रचार प्रमुख संदीप गुळवे उपस्थित होते. खा. अनिल बोंडे यांची कार्यक्रमाला विशेषत्वाने उपस्थिती होती.



छत्रसाल विकास मंडळाचे अध्यक्ष गोपाल गुप्ता पुरस्कृत उत्तम लेखन व पत्रकारितेसाठी दै. हिंदुस्थानचे उपसंपादक निशिकांत राजबिंडे, स्व. त्रिवेणीताई सुखदेवराव बोंडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्रिवेणी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या विश्वस्त डॉ. वसुधा अनिल बोंडे पुरस्कृत ग्रामीण भागातून तत्परतेने वृत्त संकलनासाठी दै. पुण्यनगरीचे धामणगाव रेल्वे तालुका प्रतिनिधी चेतन पसारी, स्व. रमेशचंद्र शिंदे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. चंद्रकांत शिंदे पुरस्कृत डिजीटल माध्यमात नेटाने परिश्रमपूर्वक कार्य करणारे समाचार दर्शनचे जेष्ठ पत्रकार यशवंत उर्फ अशोक जोशी यांना देवर्षी नारद पुरस्कार देऊन मान्यवरांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. पुरस्कार पुरस्कृत करणारे यावेळी आवर्जून उपस्थित होते. शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, ११ हजार रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केदार गोगरकर, सूत्रसंचालन अमरावती विभाग प्रचार प्रमुख सौरभ लांडगे, आभार अमरावती महानगर प्रचार प्रमुख राहुल गुल्हाने यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शिवानी भेंडारकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली. कार्यक्रमाला प्रचार विभागाचे सर्व सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.



**कृत्रिम बुद्धिमत्तेचा अतिवापर ज्याप्रमाणे माणसाला बुद्धिमंदत्व आणण्यास कारणीभूत ठरू शकतो, तसाच सोशल मीडियातली गुरफट माणसाची विचारशक्ती मंदावू शकते. तेव्हा आभासी जगाच्या मगरमिठीतून वेळीच बाहेर पडा !**

# तरुणाईचे 'भावनिक रणांगण'

एके काळी गतिशील संवादाचे माध्यम म्हणून आकाराला आलेला सोशल मीडिया जीवनाचे अविभाज्य अंग बनला असला तरी युवा पिढीमध्ये आज ते एक भावनिक रणांगण बनले आहे. फोटो, विचार, आठवणी शेअर करण्यापलीकडे मानसिक तणाव, नात्यांतील विसंवाद आणि सामाजिक कुपरिणामांच्या दिशेने सुरू झालेला याचा प्रवास गांभीर्याने विचार करायला लावणारा आहे. विशेषतः युवकांमध्ये सुरू झालेला हा प्रवाह आता संवेदनशीलतेच्या सीमारेषा ओलांडू लागला आहे. सोशल मीडियावरील स्टेटस, पोस्टस् आणि त्यातील ओळी मानवी नात्यांना छिन्नविच्छिन्न करू लागल्या आहेत.

सामाजिक माध्यमांचा वापर आज मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. फेसबुक इन्स्टाग्राम, ट्विटर, व्हॉट्सअ‍ॅप, यूटयूब यांसारख्या प्लॅटफॉर्मवर लोक आपले विचार, भावना, अनुभव सतत शेअर करत असतात. ही माध्यमे जरी संवादाची साधने असली तरी त्यांचा अतिरेकी किंवा असंवेदनशील वापर वैयक्तिक, कौटुंबिक व वैवाहिक नात्यांमध्ये संघर्ष निर्माण करत आहे. एकेकाळी गतिशील संवादाचे माध्यम म्हणून आकाराला आलेला सोशल मीडिया युवा पिढीमध्ये एक भावनिक रणांगण बनला आहे. फोटो, विचार, आठवणी शेअर करण्यापलीकडे मानसिक तणाव, नात्यांतील विसंवाद आणि सामाजिक कुपरिणामांच्या दिशेने सुरू झालेला याचा प्रवास गांभीर्याने विचार करायला लावणारा आहे.

इन्स्टाग्राम स्टोरी किंवा व्हॉट्सअ‍ॅप स्टेटस ही प्रत्यक्षात पाहिल्यास क्षुल्लक साधनं आहेत, पण आज त्यांच्या आधारे किंवा त्यांच्यामुळे युवा पिढीत नातेसंबंधांमध्ये ठिणग्या पडताहेत. तरुणाईच नव्हे, तर कौटुंबिक, वैवाहिक नात्यांतही याचे पडसाद उमटताना दिसताहेत. याचे कारण सोशल मीडियावरून संवाद करताना अनेकदा व्यक्त होणाऱ्या भावना शब्दांच्या पलीकडील असतात. त्यामुळे एका साध्या ओळीचा अर्थ समोरची व्यक्ती वेगळ्या संदर्भात घेते आणि तिथून समज-गैरसमजांची साखळी सुरू होते. उदाहरणार्थ, 'सतत हसतमुख असणारी माणसं मनानं निर्मळ असतातच असं नाही' अशा आशयाचा एखादा सुविचार आवडला म्हणून कुणी स्टेटसला ठेवला तर ते पाहणारा प्रत्येक जण त्याला स्वतःशी जोडून पाहतो आणि स्टेटस ठेवणाऱ्या व्यक्तीशी असणाऱ्या संबंधांच्या परिप्रेक्ष्यातून त्याकडे पाहतो. त्यातून बहुतेकदा गैरसमज करुन घेतले जातात. मग संवादाऐवजी मौन, तणाव, राग, संशय वाढतो. हे स्टेटस 'फॉरवर्डेड' असले तरी भावनांवर होणारे परिणाम 'डायरेक्ट' असतात. यातून मित्र, प्रियकर-प्रेयसी, कुटुंबीय यांच्यातील लपवलेले ताण आता सार्वजनिकपणे उघड पडू लागले आहेत. पूर्वी चार भिंतींआड बोललं जायचं ते आज पोस्ट टाकून मांडले जाऊ लागल्यामुळे हजारो जणांसमोर ते जाते आणि त्यातून निर्माण होणारे वाद कधी पोलीस ठाण्यापर्यंत, तर कधी न्यायालयापर्यंतही जाताहेत. अलीकडील काळातील घटस्फोटांच्या प्रकरणांमध्ये कित्येकदा सोशल मीडियाचा संबंध कुठे ना कुठे तरी असतोच, असे या क्षेत्रात समुपदेशन करणारी मंडळी सांगतात. वैवाहिक नातेसंबंध हे परस्पर विश्वास, संवाद व एकमेकांशी बांधीलकीवर आधारित असतात. सोशल मीडियामुळे यामध्ये विविध प्रकारचे अडथळे निर्माण होताहेत. जोडीदाराच्या पोस्ट, लाईक्स किंवा फॉलो केलेल्या व्यक्तींमुळे संशयाची बीजपेरणी होत जाते. दोघांपैकी कोणी सतत मोबाईलमध्ये गुंतलेले असल्यास दुसऱ्याला उपेक्षा वाटते. सोशल मीडियावर इतरांच्या आदर्श वैवाहिक जीवनाचे प्रदर्शन पाहून आपल्याच नात्याची तुलना केली जाते, ज्यामुळे असमाधान निर्माण होते. पती-पत्नीमधील खासगी गोष्टी शेअर केल्या गेल्यास एकमेकांमध्ये राग आणि तिरस्कार निर्माण होतो. मैत्रीच्या नात्यातही हे घडत आहे. पूर्वी एखाद्या मित्राची एखादी गोष्ट खटकली तर चर्चा वा समेट व्हायचा, पण आता 'ब्लॉक', 'अनफ्रेंड' ही क्रिया इतकी सहज झाली आहे की, मैत्री संवाद न घडताच क्षणात संपते.

समाजशास्त्रज्ञ या बदलत्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना सांगताहेत की, सोशल मीडिया ही संवादवाहिनी न राहता राग, दुःख, सूड, वैफल्य या साऱ्या भावनांचा भडिमार करण्यासाठीचे एक आयुध बनले आहे. आज शेकडो-हजारो तरुणांचा, ज्येष्ठ नागरिकांचा, पती-पत्नींचा दिवसातील बराचसा वेळ किंवा संवाद हा सोशल मीडियाशी संबंधित असतो. त्यातील तपशील पाहिल्यास फुटकळ किंवा क्षुल्लक किंवा निरर्थक मुद्द्यांवरून सुरू झालेल्या या चर्चा बहुतांश वेळा टोकाच्या वादापर्यंत, भांडणांपर्यंत पोहोचतात. दुर्दैवाने याचे परिणाम तात्पुरते राहत नाहीत, तर ते दीर्घकालीन होतात, पण याचे गांभीर्यच कुणाला उरलेले नाहीये. भावनांचे सार्वजनिक प्रदर्शन हे एक मानसिक असंतुलनाचे लक्षण मानले जाते. यामुळे केवळ मानसिक तणाव वाढत नाही, तर अनेक वेळा नाती तुटतातही!

सायबर कायदेतज्ज्ञांच्या मते, एखाद्याचे फेक प्रोफाईल तयार करणे, ट्रोलिंग करणे, अश्लील मजकूर टाकणे किंवा कोणाचीही बदनामी करणे या सर्व डिजिटल विश्वातील कृती भारतीय माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हे आहेत. यासाठी ३ ते ७ वर्षांच्या शिक्षेचीही तरतूद आहे. तरीही अनेक युवक-युवती या गोष्टींकडे गांभीर्याने न पाहता भावनांच्या आहारी जातात आणि वाटेल ती शेरेबाजी करणाऱ्या पोस्टस् समाज माध्यमांमध्ये टाकताना दिसतात.

प्रत्यक्षात सोशल मीडिया ही संवादाची सोय आहे, संवादाची जागा नाही. खऱ्या भावना या समोरासमोर बसून ऐकणे, समजून घेणे आणि स्वीकारणे गरजेचे असते, पण आजच्या पिढीने ब्लॉक-अनब्लॉक हेच संवादाचे नवे साधन मानले आहे. यातून ताणतणाव, विसंवाद, सामाजिक एकटेपण, यांसारख्या समस्या तरुणाईत वाढत चालल्या आहेत. तसेच सततच्या निगेटिव्ह वर्तणुकीचा परिणाम आत्मविश्वासाबरोबरच शिक्षण, करीअर आणि नात्यांवर होत आहे. सोशल मीडियावर व्यक्त झालेला राग हे तात्पुरते समाधान देणारा असला तरी दीर्घकाळच्या मनोवेदना देणारा असतो.

### हे टाळण्यासाठी काय करायला हवं?

कुठलेही स्टेटस, पोस्ट ही सार्वजनिक होते. त्याचा परिणाम किती खोलवर जाईल, हे कोणालाच सांगता येत नाही. हे लक्षात ठेवूनच आणि विचार करूनच पोस्ट करा. दुसरे असे की, गोंधळ, गैरसमज, अपमान या सर्वांबाबतचे उत्तर पोस्टमध्ये नाही, तर समोरासमोर किंवा प्रत्यक्ष चर्चेत आहे. जगातील अनेक महाबिकट प्रसंग, इतकेच नव्हे तर घनघोर युद्धेही प्रत्यक्ष संवादाच्या मार्गानेच संपुष्टात आली आहेत हे लक्षात घ्या. त्यामुळे कसल्याही प्रकारचे गैरसमज, राग असले तरी संबंधित व्यक्तीशी प्रत्यक्ष संवाद साधा. सोशल मीडियावर वावरत असताना टोमणे ऐकणे, स्वाभिमान दुखावणे, नकारात्मक टिपण्या होणे या गोष्टी घडतात हे वास्तव स्वीकारा आणि त्यानुसार त्यांमध्ये किती गुंतून पडायचे हे ठरवा. फेक प्रोफाईल, ट्रोलिंग, बदनामी हे सर्व कायद्याच्या कचाट्यात आणणारे गुन्हे आहेत. शेअर करत असलेली प्रत्येक पोस्ट काळजीपूर्वक वाचा. ही गोष्ट जर कोणी माझ्याविषयी लिहिली असती तर? असा विचार करा.

लक्षात घ्या, संवादासाठी सोशल मीडिया वापरणं चुकीचं नाही, पण भावना, नाती आणि व्यक्तिमत्त्व यांचं राजकारण तिथं करणं निश्चितच अपायकारक आहे. त्यातून समाज माध्यमांवर माणूस जितका वेगाने कनेक्ट होतो, तितकाच तो स्वतःपासून आणि आपल्या जवळच्यांपासून डिस्कनेक्ट होतो. त्यामुळे आभासी जगाच्या आहारी न जाता रिअल लाईफमध्ये जगण्याला प्राधान्य द्या. वैयक्तिक नात्यांची जपणूक पोस्टमधून होत नाही. त्यासाठी संवाद, सहानुभूती आणि ऐकण्याची संस्कृती जोपासणे गरजेचे आहे. आपण या भावनिक रणांगणाला एक सुसंवादाचे व्यासपीठ बनवू शकतो. जाता जाता शेवटचा मुद्दा म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा अतिवापर ज्याप्रमाणे माणसाला बुद्धिमंदत्व आणण्यास कारणीभूत ठरू शकतो, तसाच सोशल मीडियातली गुरफट माणसाची विचारशक्ती मंदावू शकते. तेव्हा आभासी जगाच्या मगरमिठीतून वेळीच बाहेर पडा !

**महेश कोळी**

---


**'नवीन वेतन व निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम २०२५'**

# सेवानिवृत्तांचे आर्थिक व सामाजिक भविष्य अंधारात!

नोकरीनंतरचा जीवनकाल हा आर्थिकदृष्ट्या अनिश्चित असतो. उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाल्यानंतरही दैनंदिन गरजा, वैद्यकीय खर्च आणि जीवनमान टिकवण्यासाठी आर्थिक आधार आवश्यक असतो. यासाठीच निवृत्तीवेतन योजना ही एक महत्वाची सामाजिक व आर्थिक सुरक्षा प्रदान करणारी यंत्रणा आहे.परंतु अचानक सरकारने मार्च २०२५ मध्ये केंद्र सरकारने मंजूर केलेल्या 'नवीन वेतन आणि निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम, २०२५' अंतर्गत देशातील सर्व सेवानिवृत्त केंद्र व राज्य सरकारी सेवकांना आगामी वेतन आयोगाच्या लाभांपासून वगळण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे लाखो निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक सन्मानावर घाला येऊन हा कायदा प्रत्यक्ष अर्थाने 'काळा कायदा' ठरत आहे. विशेषतः शिक्षक, प्राध्यापक, लघुवर्गीय कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी यांच्यासाठी हा निर्णय जणू निवृत्तीनंतरच्या सन्मानासमोर 'राज्यप्रणीत अपमान' ठरत आहे. यामागील कारण एकतर त्यांना रिटायर्ड लोकांबद्दल सहानुभूती नाही, यातील बरेच लोक असे आहेत जे काँग्रेस च्या काळात नोकरीवर लागले आणि ते काँग्रेसचे मतदार होते पण असे कारण समोर करता येऊ शकत नसल्याने आर्थिक स्थिती नसल्याने हा निर्णय घ्यावा लागत आहे असे कारण समोर येईल. ही आर्थिक परिस्थिती आपोआप निर्माण झाली की चुकीच्या धोरणामुळे निर्माण झाली, हे तपासणे आवश्यक आहे त्याकरिता फक्त मुद्दे लक्षात घेतले तरी बरेच चित्र स्पष्ट होते.

१) गेल्या १० वर्षात म्हणजे १६.३५ लाख कोटी रुपये कर्ज माफ करण्यात आले असल्याचे १८ मार्च २०२५ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर दिले. आहे. त्यात मोजक्या उद्योगपतींचे कर्ज ७०३ च्या वर आहे. (हे तेच लोक असतात जे इलेट्रोल बाँड च्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना त्यातील काही भाग देत असतात.

२) खासदार/आमदार एक टर्म जरी निवडून आला तरी तो आयुष्यभराच्या जगण्याची सोय करून ठेवतो, हे काही लपलेले नाही, अर्थात याला निवडक अपवाद आहेतच. पण एकच व्यक्ती तीन/चार वेळेस निवडून आला तर त्याला चार पेंशन देणे हे न समजण्यासारखे गणित आहे. एकीकडे आर्थिक तरतुदी करून नोकऱ्या, सरकारी कंपनी वाढवणे, शैक्षणिक दर्जा सुधारणे, प्रवासी वाहतूक सुधारणे, आरोग्य सुविधा वाढवणे अशा अनेक मागण्या सातत्याने होत असताना त्यांना दुर्लक्षित करून न मागता लाडकी बहीण योजना अंमलात आणणे आणि काही सत्ताधाऱ्यांनी ती निवडणुकीसाठी आणली होती, हे कबुल करणे अत्यंत चुकीचे धोरण आहे.वित्त कायदा २०२५ चा प्रत्यक्ष अर्थ असा की, सरकार आर्थिक वर्षामध्ये कोठून व कसे पैसे उभारते आणि त्याचा कसा वापर करते, यासाठी हा कायदा कायदेशीर चौकट प्रदान करतो.



१९७२ चा पेन्शन कायदा आणि १९८३ चा ऐतिहासिक चंद्रचूड निकाल, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या इतर निर्णयांतून पेन्शनधारकांना मिळणारे संरक्षण अद्यापही अबाधित आहे. हे संरक्षण सुनिश्चित करते की, वित्त कायद्यात कोणतेही बदल झाले तरी, पेन्शनधारकांना शेवटच्या पगाराच्या समतुल्य पेन्शन आणि संबंधित लाभ मिळणे चालू राहील.

केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम २०२१ – नियम ३७ मध्ये सुधारणा-पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागाने, अर्थ मंत्रालय आणि कार्मिक व प्रशिक्षण विभागाशी सल्लामसलत करून केंद्रीय नागरी सेवा (पेन्शन) नियम २०२१ च्या नियम ३७(२९)(क) मध्ये सुधारणा जाहीर केली आहे. या सुधारित नियमांतर्गत विशेषतः सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कर्मचाऱ्यांच्या अशा प्रकरणांचा समावेश केला गेला आहे, जिथे सरकारी सेवेतून स्थानांतरित झाल्यानंतर गैरवर्तनामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल. नवीन तरतुदीनुसार, जर अशा कर्मचाऱ्याला सेवेत सामावल्यावर गैरवर्तनासाठी बडतर्फ किंवा सेवेतून वगळले गेले, तर सरकारकडून दिल्या गेलेल्या सेवेसाठीचे निवृत्तीवेतन लाभही जप्त केले जाऊ शकतात. तसेच, सार्वजनिक उपक्रमांतून बडतर्फी, सेवेतून वगळणे किंवा इतर अनुशासनात्मक कारवाईसंबंधी निर्णय संबंधित मंत्रालयाच्या प्रशासकीय पुनरावलोकनाच्या अधीन असतील. याशिवाय, सरकारी कर्मचाऱ्यांवर लागू असलेल्या तरतुदीच या सार्वजनिक उपक्रमातील कर्मचाऱ्यांवरही लागू करण्यात आल्या आहेत.

वेतन आयोग लाभापासून वंचित आणि न्यायाला पायबंद-नवीन कायद्यानुसार, २०२६ साली होणाऱ्या आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसी जुन्या पेन्शनधारकांवर लागू होणार नाहीत. म्हणजेच यापुढे त्यांच्या महागाई भत्त्यांमध्ये वाढ होणार नाही, किंवा त्यांच्या मूलभूत वेतनात कोणतीही सुधारणा केली जाणार नाही. सरकारी सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झालेल्या लाखो कर्मचाऱ्यांना जगाच्या वाढत्या जीवनखर्चा पासून संरक्षण मिळणे अपेक्षित असते. मात्र, या कायद्याने त्यांच्या हातातील निवृत्तिवेतन आणि महागाई भत्त्याचे गणित एकाएकी स्थिर करून टाकले आहे.

कलम ३०९ अंतर्गत बदल: घटनात्मक स्वायत्ततेला गालबोट-संविधानातील अनुच्छेद ३०९ नुसार, केंद्र किंवा राज्य शासनाला शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी ठरविण्याचा अधिकार आहे. परंतु, या कायद्यातील तरतुदींनुसार केंद्र सरकारने यापुढे वेतन आयोग गठित करणे ही सक्ती न ठेवता त्याबाबत पूर्ण अधिकार स्वतःकडे राखून ठेवले आहेत. यामुळे दर १० वर्षांनी वेतन आयोग गठित करावा लागेल, ही व्यवस्था नष्ट झाली आहे. याचे दूरगामी परिणाम शासकीय सेवकांच्या वेतन व्यवस्थेवर व त्याच्या एकसंधतेवर होतील.

न्यायालयात जाण्यासाठी निर्बंध म्हणजे लोकशाही मूल्यांवर गदा-'नवीन वेतन व निवृत्तीवेतन सुधारणा अधिनियम, २०२५'याकायद्यातील सर्वात गंभीर बाब म्हणजे या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे संविधानात दिलेल्या न्याय हक्काच्या संकल्पनेवरच आघात झाला आहे. कोणत्याही कायद्याचा प्रभाव जर नागरिकाच्या मूलभूत हक्कांवर होत असेल, तर त्याविरोधात न्यायालयात जाणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, या कायद्यात तोच मार्ग बंद करण्यात आला आहे, हे अतिशय धोकादायक लक्षण आहे.

संपूर्ण नियंत्रण सरकारकडे-पेन्शन दर, पुनरावलोकन प्रक्रिया, सुधारणा यांसारख्या सर्व बाबींवर सरकारला पूर्ण अधिकार दिले गेले आहेत. यामुळे आधीची पारदर्शक आणि न्यायप्रवण वेतन आयोग प्रणाली हटवून ती प्रशासनाच्या इच्छाधारी निर्णयांवर आधारित करण्यात आली आहे. याचा अर्थ, भविष्यात कोणत्याही बदलासंबंधी सरकारी कर्मचाऱ्यांना अधिकार, भूमिका किंवा विचारविनिमयाची संधी मिळणार नाही. कायद्याचे संभाव्य दुष्परिणाम -१. ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सेवा, औषधे, विमा, आणि जीवनावश्यक वस्तूंवर होणाऱ्या खर्चासाठी शासनाकडून काहीही आधार मिळणार नाही. महागाई दर प्रचंड वेगाने वाढत असताना स्थिर निवृत्ती वेतन हे आर्थिक असमानतेला अधिक तीव्र करणारे ठरेल.२. जीवनभर राष्ट्रसेवा करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, व इतर सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर शासकीय धोरणामुळे वेतनसमान तेपासून वंचित ठेवले जाते, हे अत्यंत लज्जास्पद आणि अमानवी आहे. या निर्णयामुळे 'सेवानिवृत्त जीवन म्हणजे दुर्लक्षित जीवन' हे सामाजिक सन्मानाला तडा असा अर्थ निर्माण होतो. ३.न्यायिक दाद मागण्याचा अधिकार काढून घेणे म्हणजे लोकशाही शासनाच्या पायावर कुऱ्हाड मारणे. ही बाब संपूर्ण समाज व्यवस्थेतील विश्वासाला हादरा देणारी असून लोकशाहीची मानहानी आहे

हा कायदा घटनाविरोधी व अन्यायकारक असल्यामुळे संपूर्णतः मागे घेतला पाहिजे. संविधानाच्या कलम ३०९ चा आधार घेऊन वेतन आयोगाच्या स्वायत्ततेला बाधा येऊ नये, जुन्या व नवीन पेन्शनधारकांमध्ये भेदभाव न करता सर्वांना समान पद्धतीने लाभ लागू करावेत. विविध कर्मचाऱ्यांच्या संघटना, शिक्षक संघ, प्राध्यापक संघ, सामाजिक चळवळी आणि विधिज्ञ यांना एकत्र आणून सामूहिक लढा उभारला गेला पाहिजे. या कायद्याविरोधात जनजागृती मोहीम, माध्यमांमधून प्रश्न उपस्थित करणे, निवेदने, जनमत चाचण्या, आंदोलने इ. मार्गांनी संसदेबाहेर आवाज पोहोचवावा शासनावर दबाव निर्माण केला पाहिजे. हा लढा केवळ पेन्शनसाठी नाही, तर सन्मानपूर्वक जगण्याच्या अधिकारासाठी आहे. संविधान, न्याय, आणि सामाजिक न्याय यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाने या लढ्याशी स्वतःला जोडणे, ही काळाची गरज आहे.

**प्रा.डॉ.प्रशांत विघे**
भारतीय महाविद्यालय,
अमरावती
९३२६८७७७४९

---

# संगणक शाखेची वाढती लोकप्रियता आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील एक क्रांतीकारी टप्पा ठरले आहे. शिक्षणाची चौकट, अभ्यासक्रम रचना, कौशल्या धारित प्रशिक्षण आणि मूल्यांकन प्रक्रियेतील अमुलाग्र बदल या धोरणामुळे घडून आले आहेत. या बदलांचा परिणाम आता अभियांत्रिकी शिक्षणावर आणि प्रवेश प्रक्रियेवरही स्पष्टपणे जाणवू लागला आहे. ऍ २०२० चा योग्य उपयोग केल्यास संगणक शाखेसह सर्वच अभियांत्रिकी शाखांमध्ये नव्या पिढीला बहुआयामी संधी उपलब्ध होऊ शकतात. गरज आहे ती फक्त योग्य मार्गदर्शन, स्पष्ट माहिती आणि सजग निर्णय यांची. संत कबीर आपल्या प्रसिद्ध दोह्यात म्हणतात..

*ज्यों की चाकी देख के, दिया कबीरा रोय।*
*दो पाटन के बीच में, साबुत बचा न कोय?'*

स्पर्धेच्या चक्रात योग्य मार्गदर्शन आणि विचारपूर्वक निर्णय न घेतल्यास विद्यार्थी भरडले जाऊ शकतात, हे आजच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये विशेषतः प्रकर्षाने दिसून येते.

आजच्या माहिती-तंत्रज्ञानाधारित युगात संगणक शाखा ही रोजगार, नवोपक्रम (स्टार्टअप्स), संशोधन व जागतिक बाजारपेठेत संधी निर्माण करणारी शाखा बनली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची पसंती मोठ्या प्रमाणात संगणक शाखेकडे झुकलेली आहे. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी, आय. ओ. टी. यासारख्या आधुनिक उपशाखा उपलब्ध असल्यामुळेही ही शाखा विद्यार्थ्यांच्या प्रचंड पसंतीस उतरत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थी व पालक 'फक्त संगणक शाखा मिळावी' अशी अपेक्षा ठेवून प्रवेश प्रक्रियेत सहभागी होतात. नुकताच एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर झाला असून, माझ्याकडे अनेक पालक त्यांचा टक्केवारीनुसार कोणते महाविद्यालय मिळेल याची चौकशी करतात. त्यामध्ये जवळजवळ सर्वच पालकांचा आग्रह संगणक शाखेवर असतो. ही वाढती मागणी पाहता अनेक



महाविद्यालयांनी संगणक शाखा व तिच्या संबंधित उपशाखांमध्ये प्रवेश क्षमतेत लक्षणीय वाढ केलेली आहे.

पण येथे एक महत्त्वाचा विचार करणे आवश्यक आहे – ही मागणी आणि पूर्तता यावर आधारित आहे. जेव्हा मोठ्या प्रमाणावर संगणक अभियंते निर्माण होतील , तेव्हा त्या शाखेतील नोकरीच्या संधी तुलनेत कमी वाटू लागतील, परिणामी स्पर्धा अधिक तीव्र होईल आणि काहींना अपेक्षित नोकऱ्या मिळणे कठीण होईल. म्हणूनच अभियांत्रिकी शाखा निवडताना 'सध्या काय ट्रेंड आहे?' यापेक्षा 'चार वर्षांनंतर संधी कशा असतील?' याचा विचार करणे अधिक आवश्यक आहे. कारण इंजिनिअरिंग हा चार वर्षांचा कालावधी असलेला अभ्यासक्रम आहे. अभियांत्रिकी शाखांमध्ये मागणीचा एक चक्राकार प्रवाह असतो – कधी संगणक अग्रेसर असते, तर कधी मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल यांसारख्या मूळ शाखांना अधिक मागणी असते.

काही पालक विचारतात, 'जर मुलाने मुख्य शाखा (उदा. सिव्हिल, मेकॅनिकल) घेतली आणि पुढील चार वर्षांमध्ये संगणक क्षेत्रातच अधिक संधी राहिल्या, तर काय?' – याचे उत्तर २०२० मध्ये आहे. पूर्वी केवळ पारंपरिक आणि एकल शाखांवर आधारित शिक्षण दिले जात असे, परंतु NEP मुळे आता बहु-शाखीय अभ्यासक्रम रचना अस्तित्वात आली आहे. त्यामुळे सिव्हिल किंवा मेकॅनिकल विभागात शिकणारा विद्यार्थी देखील संगणक इंजिनिअरिंगमधील विशिष्ट विषयांचा अभ्यास करू शकतो. यामुळे विद्यार्थ्याला दोन्ही क्षेत्रांची समज प्राप्त होते आणि तो 'cross-domain skilled' बनतो. अशा प्रकारे संगणक शाखा न घेताही त्यातील कौशल्ये आत्मसात करता येतात. ही धोरणाची मोठी संधी मात्र अनेक पालक आणि विद्यार्थ्यांना माहितीअभावी ती संधी ज्ञात नसते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे आता पारंपरिक वर्गशिक्षणाबरोबरच ऑनलाईन शिक्षणालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मंचांद्वारे संगणक अभियांत्रिकीसह इतर आधुनिक विषयांचे अभ्यासक्रम आता घरबसल्या शिकता येतात. स्वयम, एनपिटिईएल, एआयसीटीई ऑनलाइन कोर्स, तसेच कौर्सेरा, एडएक्स, युडेमीयांसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, प्रोग्रॅमिंग, सायबर सिक्युरिटी यांसारख्या विषयांवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि व्यावसायिक पदविका सहज मिळवता येतात. हे ऑनलाईन अभ्यासक्रम बहुतेक वेळा स्व-अध्ययनासाठी असतात, त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळेनुसार अभ्यास करता येतो. संगणक शाखा निवडू न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे एक सुवर्णसंधी आहे.इतर शाखांमध्ये शिकत असतानाच ते संगणक विषयातही पारंगत होऊ शकतात. या ऑनलाईन शिक्षणामुळे बहुशाखीय कौशल्ये विकसित होतात आणि विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील स्पर्धेसाठी अधिक सक्षम करता येते.

त्यामुळे, केवळ कोणती शाखा निवडली यावर भर न देता, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासात अशा ऑनलाईन साधनांचा पुरेपूर उपयोग करून स्वतःला अधिक मूल्यवान बनवावे.

अज्ञानामुळे चुकीचे निर्णय घेतले जातात आणि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांनी व पालकांनी केवळ गुणांकन किंवा केवळ महाविद्यालयाचे रँक पाहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करू नये. शिक्षणाचे स्वरूप, उद्योगज गताची गरज, नवतंत्रज्ञानाची दिशा, विद्यार्थ्यांची स्वतःची आवड व क्षमता, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चा दूरगामी परिणाम यांचा सखोल विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अशा विचारपूर्वक निवडीमुळेच शिक्षणाची गुणवत्ता वाढते आणि विद्यार्थी भविष्यात यशस्वी व आत्मनिर्भर ठरतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे अभियांत्रिकी शिक्षणाच्या नव्या शक्यता खुल्या झाल्या आहेत. आजची संगणक शाखेची मागणी उद्याही कायम राहीलच असे नाही, आणि आज ज्या कोअर ब्रांचेस कमी पसंतीच्या आहेत, त्यांनाच उद्याचे उज्वल भविष्य असू शकते. त्यामुळे फक्त आजच्या मागणीवर निर्णय न घेता, दूरदृष्टीचा अभ्यासू दृष्टिकोन ठेवून सूचित निर्णय घेणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे कोणतीही शाखा ही 'चांगली' किंवा 'वाईट' नसते; त्या शाखेत विद्यार्थी स्वतः किती प्रगती करतो, त्याचे कौशल्य किती विकसित होते आणि तो कशा प्रकारे स्वतःला सिद्ध करतो, यावरच त्याचे यश अवलंबून असते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे अभियांत्रिकी शिक्षणाच्या नव्या शक्यता खुल्या झाल्या आहेत. आजची कम्प्युटर शाखेची मागणी उद्याही कायम राहीलच असे नाही, आणि आज ज्या कोअर ब्रांचेस कमी पसंतीच्या आहेत, त्यांनाच उद्याचे उज्वल भविष्य असू शकते.

त्यामुळे फक्त आजच्या मागणीवर निर्णय न घेता, अभ्यासू दृष्टिकोन ठेवून सूचित निर्णय घेणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे – कोणतीही शाखा ही 'चांगली' किंवा 'वाईट' नसते; त्या शाखेत विद्यार्थी स्वतः किती प्रगती करतो, त्याचे कौशल्य किती विकसित होते आणि तो कशा प्रकारे स्वतःला सिद्ध करतो, यावरच त्याचे यश अवलंबून असते.



**प्रा. डॉ. मंदार देशमुख**
संगणक विभाग,
अभियांत्रिकी व तांत्रिकी
महाविद्यालय, अकोला
८८८८३९८७७७

# आरोग्य राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांची डॉ. हेडगेवार रुग्णालयाला सदिच्छा भेट



■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्रीय कुटुंब कल्याण व आरोग्य राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी मंगळवारी अकोला येथील डॉ. हेडगेवार रुग्णालय व अनुसंधान केंद्राला सदिच्छा भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी रुग्णालयातील वैद्यकीय सेवा, विविध उपक्रम, रुग्ण हितासाठी राबविल्या जाणाऱ्या सामाजिक प्रकल्पांची सखोल माहिती घेतली.

खासदार जाधव रुग्णालयाच्या विविध विभागांना भेट देताना रुग्ण, नातेवाईक व वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी उपचारपद्धती, उपलब्ध तंत्रज्ञान, संशोधनाची दिशा आणि रुग्णालय प्रशासनाची कार्यपद्धती जाणून घेतली.

रुग्णालय प्रशासनाने त्यांना डायलिसिस विभाग, पॉथॉलॉजी लॅब, आणि सेवांबद्दल माहिती दिली. यावेळी रुग्णालयाचे प्रकल्प प्रमुख डॉ. श्री विनायक देशमुख व डॉ. पार्थसारथी शुक्ल तसेच संचालक मंडळातील सदस्य यांनी प्रकल्पाची माहिती दिली. ग्रामीण व गरीब रुग्णांसाठी चालवलेल्या विशेष मोहिमा, आरोग्य शिबिरे, आरोग्य जनजागृती उपक्रम यांचेही त्यांनी कौतुक केले. आणि डॉक्टर्स दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

खा. जाधव यांनी रुग्णालय प्रशासन, डॉक्टर, कर्मचारी, अकोला अर्बन बँक कर्मचारी सेवा समितीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या भेटीमुळे रुग्णालयातील सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्यांना नवा उत्साह यांना बळकटी मिळेल, असा विश्वास रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केला.

या प्रसंगी डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे उपाध्यक्ष संजीव सोमाणी, सचिव संदीप हातवळणे, कोषाध्यक्ष मधुर खंडेलवाल, पंकज पाठक, सदस्य डॉ. पार्थसारथी शुक्ल, डॉ. भरत पटोकार, नरेंद्र पावडे, डॉ.अजयसिंह चौहान, डॉ. आशिष तापडिया, महेश जोशी, अकि.अतुल बंग, प्रवीण वाणी, प्रा. किशोर बुटोले, ॲड. धनंजयजी पाटील, मार्गदर्शक केदार खपली, समीर थोडगे, श्री रविंद्र देशमुख, व्यवस्थापक संजय ठोकळ, राजेश हेगू , डॉ. तुषार चरखा यांच्यासह रुग्णालयाचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## अकोला महानगरपालिका, अकोला
### स्वच्छता विभाग

### ई - निविदा सुचना क्र. २ (तिसरी वेळ)

अकोला महानगरपालिका अंतर्गत दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन करिता कचरा घंटागाडी व इतर वाहनांवर लावण्यात आलेल्या GPRS प्रणाली अंतर्गत कार्यान्वित GPS Tracking system चे Renewal / Subscription / Maintenance करिता पुढील ०२ वर्षांकरिता संस्था नियुक्त करणे करिता दि. ०१.०७.२०२५ रोजी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर तिसरी वेळ ई - निविदा प्रसिध्द करण्यात आली असून या कामासंबंधी सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Portal https://maharashtra.etenders.in
Sub Portal https://aklmc.maharashtra.etenders.in

**उपायुक्त**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/स्वच्छता/५२/२०२५,
स्वच्छता विभाग,
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : १/७/२०२५

# अहिल्यादेवी शिशुवाटिकेमध्ये लहानग्यांचा किलबिलाट सुरू

**अकोला :** विद्याभारती संचालित अहिल्यादेवी शिशुवाटिकेमध्ये शैक्षणिक सत्र २०२५-२६ च्या प्रारंभानिमित्त दिनांक १ जुलैपासून पूर्व प्राथमिक गटातील चिमुकल्यांची शाळा उत्साहात सुरू झाली. विद्याभारती ही देशभरात २५ हजाराहून अधिक शाळा चालवणारी प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था असून, सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. भारतीय संस्कृतीशी नाते जोडणारे मूल्याधिष्ठित शिक्षण आणि आधुनिक काळाशी सुसंगत ज्ञान यांचा समन्वय साधत विद्याभारतीच्या शाळा देशभरात विद्यार्थी घडवत आहेत. अहिल्यादेवी शिशुवाटिकेच्या



परिसरात लहानग्यांच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आनंदाने आणि कुतूहलाने शाळेच्या प्रांगणात प्रवेश केला. मुख्याध्यापिका माई मॅडम यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे औक्षण करून गुलाब पुष्प देत मनःपूर्वक स्वागत केले, तर अन्य शिक्षिकांनी त्यांच्या स्वागतार्थ फुले उधळली. विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम श्री सरस्वती पूजन करून शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी हळदी-कुंकवाच्या पावलांचे ठसे उमटवत आपापल्या वर्गात प्रवेश केला. शाळेच्या शिक्षिका पूनम तिवारी, अर्चना पित्तलवार, मंगल धायडे व सुप्रिया पिम्पुटकर यांनी या विशेष दिवसानिमित्त सुंदर व कल्पक आयोजन केले.

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.

जा.क्र./ तह/प्रस्तु-१/कावि-१३४२/२०२५ दिनांक २६/०६/२०२५

मौजे कटपार ता. जि. अकोला येथील गट क्र. १५५/१ या शेतजमिनीच्या इतर अधिकारात असलेला म ज म अ १९६६ च्या कलम ३६ व ३६ अ अन्वये हस्तांतरणास बंदी व बाबाराव संपतराव यांनी कला साहेबराव याजपासून सालीम सन ५६-५७ साली वहीती केले म्हणून वि शे प नी कायदा १९५१ नुसारतो सं प झाला हा शेरा कमी करणाबबत.

### जाहीरनामा

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. प्रज्वल गुलाबराव गावंडे रा. कटयार ता. जि. अकोला यांनी मौजे कटयार ता. जि. अकोला येथील गट क्र. १५५/१ या शेतजमिनीच्या इतर अधिकारात असलेला म ज म अ १९६६ च्या कलम ३६ व ३६ अ अन्वये हस्तांतरणास बंदी व बाबाराव संपतराव यांनी कला साहेबराव याजपासून सालीम सन ५६-५७ साली वहीती केले म्हणून विशे पनी कायदा १९५१ नुसारतो से प झाला हा शेरा कमी करणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का **तहसिलदार अकोला**

### जाहीर नोटीस
## वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०५६/२०२४ प्रोसेस नं.१००७९/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. मोहम्मद सलिम मोहम्मद ख्वाजा रा. लक्ष्मी कॉलनी, अकोट रोड, पो आणि जि. अकोला. २. श्रीमती रझिया बानो शेख इब्राहिम रा. इकबाल कॉलनी, मोहता मिल रोड, पो. अकोला. ता. जि. अकोला ३. मोहम्मद साबिर मोहम्मद ख्वाजा रा. कासिदपुरा पो. अचलपूर, जि. अमरावती. ४. श्रीमती नसिम बानो मोहम्मद फिरोझ रा. मुझफ्फर नगर, लकडगंज, अकोला. ५. मोहम्मद साजिद मोहम्मद ख्वाजा रा. कासिदपुरा, पो. अचलपुर जि. अमरावती. ६. श्रीमती. शमिम बानो शेख अनवर रा. मुझफ्फर नगर, लकडगंज, अकोला. ७. श्रीमती समिना बानो रहेमान खान रा. मुल्लानी चौक, नुरानी मस्जिद जवळ, खदान पो आणि जि. अकोला ८. कु. यामीन बानो मोहम्मद ख्वाजा रा. मुझफ्फर नगर, हकानिया मस्जिदच्या मागे, लकडगंज, पो आणि जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** मोहम्मद जावेद मोहम्मद ख्वाजा रा. मुझाफ्फर नगर, हकानिया मस्जिदच्या मागे, ख्वाजाभाई घरी, लकडगंज, पो. व जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मोहम्मद ख्वाजा शेख रहेमान
**पत्ता :-** रा. मुझाफ्फर नगर, हकानिया मस्जिदच्या मागे, लकडगंज, पो आणि जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहम्मद ख्वाजा शेख रहेमान यांचे दि. १५/०३/२०१६ रोजी मुझाफ्फर नगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ६२६/२०२५ प्रोसेस नं.९६२१/२०२५
चौ.ता. ३१/०७/२०२५ दिनांक : २४/०६/२०२५

**अर्जदार :** Disha Sourabh Pawar Alias Disha Samadhan sapkal, R/o Near Swami Samarth Mandir Sinchan Nagar, Parbhani Tq & Dist Parbhani.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** The Washim Urban Co Operative Bank Ltd, Washim Branch Old Cloth Market, Akola TQ & Dist Akola
**मयताचा पत्ता :-** मयत : १. समाधान त्र्यंबक सपकाळ २. निर्मला समाधान सपकाळ
**पत्ता :-** रा. नुतन शाळेजवळ मातानगर अकोला ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. समाधान त्र्यंबक सपकाळ यांचे दि.२७/११ / २०१६ रोजी साईबाबा मोटे सब डिस्टिक्स हॉस्पीटल अकोट रोड रेल्वेगेट शेगाव ता. शेगाव जि. बुलढाणा येथे निधन झाले आहे. तसेच २. निर्मला समाधान सपकाळ यांचे दि.२१/०२/२०२४ रोजी मायसावली केअर सेंटर कोरे नगर, मोरेवाडी कोल्हापूर येथे निधन झाले आहे. ३. अभिषेक समाधान सपकाळ यांचे दि.१०/११/२०२१ रोजी दगडपारवा अकोला येथे निधन झाले आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, सदरहू निर्मला समाधान सपकाळ यांचे नावे एकूण २५ एफडी आहेत ज्यात रू. ५०५४०४/- इतकी एकूण रक्कम आहे. त्या एफडी खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Name of Investor | Name of Nominee | Account No. | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329521 | 17000/- |
| 2 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329673 | 42000/- |
| 3 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329765 | 18500/- |
| 4 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329923 | 20000/- |
| 5 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31330207 | 10000/- |
| 6 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329999 | 10000/ |
| 7 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31330378 | 18000/ |
| 8 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31330463 | 51000/- |
| 9 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31330513 | 13000/- |
| 10 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31331028 | 14000/- |
| 11 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31331653 | 32129/- |
| 12 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31339924 | 22133/- |
| 13 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328138 | 21000 |
| 14 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328251 | 18000 |
| 15 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328424 | 11000/- |
| 15 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328582 | 11000/- |
| 17 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328685 | 14000/ |
| 18 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328451 | 8000/ |
| 19 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329051 | 14000/- |
| 20 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31329190 | 52550/- |
| 21 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328580 | 5337 |
| 22 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328679 | 7671 |
| 23 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31328064 | 42000/- |
| 24 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31331607 | 14000/ |
| 25 | Nirmala Samadhan Sapkal | Abhishek S. Sapkal | 31331606 | 18884/- |
| | | | Total | 505404/- |

सदर लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांच्या शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०५०/२०२५ प्रोसेस नं.९७३५/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. व्दारकाबाई नारायण गोपनारायण रा. खेकडी नवथळ, ता. जि. अकोला २. विमल गजानन शिरसाट रा. आगर, ता. जि. अकोला ३. सुभाष नारायण गोपनारायण ग. खेकड़ी नवथळ, ता. जि. अकोला ४. धनराज नारायण गोपनारायण रा. मु. पो दोनावाडा, ता. जि. अकोला. ५. सविता गजानन तायडे रा. नकाशी. ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण गेंदाजी गोपनारायण
**पत्ता :-** रा. खेकडी नवथळ, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण गेंदाजी गोपनारायण यांचे दि. २०/०६/२०१३ रोजी खेकडी नवथळ ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९८७/२०२५ प्रोसेस नं.९१६०/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ दिनांक : १८/०६/२०२५

**अर्जदार :** १. अनिल जनार्दन मानकर रा. रिंग रोड, रामकृष्ण नगर, तुकाराम हॉस्पिटल मागे, चांदुर, अकोला. २. वृषाली अनिल मानकर (लग्नापूर्वीचे नाव) वृषाली राहुल ठाकरे (लग्नानंतरचे नाव) रा. फ्लॅट क्र. जी - ६०३, लक्षदीप पॅलेस, एच.डी.एफ.सी. बँक, पिंपले सौदागर, पुणे. ३. अदिती अनिल मानकर (लग्नापूर्वीचे नाव) - अदिती अभिजीत राउत (लग्नानंतरचे नाव) रा. बी-६०३, साई मारीगोल्ड रहतानी रोड, हिलिंग टच हॉस्पिटल, पिंपले सौदागर, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : स्व. अरूणा अनिल मानकर
**पत्ता :-** रा. व्दारा अनिल जनार्दन मानकर रा. रिंग रोड, रामकृष्ण नगर, तुकाराम हॉस्पिटल मागे, चांदुर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरूणा अनिल मानकर यांचे दि. ०१/०६/२०२३ रोजी केशव नगर, रामकृष्ण नगर, रिंग रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २१५/२०२५ प्रोसेस नं.९५३६/२०२५
चौ.ता. ०७/०७/२०२५ दिनांक : २३/०६/२०२५

**अर्जदार :** १. संतोष विष्णू जगताप २.किसन विष्णु जगताप दोघेही रा. बोरगांव खू. पातूर नंदापूर, पो, पिंजर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुमन विष्णू जगताप
**पत्ता :-** रा. बोरगांव खू. पातूर नंदापूर, पो. पिंजर, ना. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुमन विष्णू जगताप यांचे दि. २०/०५/२०२४ रोजी बोरगाव खु. पातूर नंदापूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०५३/२०२५ प्रोसेस नं.९७३४/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. वंदना जिवन ठाकुर २. खुशी जिवन ठाकुर ३. सुशिला देविसिंग ठाकुर सर्व रा. हनुमान मंदिराजवळ हरीहरपेट गाडगे नगर, जुने शहर अकोला ता.जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जिवन देविसिंग ठाकुर
**पत्ता :-** रा. गाडगे नगर, हरिहर पेठ, जुने शहर, अकोला ता.जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जिवन देविसिंग ठाकुर यांचे दि. २८/०४/२०१८ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०४३/२०२५ प्रोसेस नं.९७३१/२०२५
चौ.ता. ३१/०७/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. निलेश रामदास ठक २. प्रमोद रामदास ठक ३. कांचन किशोर इंगळे अर्जदार क. १ ते ३ रा दत्तात्रय अपार्टमेंट समोर, रवि नगर, संताजी नगर, ता जि. अकोला ४. सुनंदा शार्दुल मते रा. गोयनका लेआउट, मुकुंद नगर जवळ, फ्लॅट नं जी - २, माँ वैष्णवी पार्क नं. ३ ता. जि. अकोल

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामनाथ रघुनाथ ठक २. नलिनी रामदास ढक
**पत्ता :-** रा. रवी नगर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. रामदास रघुनाथ ठक यांचे दि. १६/१०/२०२४ रोजी सुधीर कॉलनी अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत २. नलिनी रामदास ढक यांचे दि. ०५/०६/२०२१ रोजी रवि नगर अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०४२/२०२५ प्रोसेस नं.९७१५/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. मनोरमा पांडुरंग तराळे रा. देगांव ता. अकोला जि. अकोला २. देवलाल विठ्ठल वरणकार ३. विनायक विठ्ठलराव वरणकार ४. वंदना छगन मुंडोकार अर्जदार क्र. २ ते ४ रा. वार्ड नं २, घुसर, ता. जि. अकोला. ५. पुरुषोत्तम विठ्ठलराव वरणकार रा. स्मशान भूमीसमोर मोठी उमरी, ताथोड नगर, अकोला. ता. जि. अकोला. ६. उमाबाई बलदेव चांदुरकर रा. उगवा ता. जि. अकोला. ७. निर्मला प्रकाशराव वाघमारे रा. मांजरी ता. जि अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विठ्ठल सिताराम वरणकार २ देवकी विठ्ठल वरणकार
**पत्ता :-** रा. घुसर ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठल सिताराम वरणकार यांचे दि. २६/०४/२००६ रोजी घुसर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत देवकी विठ्ठल वरणकार यांचे दि. ०१/०२/२०२२ रोजी घुसर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांका ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०५९/२०२४ प्रोसेस नं.१००८१/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. उमा नामदेव उंम्बरकर रा. माहुली धांडे ता. दर्यापूर, जि. अमरावती २. विमल अशोकराव शेवाने रा. कोतेगाव ता. अंजनगाव सुर्जी जि. अमरावती ३. सिंधु प्रभाकर शहाकार रा. बोरखडी खुर्द, ता. भातकुली जि. अमरावती ४. इंदुबाई गजानन शेवणे रा. धारेल रेल, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मीबाई हरिभाउ सुभेकार
**पत्ता :-** रा. पळसो. बु. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मीबाई हरिभाउ सुभेकार यांचे दि. २७/०४/२०१९ रोजी ग्रा. पं. बोरखडी, ता. भाकतुली जि. अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबद वारस प्रमाणपत्र मिळास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ९८३/२०२५ प्रोसेस नं.९१५४/२०२५
चौ.ता. २४/०७/२०२५ दिनांक : १८/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती विमल अरूण छपानीमोहन २. प्रविण अरुण छपानीमोहन दोघेही रा. गवारे लेआउट, खरप रोड, न्यू तापडिया नगर, अकोला, ता. जि. अकोला. ३. स्मिता विनोदकुमार दुबारा रा. अ-१०९ कान्केट प्लाझो, न्यु राघवेंद्र नगर, मलकजगिरी, उप्पल, हैद्राबाद ५०००३६. ४. अमोल अरुण छपानीमोहन रा. जी- २ / २०३, प्रमुख ग्रीन्स, दमन रोड, छाला, वापी, जि. वळसद ३९६१९१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अरूण तुळशीराम छपानीमोहन
**पत्ता :-** रा. गवारे लेआउट, खरप रोड, न्यू तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरूण तुळशीराम छपानीमोहन यांचे दि. ०७/०१/२०२१ रोजी न्यू तापडिया नगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयताम वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०२६/२०२४ प्रोसेस नं.१००८३/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती. वनिता सुनिल वाळसकर २. हरिष सुनिल वाळसकर ३. अश्विन सुनिल वाळसकर तिघेही रा. न्यू हिंगणा, वाशिम रोड, अकोला. ता. जि. अकोला ४. सौ. कांचन मंगेश आरे. रा शेलोडी, ता. खामगांव जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुनिल हरिभाउ वाळसकर
**पत्ता :-** रा. न्यु हिंगणा, वाशिम रोड, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुनिल हरिभाउ वाळसकर यांचे दि. ०३/०५/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०२७/२०२५ प्रोसेस नं.९५६१/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ दिनांक : २४/०६/२०२५

**अर्जदार :** १. सौ. प्रिती सुरेशे डंबोळे रा. पॉवर हाउस कॉलनी, अहेरी, ता. अहेरी जि. गडचिरोली २. सौ. रश्मी युवराज चौधरी विवाहपूर्वी रश्मी राधाकृष्ण दहापुते ३. प्रसाद राधाकृष्ण दहापुते क २ व ३ रा. हर्ष अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राच्या मागे, शास्त्री नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. प्रज्ञा परेश कोठारी रा. जि२, ७०४, स्विस काउंटी, थरगाव, पिंपरी चिंचवड पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : उषा राधाकृष्ण दहापुते
**पत्ता :-** रा. हर्ष अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राच्या मागे, शास्त्री नगर, अकोला. ता.जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत उषा राधाकृष्ण दहापुते यांचे दि. ०७/११/२०२४ रोजी पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस
## वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १०५७/२०२५ प्रोसेस नं.९७३३/२०२५
चौ.ता. १२/०८/२०२५ दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. सुरेश रामदास कुळकर्णी २. श्याम सुरेश कुळकर्णी ३. चंद्रकांत सुरेश कुळकर्णी सर्व रा. डाबकी रोड, गिताई मंगल कार्यालय जवळ, जोगळेकर प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला ४. श्रीमती सुनिता सतिष कुळकर्णी रा. डबल जीन, जुना जालना, ता. जि. जालना

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुषमा सुरेश कुळकर्णी
**पत्ता :-** रा.व्दारा सुरेश रामदास कुळकर्णी डाबकी रोड, गिताई मंगल कार्यालय जवळ, जोगळेकर प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुषमा सुरेश कुळकर्णी यांचे दि. ०१/०४/२०२० रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का **आदेशानुसार** प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २१७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# सौर कृषिपंपांच्या समस्यांवर महावितरणतर्फे ऑनलाईन सुविधा

## तक्रार केल्यानंतर तीन दिवसांत दुरुस्ती होणार

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषिपंपांची संख्या ५ लाख ६५ हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषिपंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषिपंप बसविल्यानंतर त्यात काही चिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे.

शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाइन तक्रार करण्यासाठी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभघ्यावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्स कोसळून नुकसान झाले. अशा प्रकारच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सौर कृषिपंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे, अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील.

सौर कृषिपंप संचाचा विमा उत्तरविण्यात आला आहे. लाभार्थी शेतकऱ्यांना



महावितरणच्या टोल फ्री नंबरवरून किंवा महावितरणच्या संबंधित वेबसाइटवर ऑनलाइन नोंदणी करून किंवा थेट संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाइटवर नोंदणी करून तक्रार नोंदविता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषिपंपाचा लाभार्थी क्रमांक लिहिला तर पुरेसे आहे. शेतकरी आपला नोंदणीकृत मोबाइल क्रमांक लिहूनही तक्रार करू शकतात, आपला जिल्हा, तालुका, गाव व स्वतःचे नाव अशी माहिती देऊनही तक्रार करता येईल. शेतात सौर कृषिपंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसांत तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाइलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील. याबाबत महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी आदेश दिले आहेत.

**अशी करा तक्रार**

महावितरणच्या माध्यमातून बसविलेल्या सौर कृषिपंपांविषयी काही तक्रार असल्यास महावितरणचा टोल फ्री क्रमांकावर (१८००-२३३-३४३५ व १८००-२१२-३४३५) तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची वेबसाइट https://www.mahadiscom.in/solar MTSKPY आणि पुरवठादार कंपनीची वेबसाइट यावर थेट जाता येईल किंवा महावितरणच्या वेबसाइटवर एकत्रितपणे सर्व ४४ पुरवठादार कंपन्यांच्या लिंक उपलब्ध केल्या आहेत तेथे तक्रार करता येईल, असे महावितरणकडून सांगण्यात आले आहे.

# दहावीच्या गुणवंतांचा अभिनंदन सोहळा



**वर्धा/जनमाध्यम**

'मेहनतीचे फळ गोड असते.' याचा प्रत्यय चन्नावार्स ई विद्या मंदिर येथे दहावीच्या परीक्षेत उज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात आला.

यामध्ये श्रुती खुड़े, ईशा पुजारी, आयुषी वर्मा, निधी बोकड़े, प्रेरणा भोसले, अथर्व वांदिले, मुग्धा आंबटकर, मृदुल कलंत्री, सक्षम मुत्तेमवार, खुशी गडकर, गौरव बेद, रीषिका सराफ, फाल्गुनी साठे, मधुर मोहता, वंशिका साठोणे इत्यादी विद्यार्थ्यांना मेडल, प्रमाणपत्र व ट्रॉफी देवून गौरवण्यात आले. तसेच वर्ग चौथीचे विद्यार्थी विराट सिंग व स्वराली भांडेकर यांना ऑलिंपियाड या स्पर्धा परीक्षेमध्ये मिळालेल्या भरघोष यशाबद्दल मेडल, प्रमाण पत्र ट्रॉफी देण्यात आली. त्याच प्रमाणे वर्ग सातवीच्या विद्यार्थीनी कु. सान्वी पोकळे व अभिनीती पुंडेकर त्याच प्रमाणे वर्ग सहावीची विद्यार्थीनी जीविका हेमनानी या विद्यार्थीनींना देखील प्रमाणपत्र, मेडल, ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सुहास जाजू, आशिष झोडे, शाळेचे व्यवस्थापक दिनेश चन्नावार, चन्नावार तसेच शाळेच्या संचालिका व प्राचार्या अपूर्वा पांडे, उपप्राचार्या पूजा कपूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. दीपप्रज्वलानंतर वर्ग सातवीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर स्वागतगीत सादर केले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांपैकी श्रुती खुडे, मुग्धा आंबटकर व सक्षम मुत्तेमवार या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत प्रगट केले.

त्यांनी शाळेने केलेले परिश्रम, सायक्लीक टेस्ट, वर्कशीट यांचा आपल्या यशामध्ये असणारा वाटा नमूद केला. त्याचप्रमाणे दिनेश चन्नावार, प्राचार्या अपूर्वा पांडे यांचे मार्गदर्शन त्यांना कसे मोलाचे ठरले हेही सांगितले. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी शिक्षक, पालक व शाळेला दिले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेच्या शिक्षिका सची मिश्रा यांनी,'गुण मिळवणे हे यशाची एक पाऊल आहे, हे मिळवलेले यश शेवटपर्यंत' टिकवून ठेवणे हा संदेश विद्यार्थ्यांना दिला. शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुहास जाजू यांनी आपल्या भाषणात शिक्षणाबरोबरच संस्कार आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या प्राचार्या अपूर्वा पांडे यांनी गुणवंत विद्यार्थाचे अभिनंदन व कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक नवा अध्याय सुरू होण्यापूर्वीचा हा गौरवाचा क्षण सर्वांच्या मनात घर करून गेला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.संचालन व आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षिका संगिता पडोळे यांनी केले.

# समाजसेवकाने समाजाभिमुख कार्य करावे-मोहन मोहिते

## गोदावरी मोहिते शिक्षण संस्थेतर्फे इमरान राही सन्मानित

**वर्धा/जनमाध्यम**

जीवनात काही मिळवायचे असेल तर ध्येय निश्चित करणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी कठोर परिश्रम व वेळे प्रसंगी संघर्षाची तयारी अनिवार्य असते. ईश्वर संघर्ष करण्याची संधी त्यांनाच देतो ज्यांच्यामध्ये क्षमता असते इमरान राही यांचे संघर्षमय जीवन आपल्यासमोर उदाहरण आहे. त्याचप्रमाणे समाजसेवकांनी समाजाभिमुख कार्य करून आदर्श स्थापित करावे असे प्रतिपादन गोदावरी मोहिते शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन मोहिते यांनी व्यक्त केले.



ते बोरगाव (मेघे) येथे गोल्डन किड्स कॉन्व्हेंट शाळेतील स्पोर्ट कराटे असोसिएशन द्वारा संचालित कराटे प्रशिक्षण केंद्रात ज्येष्ठ समाजसेवी इमरान राही यांचा सन्मान करताना बोलत होते. ज्येष्ठ समाजसेवी इमरान राही हे अनेक क्रीडा, सामाजिक, साहित्यिक शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेची जोडलेले आहे. ते सामाजिक बांधिलकीच्या भावनेने विविध कर्तव्य पार पाडीत असतात. गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य शिबीर, नेत्रदान, देहदान यासाठी जागृती करणे. रक्तदान शिबिर, ग्रामीण क्षेत्रात व्यसनमुक्ती अभियान राबवणे, ग्राम जयंती उत्सवाच्या निमित्ताने सर्वधर्मसमभाव व बंधुत्वाची भावना वाढविणे, कुष्ठरोगी, अंध, अपंग, मूकबधिर बांधव तसेच वृद्धाश्रमात सामाजिक उपक्रम, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, अंध, अपंग, निराधारांना ब्लँकेट, धान्य व किराणा किट वाटप, उन्हाळ्याच्या वातावरणात पशुपक्षांसाठी पशु प्याऊ वाटप व्यक्तिमत्व विकास शिबिरे, कराटे खेळाचे शिबिर, वादविवाद स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, आदी यासारखी अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवितात.

याप्रसंगी माजी उपविभागीय अभियंता विजय नाखले, स्पोर्ट शोतोकान कराटे डो असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शिहान मंगेश भोंगाडे, समाजसेवी पुष्पा तपासे, अंकुश गिरडे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते इमरान राही यांना शॉल, श्रीफळ, सन्मानपत्र, ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. संचालन कल्याणी भोंगाडे तर आभार सेन्साई तेजस निवल यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता रुजान बाघमोरे, भार्गव खेवले, आयुष्यी कुरटकर, नेहा गोल्हार, मानसी गोमासे, कृतिका तपासे, अवंतिका तपासे, प्रतीक कन्नाके, समीर ठाकरे, हंसिका मंडलिक व आदींनी अथक परिश्रम घेतले.

# स्व.डॉ.रामदास आंबटकर यांच्या जन्मदिनानिमित्त वृक्षारोपण

**हिंगणघाट/जनमाध्यम**



स्व.डॉ.रामदास आंबटकर माजी आमदार विधान परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वाढदिवसानिमित्ताने शिवराई उद्यान येथे योग कक्षेच्या वतीने गणेश मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विशाल ब्राह्मणकर तर समाजसेवी तांबेकर , पौर्णिमा धात्रक योगशिक्षिका , माजी नगरसेविका छाया सातपुते, रवीला आखाडे, माजी नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी स्व. आंबटकर यांच्या जीवनातील बहुमूल्य सामाजिक कार्याचे योगदान यावर प्रकाश टाकून आदरांजली वाहिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन योगशिक्षिका शितल राऊत यांनी केले व नीता देरकर योग साधिका यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंच्या

# पॅनलवर समावेशासाठी रुग्णालयांकडून अर्ज आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

नागरिकांना दर्जेदार आणि परवडणा-या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांचा तसेच विशिष्ट एकल विशेषता असलेल्या १० खाटाच्या रुग्णालयांचा एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजना यांच्या पॅनलवर समावेश करण्यात येणार आहे. इच्छुक पात्र रुग्णालयांनी ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यामुळे आर्थिक दुर्बल घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळेल आणि जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यास मदत होईल. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना ही केंद्र सरकारची व महात्मा जोतीराव फुले जन आरोग्य योजना ही राज्य शासनाची योजना योजना असून योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया कमकुवत कुटूंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करण्यात येते. यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे.

**पॅनलवर समावेश प्रक्रियेसाठी पात्रता निकष-** ३० पेक्षा जास्त खाटा असलेले रुग्णालय किंवा नाक, कान घसा, नेत्र विकार, अस्थिव्यंग आणि पॉलिट्रॉमा, भाजणे, बालरोग शस्त्रक्रिया, कर्करोग उपचार युनिट्स, नवजात आणि बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन युनिट्स, हिमोडायलिसिस- मुत्रपिंडशास्त्र युनिट्च अशा एकल विशेषता असलेल्या १० खाटांची रुग्णालये जी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण आणि महाराष्ट राज्य आरोग्य हमी सोसायटी निकषांची पुर्तता करतील ती आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतीराव फुल जन आरोग्य योजनांच्या पॅनलवर समावेशासाठी पात्र ठरतील. यामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी आणि उच्च दर्जाची रुग्णसेवा यांचा समावेश आहे.

पॅनलवरील रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजनांतर्गत लाभार्थ्यांना मोफत उपचार मिळतील यामुळे गंभीर आजारांवरील उपचार परवडणारे होतील. आणि रुग्णांचे आर्थिक भार कमी होईल. पॅनलवर समावेशासाठी रुग्णालयांनी https://www.jeevandayee.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा येथील ०७१५२-२४५४४९ या दुरध्वनी क्रमांकावर किंवा जिल्हा समन्वयक किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या संपर्क साधावा, असे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

# 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेने'च्या चिन्हाचे अनावरण

**नागपूर/जनमाध्यम**

शिवसेना प्रणित 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेना' या वीज क्षेत्रातील नव्याने स्थापन झालेल्या कामगार संघटनेच्या अधिकृत चिन्हाचे अनावरण आज राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. नागपूर येथे आयोजित मेळाव्यात हा अनावरणाचा सोहळा पार पडला, ज्यामुळे संघटनेच्या कार्याला आणि भविष्यातील वाटचालीस अधिकृतपणे सुरुवात झाली आहे.

या प्रसंगी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. यामध्ये राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाठ, राज्यमंत्री ना. आशिष जैस्वाल, तसेच संघटनेचे मार्गदर्शक आमदार कृपाल तुमाने आणि आमदार मनीषा कायंदे यांचा समावेश होता. शिवसेनेचे



ज्येष्ठ नेते किरण पांडव यांचीही विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेने'चे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष योगेश विटनकर, कार्याध्यक्ष मनोज मेश्राम आणि प्रवीण पाठराबे, तसेच महासचिव डॉ. अविनाश आचार्य यांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. त्यांच्यासोबत दिलीप आवळे, जीवन डहाट, आशिष इंगळे, श्रीरंग दहासहस्त्र यांच्यासह संघटनेचे अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

अनावरणामुळे 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेना' आता अधिकृतपणे वीज कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्य करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालेल्या या अनावरणामुळे संघटनेला भविष्यात वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना न्याय देण्यासाठी अधिक बळ मिळेल अशी अपेक्षा आहे.

## संक्षिप्त

### किनकर शिक्षण महाविद्यालयाची यशस्वी भरारी



**सेलू/ जनमाध्यम**

शैक्षणिक सत्र २०२४-२५ चा बीएड चतुर्थ सत्र उन्हाळी परीक्षेचा निकाल घोषित झाला आहे.दरवर्षीप्रमाणे किनकर शिक्षण महाविद्यालय सेलू. जिल्हा वर्धा येथील महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयाचा ७३.८० टक्के निकाल लागला आहे .

यामध्ये देवयानी व्यास हिने ७१ टक्के गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक अमित लालवानी याने ६९. टक्के गुण घेऊन मिळविला आहे तर तृतीय क्रमांक आचल दरने व पल्लवी देशमुख हिने ६९.६०गुण प्राप्त करुन मिळविला आहे. एकूण १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष किशोर किनकर तसेच किनकर, प्राचार्य वैशाली ठाकरे , सुप्रिया शेलारे,सुचित्रा भुसारी,अपर्णा भांदककर व महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक वृंदांना दिले.

### महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये आढळला मृतदेह

**वर्धा-**महाराष्ट्र एक्स्प्रेसमध्ये एका ५० वर्ष वयोगटातील व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. ही घटना ३० रोजी घडली. पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी वर्धा लोहमार्ग पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून वृत्तलिहिस्तोवर मृताची ओळख पटविणे सुरू होते.

### स्वच्छता कर्मचा-यास कारची धडक

**वर्धा-**जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वच्छता कर्मचारी म्हणून सेवा देणा-या मनोज बिलवान यांच्या दुचाकीला कारने धडक दिली. यात ते जखमी झाले. हा अपघात बजाज चौक येथे घडली असून संबंधित प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोज हे एम. एच. ३२ ए. वाय. ५८९५ क्रमांकाच्या दुचाकीने जिल्हा सामान्य रुग्णालयात कर्तव्यावर जात होते. त्यांची दुचाकी बजाज चौक परिसरात आली असता मागाहून आलेल्या एम. एच. ३२ वाय. ४००२ क्रमांकाच्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात मनोज गंभीर जखमी झाले. या प्रकरणी मनोज यांची पत्नीने वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### गांजा ओढणाऱ्यास बेड्या

**समुद्रपूर-**स्थानिक पोलिसांनी डायमंड गॅलक्सी कॉम्पलेक्स समुद्रपूर येथे धडक कारवाई करून गांजा ओढणा-याच्या मुसक्या आवळल्या. ही कारवाई करण्यात आली. अनुराग राजेंद्र पुसनाके (वय २२) रा. चोखोबा वॉर्ड हिंगणघाट असे आरोपीचे नाव आहे.

### क्षुल्लक कारणावरून मारहाण

**वडनेर-**क्षुल्लक कारणावरून मारहाण करून एकास जखमी करण्यात आले. ही घटना वडनेर पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणा-या फुकटा येथील बसस्थानक येथे घडली. प्रशांत सुखदेव (वय ३२) रा. फुकटा असे जखमीचे तर आकाश बावणे रा. फुकटा असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### विषप्राशून इसमाची आत्महत्या

**अल्लीपूर-**घराच्या आवारात असलेल्या बाथरुममध्ये किटकनाशक प्राशन करून एका ४४ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली. ही घटना अल्लीपूर पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येणा-या कानगाव येथे घडली. सतीश यादवराव वैद्य रा. कानगाव असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

### न्यायालयाजवळून दुचाकी चोरणारा अटकेत

**वर्धा-**जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रवेशद्वाराजवळ उभी करून ठेवलेली ५५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेणाऱ्या चोरट्याला शहर पोलिसांनी अटक केली. दिपक किसनराव होलगरे (५१) रा. निसर्ग नगरी, धुनिवाले मठ, वर्धा हे कामानिमित्त त्याची एमएच ३२ एए ००८३ क्रमांकाची ५५ हजार रुपये किमतीची दुचाकी घेऊन जिल्हा व सत्र न्यायालय येथे गेले होते. दुचाकी न्यायालयाच्या गेटजवळ उभी ठेवून कामानिमित्त न्यायालयात गेले. परत आले तेव्हा त्यांना त्यांची दुचाकी दिसून आली नाही. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली, अशी तक्रार शहर पोलिसांकडे नोंदविली. त्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास वर्धा शहर पोलीस ठाण्यामधील गुन्हे शोध पथकाने सुरू केला. गुप्त बातमीदार नेमून बातमीदारसकडून मिळालेल्या माहीतीवरून आरोपी विजय काशीराम चिचाम (३८) रा. वॉर्ड नं. ४, शांतीनगर, सिंदी (मेघे), वर्धा यास अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेली एमएच ३२ एए ००८३ क्रमांकाची ५५ हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली. ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर तसेच वर्धा शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार पराग पोटे, पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड यांच्या निर्देशनाप्रमाणे गुन्हे प्रगटीकरण पथकाचे जमादार विजय पंचटिके, महेंद्र पाटील, शैलेश चाफलेकर, पवन लव्हाळे, शिवदास डोईफोडे, नंदकिशोर धुर्वे यांनी केली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २१७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे डॉक्टर डे उत्साहाने



**मोर्शी/ प्रतिनिधी:-** उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टर डे दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. दि.१ जुलै हा दिवस डॉक्टर डे म्हणून देशभरात साजरा केला जातो.या दिनाचे औचित्य साधून स्थानिक उपजिल्हा रुग्णालय येथे डॉ.प्रदीप कुऱ्हाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.दरम्यान त्यांच्या हस्ते केक कापून डॉक्टर डे दिनाचे महत्त्व त्यांनी विशद केले.या कार्यक्रमाला उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन कोरडे,जयदेवा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष तथा रक्तदाता संघाचे कार्याध्यक्ष मिलिंद ढोले, पत्रकार अजय पाटील, गजानन हिरुळकर यासह उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ.अश्विनी वंजारी,जयश्री मोरे,सुजित वानखडे, आशिष नेरकर,मिनाक्षी वगारे, रेशमा बहुरूपी,भागश्री नागले, अकिंत नेवारे,स्वाती पाटील,ज्ञानेश्वर टाकले,सागर झटाले, प्रवीण कापडे,आकाश जवंजाळ,शोभा इंगळे,शिला राऊत,आचल तायवाडे,नौशाद शहा, वशीम शेख यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## पाहिजेत

**इकरा सोशल वेल्फेअर सोसायटी,अचलपूर जि. अमरावती**

**द्वारा संचालित**

**जानी शैदा उर्दू हायस्कूल शिराळा,ता. जि. अमरावती**

**(धार्मिक/ भाषिक अल्पसंख्या शाळा)**

येथे खालील पदावर नियुक्ती करवायाची आहे

| अनु क्र | पद | माध्यम | शैक्षणिक पात्रता. | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण सेवक | उर्दू | BSC (Maths) B.Ed | ०१ |
| २. | शिक्षण सेवक | उर्दू | B.A/M.A (English) B.Ed | ०१ |

वरील प्रमाणे १०० % अनुदानित पद भरविण्याची आहे. तरी इच्छुक उमेदवाराने स्वखर्चाने आणि शैक्षणिक अर्हता प्रमाणे सर्व कागदपत्र व अर्ज रविवार दि. १३/०७/२०२५ (वेळ ११.०० ते २.००) ला जानी शैदा उर्दू हायस्कूल शिराळा येथे हजर रहावे.

**मुख्याध्यापक /सचिव**
**जानी शैदा उर्दू हायस्कूल शिराळा**
**मो. ९८९००५८९५४**

**अध्यक्ष**
**इकरा सोशल वेल्फेअर सोसायटी**
**अचलपूर,अमरावती**
**मो : ९८९००६२५०४**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३४७/२०२५ ने.ता.१४.०८.२०२५

**अर्जदार :** १) **श्रीमती अरुणाताई सुभाष देशमुख,** वय ७७ वर्षे, धंदा - निरंक बेलोरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२) **सौ.सुप्रिया किशोर मारसटटीवार,** वय ५५ वर्षे, धंदा - घरकाम फ्लॅट नं.३०४, रचना झील अपार्टमेट, अंबाझरी टी-पाईट,सुभाष नगर, रत्नप्रताप नगर, नागपूर, ता.व जि.नागपूर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मय्यत सुभाष सदाशिवराव देशमुख** यांचा मृत्यू दि.१७.०१.२००४ रोजी वडोदरा, ता.व.जि.बडोदरा, (गुजरात) यांचा कायमचा पत्ता रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथील आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारा व्यक्तीरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस असल्याने त्यांना कार्यालयीन कामाकरिता वारसाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. **त्याकरिता विद्यमान दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं.३४७/२०२५ नुसार अर्ज दाखल केला आहे.**

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०१.०७.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११४७/२०२५**
**उमाबाई व इतर वि.अमित**
**पुढील तारीख ०८.०८.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-** १. **उमाबाई राधेश्याम भिंदा,** वय ७० वर्षे, धंदा - घरकाम
२. **गोविंदा राधेश्याम भिंदा,** वय ३५ वर्षे, धंदा - व्यवसाय
दोघेही रा.यवतमाळ रोड शिवाजी नगर नवी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती
३. **राधा संजय शर्मा,**वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.नॉर्थ अंबाझरी रोड, न्यू कॉर्पोरेशन कॉलनी, गांधी नगर शंकर नगर, नागपूर, महाराष्ट्र
४. **संजना संतोषकुमार शर्मा,** वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा. गांधी नगर, हनुमान मंदिरा जवळ, नागपूर, महाराष्ट्र
५. **राणी पवन चौमवाल,** वय ३४ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जसमित अपार्टमेट, दारव्हा रोड, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राधेशामजी रामरीछप्पल भिंदा** हे **दि.०४/०२/२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार उमाबाई राधेश्याम भिंदा व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उमाबाई राधेश्याम भिंदा व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## जाहीर सुचना

आम जनतेस व वित्तीय संस्थेस या जाहीर सुचनेव्दारा सूचित करण्यात येते की, **प्रल्हाद नामदेवराव धवणे व सविता प्रल्हाद धवणे, रा.वाघोडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** यांनी **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड शाखा अमरावती** येथे खालील वर्णनाची मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. त्या मालमत्तेचे वर्णन मौजा-वाघोडा, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती येथील वार्ड क्र.१ मधील मालमत्ता क्र.२१३, क्षेत्रफळ ७८० चौ.फुट (७२.४९चौ.मी.) यावर असलेल्या बांधकामासह तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसबंध, गहाण, बोजा, वारसहक्क, जप्ती, कर्ज, ताबा,सरकारी, निमसरकारी वा वित्तीय संस्थेचे कर्ज किंवा कुठल्याही प्रकारचा अधिकार,हक्क असल्यास ही नोटिस प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह खालील पत्यावर संपर्क साधून आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही असे समजून **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड शाखा अमरावती** हे वरील मालमत्ता गहाण ठेऊन **प्रल्हाद** नामदेवराव धवणे व सविता प्रल्हाद धवणे, रा.वाघोडा, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती यांना कर्जाची रक्कम वितरित करतील वरील मुदतीनंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक ०१/०७/२०२५**
**अमरावती.**

**स्वाक्षरी/-**
(**पंकज एन.ठाकरे, अधिवक्ता** )

**कार्यालय - फ्लॅट क्रमांक १०१, धनलक्ष्मी रेसिडेन्सी, खंडेलवाल नगर, साईनगर, अमरावती, मो.क्र.-९६६५७८६६७६**

---

## (Jt. C.J.J.D.) मा. दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१३६/२०२५** **ने.ता.१७.०७.२०२५**

**बबीता --वि--शिला**

**अर्जदार :** १. **बबीता अशोक लोहकरे**
२. **अभय गजानन बारसे**
३. **अक्षय गजानन बारसे** - अ.क्र.१ ते ०३ रा.येणस ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि //**

१. **शिला अशोक लोहकरे व इतर** - रा.वलनी खरडा, ता.कळंब, जि.यवतमाळ
२. **वंदना जितेंद्र बसवनाथे** रा.शेलु नटवा, ता.ना.खंडे. जि.अमरावती
३. **मीरा मधुकर धवणे** रा.निंबा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. **श्रीमती पंचफुला सोपान बारसे** रा.येणस, ता.नां.खंडे. जि.अमरावती

ज्याअर्थी **मयत सोपान नारायण बारसे यांचा मृत्यू दि.०७.०२.२०२३ रोजी येणस, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला आहे. **अर्जदार आणि गैरअर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३० जून २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २९७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

**Dayaram Patel Smark Trust Dharni, Dist. Amravati**

**Shri. Vasantrao Naik Mahavidyalaya, Dharni Dist. Amravati**

(Art, Commerce and Science)

**(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)**

Email: svnm129@sgbau.ac.in Visit us at: svnmdharni.org

**(Accredited by NAAC with B Grade CGPA-2.44)**

## Walk in interview

Applications are invited for appointments of candidates for teaching in the Senior college on contributory (CHB) basis as under:-

**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**

(As Per Regulation No. 2/2020, and its para-11,G.R. Dated 17/10/2022)

| Sr. No. | Subject | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 1 | Commerce | 01 |
| 2 | Chemistry | 02 |
| 3 | Physics | 02 |
| 4 | Botany | 06 |
| 5 | Zoology | 04 |

**Eligibility -** Academic qualifications shall be as per U. G. C. Regulation 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No.संकीर्ण 2018/(185/18)/मशी-३, dt.14-11-2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G. R.

Interested and qualified candidates should directely appear for the interview along with application on plain paper and testimonials on 08/07/2025 at 02.00 p.m. in Principal's office of Shri Vasantrao Naik Mahavidyalaya, Dharni (Kusumkot Bk.) Dist. Amravati

**Sau. Veenatai R. Malviya**
**(President)**
**Mob - 9403723455**

**Dr. V.M. Gawai,**
**(Principal)**
**Mob. 9421818949**

---

**कार्यालय**

## अचलपूर नगर परिषद, अचलपूर, जिल्हा अमरावती

**जाहीर सूचना**

अचलपूर नगर परिषद हद्दीतील सर्व घरमालक, भोगवटदार, भाडेकरू यांना कळविण्यात येते की, येत्या काळात अवकाळी पाऊस, मान्सुनचा पाऊस व वादळ वाऱ्यामुळे जुन्या व धोकादायक शिकस्त झालेल्या ईमारती पडण्याची शक्यता असते. त्यामुळे जुन्या व धोकादायक ईमारतीचे मालक भोगवटदार, भाडेकरू यांना अचलपूर नगर परिषदेच्यावतीने महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ चे कलम १९५ व २९९ अन्वये जाहिरपणे कळविण्यात येते की, अशा शिकस्त धोकादायक व मोडकळीस आलेल्या ईमारती तसेच शिकस्त भाग स्वत:हून काढून घ्यावेत. तसेच यापुर्वी आपणास नोटिस बजावलेली/मिळालेली नसल्यास सदर जाहीर नोटिस शासकीय नोटिस गृहीत धरून उक्त नमुद कार्यवाही करावी. या नोटिसद्वारे सर्व धोकादायक ईमारती मालक, भोगवटदार, भाडेकरू यांना धोकादायक भाग त्वरित उतरवून न घेतल्यास ईमारत पडल्यामुळे होणाऱ्या जीवीत व वित्तहानीस घरमालक, भोगवटदार, भाडेकरू जवाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

तसेच अचलपूर शहरात नदी/नाल्याकाठी अनधिकृतपणे राहणाऱ्या नागरीकांना सुचित करण्यात येते की, लवकरच पावसाळा ऋतू सुरू होणार असून पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे किंवा संततधार पावसामुळे नदी व नाल्यास पुर येण्याचा संभव आहे. करीता पावसाळ्यापुर्वी नदी काठावरील व नाल्याच्या काठावरील अनधिकृत झोपड्या / घरे स्वखर्चाने इतरत्र हलविण्याची व्यवस्था करून जीवीत अगर वित्तीय हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यात अतिवृष्टिमुळे पुर येऊन अनधिकृत झोपड्या / घरे व त्यात राहणारे नागरिक यांचे आर्थिक नुकसान व जीवीत हानी झाल्यास याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**स्वा / -**
**धीरजकुमार गोहाड**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ८२७/२०२५**
**मिहिर व इतर वि.अमित**
**पुढील तारीख १३.०८.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-** १. **मिहिर संजय मालवे,** वय ३३ वर्षे, धंदा - नोकरी
२. **कु.पर्वा संजय मालवे,** वय २५ वर्षे, धंदा - विदयार्थी
सर्व रा.शोभा नगर, विमवि कॉलेजच्या मागे, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत निवेदिता संजय मापले** हे **दि.१३/०८/२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार मिहिर संजय मालवे व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिहिर संजय मालवे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २७.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.टी.सहारे २५ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -११४५/२०२५**
**श्री.किशोर अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ११.०७.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1) **Kishor Babaraoji Barde**, Age 48 yrs., Occu.- Business R/o. Near Hanuman Mandir, Laxmi Nagar, Amravati
2) **Vidya Purushottamrao Nimbhorkar**, Age 56 yrs., Occu.- Household R/o. Belora Khurd, Post Jalgaon, Tq. Ashti, Dist. Wardha
3) **Sandhya Dinkarrao Sabale**, Age 53 yrs., Occu.- Household R/o Near Navnath Temple, Konark Colony, Kathora Road, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत लिलाबाई बाबारावजी बरडे** हया **दि.०४.०३.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार किशोर अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **किशोर अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २३.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## (Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१६३/२०२५** **ने.ता.०४.०८.२०२५**

**सुभाष --वि--निरंक**

**अर्जदार :** १. **सुभाष जनार्दन लोमटे**
२. **उत्तम जनार्दन लोमटे**
३. **शिवदास जनार्दन लोमटे**
४. **सुशीला वामनराव नागोलकर** अ.क्र.१ ते ०४ वार्ड नं.०५ नांदगाव खंडेश्वर ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
५. **आशा रामदास मुके** रा.एराड, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **मयत पांडूरंग गणपत लोमटे यांचा मृत्यू दि.१९.०४.२०१९ रोजी मुंडनिशांकराव , ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला आहे. **अर्जदार हेच मयत यांचे** कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि. २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **३० जून २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११४६/२०२५**
**किशोर व इतर वि.अमित**
**पुढील तारीख ०८.०८.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :-** १. **किशोर बाबारावजी बरडे,** वय ४८ वर्षे, धंदा - व्यवसाय
२. **नंदिनी किशोर बरडे,** वय २१ वर्षे, धंदा - विदयार्थी
रा.हनुमान मंदिरा जवळ, लक्ष्मी नगर, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत संगिता किशोर बरडे** हे **दि.१३/०१/२००९** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार किशोर बाबारावजी बरडे व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार किशोर बाबारावजी बरडे व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.एस.एस.बिंगरदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११४४/२०२५**
**श्री.शितल अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ३०.०७.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1) **Shital Shashikant Hote**, Age 62 yrs., Occu.- Household R/o. Plot No. 9, Badnera Road, Near Gosavai Colony, Ganesh Nagar, Amravati
2) **Pratiksha Shrikant Bobade**, Age 33 yrs., Occu.- Household R/o. Amravati Road, Near Datta Mandir, Bombay Intelligence Security India, Limited Civil Lines Nagpur
3) **Sau. Madhuri Pravin Nagpurkar**, Age 36 yrs., Occu.- Household R/o Ward No. 2, Mahada, Dist. Yavatmal

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत शशिकांत वसंतराव होटे** हे **दि.०१.०१.२०१९** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शितल अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शितल अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २१.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ९९८/२०२५**
**बानु चव्हाण +१ वि.निरंक**
**पुढील तारीख ०२.०७.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1) **Smt. Banu Mahadev Chavhan**, Age 77 yrs., Occu.- Household
2) **Kailas Mahadevrao Chavhan**, Age 45 yrs., Occu.- Agriculturist
Both R/o.at Rohankheda, Post-Devra, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** Nil

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Mahadev Yashwant Chavhan** हे **दि.०३.०९.१९८६** रोजी रोहनखेडा,ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार श्रीमती बानु महादेव चव्हाण+१** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार श्रीमती बानु महादेव चव्हाण+१** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## विद्यमान श्रीमती एस.ए.देशमुख,११ वे सहदिवाणी न्यायाधिश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**आर.सी.एस.नं.१५९/ /२०२५** **ने.ता.३०.०७.२०२५**

**अर्जदार :** **निनाद चंद्रकांत देशपांडे**
**रा.साई मंदिर जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** **महाराष्ट्र शासन, तर्फे**
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी,कार्यालय, कॅम्प, अमरावती**

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात कायदेशिर मृत्यू घोषित करण्यासाठी दिवाणी दावा अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार यांचे काका नामे **श्रीकांत वसंतराव देशपांडे** हे दि. २६/११/२०२४ पासून अज्ञात आहेत. अर्जदाराने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांनरा पाहण्यासाठी शक्य ते प्रयत्न केलेले आहे. पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती यांचे तर्फे तपास केला असता श्रीकांत वसंतराव देशपांडे हे कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे अर्जदारांने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांना कायदेशिर मृत घोषित करण्यासाठी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल

आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**२० वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ७६३/२०२५**
**श्रीमती सविता केणे व चार वि.निरंक**
**पुढील तारीख २१.०६.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1) **Savita Gunvantrao Kene**, Age 65 yrs., Occu.- Household R/o. Jijau Nagar, Ganorkar Layout, Camp, Amravati, Tq. & Dist. Amravati
2) **Vijay Gunvant Kene**, Age 48 yrs., Occu.- Service R/o. Police Station, Tumsar, Tq. & Dist. Tumsar
3) **Satish Gunvantrao Kene**, Age 43 yrs., Occu.- Service R/o Near Taj Tyres, Rajura Naka, Mardi Road, Amravati
4) **Yogita Keshaorao Netankar**, Age 46 yrs., Occu.- Household R/o. Old Bypass, Samra Nagar No.1, Amravati, Tq. & Dist. Amravati
5) **Kalpana Vinod Levharkar**, Age 44 yrs., Occu.- Household R/o. Rekha Colony, V.M.V. Amravati, Tq. & Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Gunwant Vithobaji Kene** हे **दि.१४.१०.२०२२** रोजी राजुरा नाका, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार श्रीमती सविता गुणवंतराव केणे व चार** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती सविता गुणवंतरवा केणे व चार** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०८.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**विद्यमान दुसरे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -८४१/२०२५**
**राजकुंवर इंदरचंद जैन व ईतर-वि-निरंक**
**पुढील तारीख ०३.०७.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1) **Rajkuwar Indarchand Jain**, Age 77 yrs., Occu.- Housewife
2) **Praful Indarchand Jain**, Age 55 yrs., Occu.- Business
3) **Ajay Indarchand Jain**, Age 51 yrs., Occu.- Business
All 1 to 3 R/o Shivraj Apartment, Behind Rangoli Hotel, Kharparde Garden, Amravati, Tq. & Dist. Amravati
4) **Sunita Narendra Jain**, Age 58 yrs., Occu.- Housewife R/o Ward No. 14, Sarafa Bazar, Main Road, Lonar, Dist. Buldhana
5) **Anita Praful Singi**, Age 54 yrs., Occu.- Housewife R/o 120, Dhamangaon Road, Gandhi Nagar, Yavatmal, Tq. & Dist. Yavatmal
6) **Rekha Praful Khiwansara**, Age 49 yrs., Occu.- Housewife R/o Nagpur Road, Behind Jagganath Mandir, Dhume Nagar, Ward No.5, Wani, Dist. Yavatmal
7) **Sushma Vijay Runwal**, Age 53 yrs., Occu.- Housewife R/o Bhatiya Layout, Gopal Nagar, Khamgaon, Dist. Buldhana

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** **Nil**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत Indarchand Pannalalji Jain** यांचे दि.२६.१०.२०१७ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार नं.१ Rajkuwar Indarchand Jain** व इतर यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **Application for grant of Legal Heir Certificate under clause 2 of Bombay Regulations VIII of 1827** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार नं.१ Rajkuwar Indarchand Jain** व इतर वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०२.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## संक्षिप्त



### वारकऱ्यांची चरण सेवा व आरोग्यसेवा

**अमरावती-**पंढरपूर वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांची चरण सेवा आणि आरोग्यसेवा नुकतीच श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रार्थना मंदिर, दस्तूर नगर, अमरावती येथे मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती आणि श्री सत्यसाई सेवा संघटना, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली. या उपक्रमात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार व आवश्यक औषधांची सेवा श्री सत्यसाई सेवा संघटना यांच्यामार्फत प्रदान करण्यात आली. सेवा दलातील स्वयंसेवकांनी समर्पणभावनेने वारकऱ्यांची सेवा केली. या प्रसंगी उपस्थित सर्व वारकऱ्यांना मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या कार्यपद्धती, उपचारासाठी मिळणारी आर्थिक मदत व अर्ज प्रक्रियेबाबत माहिती देण्यात आली. वारकऱ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले, अशी माहिती, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष अमरावतीचे अध्यक्ष डॉ.श्याम गावंडे यांनी दिली.



### अक्षर मानव राज्य कार्यकारिणीची बैठक

**अमरावती-**महाराष्ट्र अक्षर मानव राज्य कार्यकारिणीची बैठक महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध मराठी लेखक, कथा, कादंबरीकार अक्षर मानवचे विश्वस्त राजन खान यांच्या उपस्थितीत कमल शांती पॅलेस, घाट रोड, चाळीसगाव (जिल्हा जळगाव) येथे मुख्य पदाधिकारींच्या उपस्थित दोन दिवस बैठक उत्साहात संपन्न झाली.जगण्याचे सर्व प्रश्न प्रामाणिकपणे सोडवण्यासाठी संघटित व्हावं लागेल तेव्हाच शासन, प्रशासन, कायदा सुव्यवस्था आणि राजकारण दुरुस्त होईल. असे मार्गदर्शन प्रसिद्ध लेखक, कथा कादंबरीकार राजन खान यांनी उपस्थित मुख्य पदाधिकारींना मार्गदर्शन केले.या अक्षर मानवच्या या त्रैमासिक राज्य आढावा बैठकीसाठी ख्यातनाम लेखक राजन खान, यमुना नाखले, आझाद खान, अरुण मापारी, संजिवनी राजगुरू, तुषार अहिरे, नीलिमा शिकारखाने, संगिता फुके, गिरीश फुके, राजेंद्र माने, चित्रसेन पाटील, भूषण विसावे, प्रशांत सोनवणे, दीपक निकम, राज्य अक्षर मानवचे मुख्य कार्यकारिणीचे पदाधिकारी, पालकमंत्री, विभाग अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष आदी पदाधिकारी महाराष्ट्रभरातून उपस्थित होते.



### केंद्रस्तरीय शिक्षण परिषद

**कुऱ्हा-**कुऱ्हा केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन विद्यानिकेतन हायस्कूल कुऱ्हा येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती कन्नाके, प्राचार्य विद्यानिकेतन हायस्कूल तर प्रमुख अतिथी कुऱ्हा केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र तायडे देवेन्द्र फड मुख्याध्यापक जि.प.शाळा कुऱ्हा, अब्दुल नईम, मुख्याध्यापक जि.प शाळा कुऱ्हा उर्दू मान्यवर मंचावर उपस्थित होते. केंद्रप्रमुख तायडे यांनी नवीन कार्यान्वित समितींचे गठण, निपुण भारत अंतर्गत अध्ययन स्तर निश्चिती, vinobha app , nipun Bharat app ची सविस्तर माहिती दिली. श्रीकांत शिंगणजुडे यांनी SQAAF बद्द प्रशांत गवळी यांनी PAT बद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भक्ते तर आभार प्रदर्शन नंदकिशोर कळसकर यांनी केले.

### शनिवारी मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीची बैठक

**अमरावती-**मराठा सेवा संघ केंद्रीय कार्यकारिणीची (विदर्भ विभाग) ची बैठक ५ जुलै २०२५ शनिवार रोजी सायं.६ वाजता स्मृतीशेष सचिन चौधरी सभागृह जिजाऊ प्रतिष्ठान,मराठा नगरी , रहाटगांव नागपूर रोड अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे.निवड समिती प्रमुख शिवश्री अरविंद गावंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडणार आहे. मराठा सेवा संघ व ३३ कक्षा मध्ये जिल्हा कार्यकारिणी, विभागीय कार्यकारणी तसेच राज्य कार्यकारणीवर काम करण्यास इच्छुकांनी आपले अर्ज निवड समितीकडे सादर करावेत.या पूर्वी मे महिन्यात अर्ज दिलेल्या बांधवांनी सुद्धा नवीन विहित नमुन्यात अर्ज भरून द्यायचे आहेत. या निवड समिती मध्ये सदस्य म्हणून शिवमती सीमा बोके,दिगंबर जगताप,अशोक महाले, सुनिता जिचकार, व्हि.टी.शिंदे, ज्योती कोथाळकर, शिवाजी डोकर पाटील, वसंतराव देशमुख हे काम पाहतील.सदरील निवड समितीच्या बैठकीस अमरावती जिल्ह्यातील सर्व कक्षाचे आजी-माजी पदाधिकारी व आपापल्या इच्छेनुसार मराठा सेवा संघाच्या ३३ कक्षामध्ये काम करण्यासाठी इच्छुक असलेले तरुण मंडळी, महिला भगिनी व समाज बांधव यांनी वेळेवर उपस्थित रहावे.असे आवाहन मराठा सेवा संघ अमरावती जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे यांनी केले आहे. तसेच फॉर्म बैठकीच्या ठिकाणीच देण्यात येतील व तिथेच भरुन घेण्यात येईल.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयाची

# संशोधन व पेटंट क्षेत्रात महाविद्यालयाची गरुडझेप

**अमरावती/का.प्र.**

पी. आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावतीने संशोधन, नवकल्पना आणि बौद्धिक संपदा क्षेत्रात सत्र २०२४- २५ मध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे.

महाविद्यालयाचे प्राध्यापक स्कोपस (Scopus), एल्सवेर (Elsevier) आणि सायन्स डायरेक्ट (Science Direct) मध्ये सूचीबद्ध (Indexed) ८६ हून अधिक आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्यात यशस्वी झाले आहेत. त्याचप्रमाणे, आयइइइ (IEEE), स्प्रिंजर (Springer) आणि स्कोपस सूचीबद्ध (Scopus Indexed) परिषदांमध्ये ५९ हून अधिक शोधनिबंध सादर करण्यात आले आहेत. यासोबतच ४७ प्राध्यापकांनी ७९ हून अधिक पुस्तके (Book) व पुस्तक अध्याय (Book Chapter) लिहिले असून, ज्ञान प्रसारात मोठे योगदान दिले




आहे. नुकताच महाविद्यालयाने २१ पेटंट यशस्वीपणे प्रकाशित केले असून ४ पेटंट प्रक्रिया मध्ये आहेत, तसेच २० कॉपीराईट्स पूर्णत्वास गेले असून ७८ प्रक्रियेत आहेत, ज्यातून महाविद्यालयाला संशोधन आणि सर्जनशीलतेला चालना मिळाली आहे. संस्थेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञानामधील शाश्वत भविष्यासाठी पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषद घ्ङिएइ-२०२५ चे आयोजन. या परिषदेसाठी यूएसए, इंडोनेशिया, इजिप्त, मोरोक्को, बांगलादेश, चीन, मलेशिया आणि भारतासह ५५० हून अधिक संशोधन निबंध प्राप्त झाले. या अद्वितीय प्रतिसादाने पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती चे आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन क्षेत्रातील स्थान बळकट झाले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे संचालक डॉ. पी. एम. खोडके, पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जवंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली महाविद्यालयाने संशोधन व पेटंट क्षेत्रात गरुड झेप घेतल्याचे डॉ.विवेक कुटे, डीन रिसर्च अँड डेव्हलपमेंट यांनी प्रतिपादन केले तसेच या यशात योगदान देणाऱ्या सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि व्यवस्थापनाचे त्यांनी आभार मानले व भविष्यातील संशोधनातील वाटचालीसाठी प्रेरणा व्यक्त केली.

# मशीन चोरीप्रकरणी दोन आरोपी जेरबंद

**अमरावती-**रेल्वे स्टेशन परिसरातून बांधकामासाठी वापरण्यात येणारी महत्त्वाची यंत्रसामग्री चोरी गेल्याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी मोठी कामगिरी करत दोन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून अंदाजे चार लाख रुपयांचा मुद्देमाल एक लिफ्ट मशीन व लोडिंग वाहन जप्त केले आहे. ही चोरी एका ठेकेदाराच्या मशीनची असून, तपासात आरोपींचा गुन्हा उघड झाला आहे. प्रकाश चंपतराव तायडे (वय ५६, रा. रेल्वे स्टेशन, शिवाजी चौक, गोवर्धन चाळ, अमरावती) हे ठेकेदार असून, बांधकामासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीमध्ये त्यांच्याकडे दोन लिफ्ट मशीन, दोन मिक्सर मशीन आणि एक २०७ वाहन आहे. दि. २८ जून रोजी सायंकाळी त्यांनी एक लिफ्ट मशीन व एक मिक्सर मशीन रेल्वे स्टेशनच्या भिंतीलगत ठेवली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ५ वाजता गेले असता, एक लिफ्ट मशीन (१ लाख रुपये



किंमत) चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असताना गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सुरज शिवकुमार तिवारी (वय ३६, रा. गांधीनगर, चिंचफेल, मरीमाता मंदिराजवळ) आणि प्रविण ऊर्फ सोनू बच्छराज चव्हाण (वय ३६, रा. बेलपुरा, अमरावती) यांना ताब्यात घेतले.

# मनपा आयुक्तांकडून अग्निशमन विभागाची पाहणी



**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सोमवार दिनांक ३० जुन,२०२५ रोजी अग्निशमन विभागाची पाहणी केली. या पाहणी दरम्यान उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी लक्ष्मण पावडे, प्रभारी अग्निशमन अधिक्षक संतोष केंद्रे, अग्निशमन दल, मनपा कर्मचारी उपस्थित होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी अग्निशमन विभागाची पाहणी करतांना निर्देश दिले की, सीसीटीव्ही लावण?यात यावे. अग्निशमन विभाग हे अद्यावत असणे आवश्यक असून संपुर्ण विभाग संगणीकरण करण्याचे काम करावे. अग्निशमन विभागाने सर्व अत्यावश्यक सेवेसह सज्ज असणे गरजेचे आहे. अग्निशमन विभागाने आलेल्या सर्व कॉलचा डाटा तयार करावा. अग्निशमन विभागाचे फलक तयार करुन विभागाचा मुख्य ठिकाणी लावावे. अग्निशमन विभागाने समन्वयाने काम करुन आपली जबाबदारी पुर्ण करावी. सदर विभागाचे व परिसराचे नियोजन व्यवस्थित करावे.सदर अग्निशमन केंद्रासाठी आवश्यक अग्निशमन कर्मचारी, अग्निशमन वाहने, उपकरणे, चालक उपलब्ध आहेत. या ठिकाणी सुसज्ज व्यवस्था करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. या केंद्रामुळे या परिसरातील विविध भागात आपत्कालीन स्थितीत तातडीने पोहोचता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.शालेय मुलांमध्ये देखील या विषयाबाबत प्रबोधन करण्यात यावी व सर्व वाणिज्य आस्थापनांनी अग्निशमन यंत्रणा सुरक्षेच्या दृष्टीने त्यांच्या आस्थापनांमध्ये लावने बंधनकारक आहे व ते लावली की नाही तपासून घ्यावी तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियमाचे काटेकोरपणे अमलबजावणी झाली पाहिजे असे निर्देश महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी दिले.

# हिंदी भाषेच्या सक्तीसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द

**मोर्शी/वार्ताहर**

महाराष्ट्रातील मराठी शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना यांनी संयुक्तपणे तीव्र विरोध दर्शवला होता. याविरोधात राजसाहेबांनी व उद्धव साहेबांनी ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. मात्र या मोर्चाची आणि मराठी एकजुटीची धास्ती घेत, राज्य सरकारने हिंदी भाषेच्या सक्तीसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय आज रद्द केले. यामुळे शहरातील जयस्तंभ चौकात फटाक्याच्या अतिशाबाजीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



जयस्तंभ चौकात मनसे व उबाठा केला जल्लोष

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य सरकारच्या संयुक्त पत्रकार परिषदेत सद्यस्थितीतील दोन्ही शासन निर्णय मागे घेण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या व उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या आक्रमक पावित्र्याला यश आले आहे. याच यशाचा आज दोन्ही पक्षाकडून सर्वत्र आनंद साजरा केला जात आहे. मोर्शी शहरातील मनसे व उभाठा पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येत हा आनंद व्यक्त केला. शहरातील जयस्तंभ चौकात श्री गणेश मंदिरात लड्डू व पेढा व हार अर्पण करून फटाक्याची भव्य अतिशाबाजी करण्यात आली. 'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा व उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचा मराठी एकजुटीचा विजय असो' अशा घोषणा देत परिसर दणाणून टाकले. यामुळे परिसरातील सर्व वातावरण मराठीमय झाल्याचे दिसून आले.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हाध्यक्ष नितीन लुंगे तालुकाध्यक्ष देव कुरवाडे, तालुकाध्यक्ष तुषार पोहकार, विद्यार्थी सेनेचे प्रणव देशमुख, शहराध्यक्ष अभिषेक शेंडे व उभाठा सेनेचे शहराध्यक्ष ओंकार काळे,शहर समन्वयक घनश्याम सिंगरवाडे, उपशहर प्रमुख ओंकार जोल्हे, संदीप भोयर, उमेश इखे, नरेश ढोले, सुनील वाघमारे, प्रकाश विघे, गोपाल घाटोळे, पियुष अजनकर, चंदू सावरकर, सुभाषचंद्र बोस तसेच इतर मनसे व उबाठा सैनिक उपस्थित होते.

# विश्व हिंदू परिषदेचा जिल्हा अभ्यास वर्ग सालबर्डीला



**मोर्शी/वार्ताहर**

विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेला साठ वर्षे पूर्ण झाली. सध्या संपूर्ण भारतभर विश्व हिंदू परिषदेचे च जिल्हाशहा कार्यकर्त्याचे प्रशिक्षण सुरू आहे. त्यातच विदर्भ प्रांतातील संपूर्ण जिल्ह्यात २७, २८ व २९ जून रोजी एकाच दिनांकावर वर्गाला सुरुवात झाली. अमरावती ग्रामीण जिल्ह्याचा जिल्हा अभ्यास वर्ग श्रीक्षेत्र सालबर्डी येथे नुकता संपन्न झाला.

या अभ्यास वर्गात देव, देश, धर्म व संस्कृतीचे अभ्यासात्मक व रचनात्मक व प्रत्यक्ष कामाचे धडे कार्यकर्त्यांना देण्यात आले अनेक सत्रांमधून वेगवेगळ्या विषयाच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना प्रबोधन करण्यात आले.

काम करीत असताना समाजात येणाऱ्या आव्हानांना कसे सामोरे जावे याबाबत व त्यांनी आपल्या बौद्धिकातून मार्गदर्शन केले.

या वर्गाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रांताचे राजीव देशमुख, विजय शर्मा, अनंत शेंदरकर, वर्गाचे प्रमुख तथा विहिपचे जिल्हा मंत्री रुपेश राऊत, धर्माचार्य पियुष महाराज यावले हे उपस्थित होते. अभ्यास वर्गाच्या यशस्वी ते करिता अजय काकपुरे, पंकज पवार, परीक्षित शेंडे, रवी दरवाई, राजाभाऊ माळोदे, शुभम नरवरे आदींनी प्रयत्न केले.

# दिलीप राऊत यांचा सेवानिवृत्ती सोहळा

**अमरावती/का.प्र.**

पंचायत समिती भातकुली मधिल गणोरी केंद्रातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलिप राऊत हे शासकीय नियमानुसार सेवानिवृत्त झाले.त्यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी गणोरी केंद्रातील केंद्रातर्फे व गावकरी यांच्या कडून त्यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला.यावेळी त्यांच्या कडून शाळेतील सर्व विद्यार्थांना लेखन साहीत्य व पाणी बॉटल वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश मालधुरे प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त अंगणवाडी सेविका सुलोचना मालधुरे, गणोरी केंद्राच्या केंद्र प्रमुख नीता सोमवंशी, शा.व्य.समितीचे उपाध्यक्ष साहेबराव मोकळकर,



उपसरपंच स्वप्नील सरडे, शारदा मालधुरे ग्रापं सदस्या, सुलोचना मालधुरे, गजानन मालधुरे, सुशिल मालधुरे उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांच्या व केंद्रातील मुख्याध्यापक यांच्या कडून सेवानिवृत्त दिलिप राऊत व त्यांच्या पत्नी यांचा शाल, श्रीफळ, साडी चोळी आणि भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त अंगणवाडी सेविका सुलोचना मालधुरे यांचा सुध्दा सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाला गणोरी केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निता सोमवंशी संचालन कविता रांखोडे आभार प्रदर्शन राजेश सावरकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्या करीता शाळेच्या शिक्षिका कविता राखोंडे, सुभम वानखडे, अंकीता धंदर, पवण धंदर, मंगेश धंदर, दिपक मालधुरे, गणेश मालधुरे, प्रतिक मोगळकर, तेजक्ष मोगळकर, संमेक किर्तक व समस्त गावकरी मंडळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# अवैध होर्डींग काढण्याची मनपाने केली कार्यवाही

**अमरावती/का.प्र.**

फ्लेक्स, बॅनर, होर्डींग वर मुद्रक व प्रकाशकाचे नाव टाकणे अनिवार्य आहे तसेच बाजार व परवाना विभाग, महानगरपालिका यांची परवानगी घेणे अनिवार्य आहे. अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग असल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. शहरातील फ्लेक्स, बॅनर, होर्डींग काढयाची धडक कारवाई करण्याचे स्पष्ट ताकीद देण्यात आली. होर्डींगची स्टॅबलीटी तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहे. जे होंर्डीग अनधिकृत ठरत असेल ते काढण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले होते.



बाजार व परवाना विभागाच्या होर्डीगबाबत ज्या अटी आहे जे पुर्ण करतील त्यांना होंर्डीगचे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. बाजार व परवाना विभाग व अतिक्रमण विभाग यांनी अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग काढण्याचे कारवाई निरंतर सुरु ठेवावी अशा स्पष्ट सुचना देण्यात आल्या होत्या. कोणीही अनधिकृत फ्लेक्स, बॅनर, होर्डींग शहरात लावू नये अन्यथा संबंधीतांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

मनपा आयुक्त यांच्या आदेशानुसार जेसीबीद्वारे रविनगर रस्त्यावरील अनधिकृत फलक हटविण्याची कार्यवाही करण्यात आली. त्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिका अतिक्रमण विभागाने लगेचच तत्पर कार्यवाही सुरु करुन बाजार परवाना विभागाकडून परवानाधारक होर्डीगची माहिती प्राप्त करुन घेत अनधिकृत होर्डींग हटविण्याच्या कार्यवाहीला तत्परतेने सुरुवात केली. अनधिकृत फलक हटविण्याची कारवाई बाजार व परवाना विभागाचे कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी यांनी केली.

# दर्यापूर शहराच्या विकासावर लक्ष देण्याची गरज-आतिश शिरभाते

**खल्लार/वार्ताहर**

दर्यापूर शहरात प्रसार माध्यमातून शहरातील विविध समस्यांवर बातम्या प्रसारित होतात. अशीच एक बातमी सैनिक कॉलनीतील समोर आली.पावसाळ्याचा पाणी मुख्य रस्त्यावरून रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्या तोडून नगरपालिका दर्यापूरचे संबंधित अधिकारी हे पाण्याची विल्हेवाट लावताना दिसून आले.


दर्यापूर शहराचा विकास ही एक निरंतर प्रक्रिया बनली आहे आणि या प्रक्रियेत नगरपालिका प्रशासन ही सर्वात महत्त्वाची भूमिका बजावते. शहरांच्या विकासाची धुरा नगरपालिका प्रशासनाच्या हातात असते, त्यामुळे त्यांनी यावर अधिक गांभीर्याने लक्ष देणें अत्यंत आवश्यक आहे. शहरांमध्ये नैसर्गिक आपत्त्या किंवा इतर दुर्घटना कधीही घडू शकतात.

अशावेळी, नगरपालिका प्रशासनाकडे एक सक्षम आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली असणे आवश्यक आहे. शहरात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणेही महत्त्वाचे आहे. असे दर्यापूर शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आतिश शिरभाते यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# अवैध शस्त्रसाठा व जिवंत काडतुस जप्त

## १२ लाखाहून अधिक किमतीचा शस्त्रसाठा ताब्यात

### यवतमाळमध्ये रणवीर वर्मा व अश्फार उर्फ भायावर मोठी कारवाई





**यवतमाळ/प्रतिनिधीः-** शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून मोठ्या प्रमाणावर अवैध शस्त्रसाठा हस्तगत केला आहे. या कारवाईत एकूण १२ लाख ८ हजार ५०० रुपयांचा शस्त्रसाठा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोघा संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे.

रणवीर वर्मा कडून ७.७८ लाखांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या सपोनि संतोष मनवर व त्यांच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, दर्डा नगर येथील रणवीर वर्मा (३०, रा. दर्डा नगर, यवतमाळ) हा शस्त्र व काडतुसांसह पांढरकवडा रोडने जाणार असल्याची खबर मिळाली होती. पथकाने पांढरकवडा रोडवर सापळा रचत त्याला मोपेड (एम.एच. २९ ए.ई. ९९७५) सह थांबवले. झडतीदरम्यान त्याच्या प्लास्टिक पोत्यामध्ये ५ वेगवेगळ्या प्रकारची अग्निशस्त्रे, ३५० जिवंत काडतुसे, एक धारधार तलवार, बुलेट प्रुफ जॅकेट व ☞(पान २ वर)

# जिल्हा बँकेत बच्चू कडू यांची मनमानी

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचा पत्रकार परिषदेत आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या मनमानी कारभारामुळे बँकेचे कोट्यावधीचे नुकसान होत आहे. त्यांनी अनावश्यक बांधकाम केले, अनावश्यक खरेदी केल्या. आपली मनमानी त्यांनी बँकेमध्ये चालवली आहे. अध्यक्ष झाल्यापासून आजपर्यंत बच्चू कडू यांनी जवळपास सर्वच ठरावाचे लिखाण खोटे केले आहे, असा आरोप करत याबाबत याबाबत आम्ही तक्रारी केल्या असल्याची माहिती आज मंगळवार १ जुलै रोजी पत्रकार परिषदेत काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिली.

त्यांनी आरोप केला की, बच्चू कडू यांनी बँकेमध्ये मनमानी सुरू केली आहे. नाशिक न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा त्यांना २४ जुलै २०२३ रोजी सुनावली होती. अध्यक्ष झाले त्यावर त्यांना शिक्षा लागू होती. परंतु ही माहिती त्यांनी सर्वांपासून लपवून ते अध्यक्षपदावर विराजमान झाले. मुळातच ते अध्यक्ष होण्यास पात्र नव्हते. याबाबत लवकरच न्यायालयीन ☞(पान २ वर)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा मृत्यू

## -कुसुमकोट गावाजवळ अपघात



**धारणी/प्रतिनिधीः-** धारणी वनविभाग कार्यालयापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या कुसुमकोट बुजुर्ग गावाजवळ आज मंगळवार १ जुलैच्या सकाळी १० वाजताच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत कोल्ह्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली. घटनेची माहिती वन विभागाला मिळूनही कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले नव्हते. कोल्हा मृत अवस्थेत रस्त्यावर पडलेला असताना त्यावरून आणखीन काही वाहन गेल्यामुळे त्याच्या शरीराचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. वन्य प्राणी संरक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाजवळ घडलेल्या या घटनेने वन विभागाच्या निष्काळजीपणावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोल्हा महाराष्ट्रातील संरक्षित वन्य प्रजाती पैकी एक असून त्याच्या मृत्यूबाबत कोणताही पंचनामा न केल्याने आणि तो न उचलल्याने वनविभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजगी व्यक्त केली जात आहे.

# घरफोडी व मोटरसायकल चोरी प्रकरणातील सराईत जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त माहितीच्या आधारावर कारवाई करून दोन सराईत गुन्हेगारांना जेरबंद केले. त्यांच्याकडून १ लाख ४२ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अक्षय शंकर बागडे (वय ३०) व बॉबी गणेश गौरखेडे (वय २७, दोन्ही राहणार सिल्लोरी,नागपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती की, दोन संशयित विना नंबरच्या मोटरसायकल घेऊन फिरत आहे. यावरून पोलिसांनी कारवाई करून आरोपी अक्षय बागडे व बॉबी गौरखेडे याला ताब्यात घेतले. त्यांना मोटरसायकल बाबत विचारपूस केली असता सदर दोन्ही गाड्या त्यांच्या असल्याचे सांगून कोणतीही कागदपत्र सादर न करता उडवाउडवीची उत्तरे त्यांनी दिली. मात्र त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून हिरो होंडा स्प्लेंडर एमएच ४९ ☞(पान २ वर)

# सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

## गांधीनगर परिसरातील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी राजेश पाटील (वय ६०, गांधीनगर) यांनी आज मंगळवारी १ जुलै रोजी आपल्याच घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.यामुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांसह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठविला.

माहितीनुसार सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी राजेश पाटील गांधीनगर परिसरातील प्रभात रेसिडेन्सी मध्ये कुटुंबीयांसह राहत होते. मंगळवारी दुपारी घरी कोणी नसताना त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. कुटुंबीय जेव्हा परत आले तेव्हा ही घटना समोर आली. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली.माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत पंचनामा केला. ☞(पान २ वर)

# भटक्या विमुक्त समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे



## प्रलंबित मागण्यासाठी आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भटक्या विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्यावतीने विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आज मंगळवार १ जुलैपासून राज्यभरात चार दिवसीय आंदोलन करण्यात येत आहे. या अंतर्गत अमरावती शाखेने मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शन आंदोलन केले. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भटक्या समुदायासाठी वेगळे मंत्रालय स्थापित ☞(पान २ वर)

# पूर्णा प्रकल्पाचे दोन गेट उघडले

## परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा



चांदूरबाजार/प्रतिनिधी:- गेल्या दोन-तीन दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे चांदुर बाजार तालुक्यातील पूर्णा मध्यम प्रकल्पाचे दोन गेट आज मंगळवार १ जुलै रोजी उघडण्यात आले. परिसरात राहणाऱ्या नागरिकांना येणाऱ्या ४८ तासात सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपविभागीय अभियंता यांनी ही माहिती दिली. विदर्भ सिंचन विकास विभाग अंतर्गत हा प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा होते. प्रकल्पामध्ये ४४८ मीटर पाणी भरलेले आहे. त्याची क्षमता ५७.२० टक्के आहे.५६ टक्के पेक्षा अधिक जलसग्रहण येथे झालेला आहे. यामुळे प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. क्षेत्रामध्ये पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे अजून पाणी सोडण्यात येणार आहे.यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कर्जमाफीसाठी शिवसेना आक्रमक



## तहसीलदारांना दिले निवेदन

**धारणी/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना आक्रमक झाली असून, तालुक्यातील तहसीलदार प्रदीप शेवाळे यांना निवेदन देत जोरदार मोर्चा काढण्यात आला. शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या समस्यांवर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

२०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे सोयाबीन पीकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाकडे खरड (शेतवापर कागदपत्रांवर आधारित) नुकसानभरपाईची मागणी केली जात असून, ती तातडीने वितरित करण्यात यावी, अशी ☞(पान २ वर)

# सहकार क्षेत्रात 'प्रहार'चा प्रभाव, राजकीय विरोधकांनाही दिला धक्का



**चांदूरबाजार/प्रतिनिधी-** अमरावती जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात पुन्हा एकदा प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी आपली पकड सिद्ध करत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची धुरा आपल्या हातात घेतली आहे. संख्याबळाच्या दृष्टीने मागे असतानाही त्यांनी अध्यक्षपदासाठी उमेदवारी सादर करत विरोधकांमध्ये खळबळ उडवली होती. मात्र निकालानंतर पुन्हा एकदा राजकारणातील त्यांची 'अनपेक्षित पण अचूक' खेळी स्पष्ट झाली.

सहकार क्षेत्रातील निवडणुका नेहमीच गटबाजीवर आधारित असतात, पक्षीय राजकारणापेक्षा स्थानिक आणि सामाजिक समीकरणे येथे महत्त्वाची ठरतात. अशा या गुंतागुंतीच्या राजकारणात बच्चू कडू यांनी आपल्या कुशल डावपेचांमुळे विरोधकांचे गणित पुरते चुकवले आहे.

चांदूरबाजार तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये त्यांनी पूर्वीच वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्यानंतर तालुक्यातील अनेक सहकारी सोसायट्यांमध्ये 'प्रहार'ची सत्ता स्थापन करण्यात त्यांना यश आले. नुकत्याच झालेल्या सात सहकारी सोसायट्यांच्या निवडणुकीत बोराळा सेवा सहकारी सोसायटी तोंडगाव सेवा सहकारी सोसायटी,जालनापूर सेवा सहकारी सोसायटी,करजगाव सेवा सहकारी सोसायटी, मुबारकगाव सेवा सहकारी सोसायटी,सहकार मित्र यांना सोबत घेऊन ब्राम्हणवाडा सेवा सहकारी सोसायटीसह या सहा सोसायट्यांवर प्रहारचे वर्चस्व सिद्ध झाले आहे. यातून सहकार क्षेत्रातील बच्चू कडू यांचा आलेख सातत्याने उंचावत असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या नेतृत्वाखाली सहकारात एक वेगळी कार्यपद्धती, जनतेशी नाळ जुळवणारी भाषा आणि निर्णयक्षमतेची शैली दिसून येत आहे. ☞(पान २ वर)

**ताजी निवडणूक ही शेतकऱ्यांच्या विश्वासाचा कौल आहे.**

बोराळा, तोंडगाव, करजगाव,जालनापूर मुबारकगाव अशा सोसायट्यांमध्ये प्रहारला मिळालेला भरघोस पाठिंबा म्हणजे शेतकऱ्यांनी बच्चू कडू यांच्यावर ठेवलेला विश?वास नव्याने सिद्ध झाल्याचे द्योतक आहे.

# खल्लार -शिवारखेडा रस्त्याची दयनिय अवस्था



खल्लार/प्रतिनिधी:- खल्लार ते शिवारखेडा रस्त्याची अत्यंत दयनिय अशी अवस्था झाली असून याकडे एकाही लोकप्रतिनिधीचे लक्ष नाही. पावसाळ्याला जेमतेम सुरुवात झाली असून पूर्ण पावसाळ बाकी आहे. शिवारखेडा येथील नागरिकांना दैनंदिन कामासाठी हाच रस्ता असल्याने गावकऱ्यांना मोठया प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शाळा सुरु झाल्या असून गावातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागतो. याच रस्त्यावर शिवारखेडा, बेंबळा गावाकऱ्यांची शेती आहे. शेतात जाण्यासाठीही शेतकरी, शेतमजुर यांनाही त्रासाचा सामना करावा लागत आहे.या रस्त्याने जाण्यासाठी वाहन चालकांना, व पायी जाणाऱ्याना तारेवरची कसरत करावी लागते. मात्र या रस्त्याकडे एकाही लोकप्रतिनिधीचे लक्षच नाही.

# प्रशासनाच्या सतर्कतेमुळे रामतीर्थ येथील बालविवाह रोखण्यात यश



राळेगाव/प्रतिनिधी:- रामतीर्थ येथील मुलीचा दि. २ जुलै २५ रोजी होणारा बालविवाह जिल्हा व तालुका प्रशासनाच्या सर्तकतेमुळे रोखण्यात आला. रामतीर्थ येथे बालविवाह होत असल्याबाबतची माहिती अविनाश पिसुरडे सरंक्षण अधिकारी संस्थात्मक यांनी सागर विठाळकर बालविकास प्रकल्प अधिकारी राळेगाव यांना दिली. ताबडतोब ही माहिती अमित भोईटे तहसीलदार राळेगाव , गटविकास अधिकारी केशव पवार यांना देण्यात आली. तसेच विशाल जाधव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा उपमुख्य ☞(पान २ वर)

